
पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

वर्ष : २ । अंक १४ वा । मराठी पाक्षिक । मूल्य : २५। दिनांक १ मार्च ते १५ मार्च २०२०

# वाढता, वाढता वाढताहेत कलंकित लोकप्रतिनिधी





सुरेश गायकवाड

**गरिबी आणि विषमता वाढवणारा अर्थसंकल्प**


विजय नाईक

**केजरीवाल यांची हॅट्ट्रिक**


प्रा. एच. एम. देसरडा

**विकास व प्रशासनाचा ढाचा आमूलाग्र बदलण्याचं आव्हान**




With Best
Compliments from

Sos. Agrotech Pvt.Ltd




पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : २ ।
अंक १४ वा । मूल्य : रु. २५ । दिनांक १ मार्च ते १५ मार्च २०२०

**● संपादक**
चेतन शिंदे

**● मांडणी व सजावट**
सचिन ओव्हाळ

**● संपादकीय पत्रव्यवहार**
श्री गणेशसाई बिल्डींग फ्लॅट नं.८०२
जनरल अरूणकुमार वैद्य मार्ग, वडाळा
(पूर्व) मुंबई - ४०००३७

**● संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१
E mail :
thepeoplespost2014@gmail.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
✻अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी
संपादक सहमत असेलच असे नाही.

द पीपल्स पोस्ट | ८८८८५४१८२२

**● जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९/ ८८०५१५१४५२

**● वर्गणीदारांसाठी संपर्क**
**महाराष्ट्र / मुंबई :**
**विदर्भ** : अंकुश वाकडे : ९४२१४२४२४२
**मराठवाडा** : सचिन : ७३५००९१५६९
**मुंबई / कोकण** : संकेत तांबे :
७७३८७८४१३२

**● वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष**
**द पीपल्स पोस्ट** या नावाने काढावा

**संपादकीय :** वाढता, वाढता वाढताहेत कलंकित लोकप्रतिनिधी? ५
केजरीवाल यांची हॅट्ट्रिक – **विजय नाईक** ७
भाजपचा भुसा... दिल्लीचा दणका – **जयदेव डोळे** ११
गरिबी आणि विषमता वाढवणारा अर्थसंकल्प – **सुरेश गायकवाड** १४
विकास व प्रशासनाचा ढाचा आमुलाग्र बदलण्याचं आव्हान – **प्रा. एच. एम. देसरडा** १८
भाजपचे उच्चवर्गीय – उच्चवर्णीय बजेट! – **कॉ. भालचंद्र कांगो** २०
डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महार-मांग वतनदार परिषद कसबे तडवळे – **ज्ञानेश्वर ढावरे** २२
'मूकनायक' म्हणजे आंबेडकरी पत्रकारितेची सुरुवात – **यशवंत भंडारे** २८
कुछ नहीं सोचने और कुछ नहीं बोलने पर आदमी मर जाता है – **डॉ. सूर्यनारायण रणसुभे** ३६
**व्यक्तिविशेष :** दिल्लीचा नायक – अरविंद केजरीवाल – **प्रकाश खंडेलोटे** ३८
**ग्रंथपरिचय :** नक्षलवाद्यांविरूद्ध लढणाऱ्या पोलिसाच्या संघर्षमय जीवनाची कथा – आयपीएस – **किरण डोंगरदिवे** ४०
**आजकालचे प्रश्न :** **पंक्चरवाला** ४२
**ग्रेट थॉट्स :** ४५
**कविता :** अस्तित्वाची लढाई! – **विवेक मोरे** ४६
**कोण काय बोलतं :** ४७

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. ✻संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. नोंदणी क्र. MAHMAR/2018/76460




## व्यक्तिपूजेचा अतिरेक

*'इतिहास उकरायचा की घडवायचा?' हे १६ जानेवारी ते ३१ जानेवारीच्या अंकातील संपादकीय आम्हाला खूप आवडले. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी नरेंद्र मोदींची तुलना करणाऱ्या पुस्तकावर संपादकीयातून सडेतोड भाष्य करण्यात आलेलं आहे. भाजपमध्ये आपलं अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तळी उचलण्याची स्पर्धा लागली आहे. मोदींना नको ती विशेषणं लावून त्यांना मोठं दाखवण्याचा प्रयत्न म्हणजे व्यक्तिपूजेचा अतिरेकच म्हणावा लागेल. विवेकाला फाटा देऊन भाजपची मंडळी नको त्या गोष्टी करू लागली आहे. मोदींचं महात्म्य गाण्याची स्पर्धा देशाला विनाशाकडे घेऊन जात आहे, असे वाटते.*

**– विजय कणसे, प्रदीप कणसे, मुंबई**

## अमेरिका-इराण संघर्षावरील लेख आवडले

*विजय नाईक यांचा 'इराण विरूद्ध अमेरिका' आणि डॉ. विजय खरे यांचा 'अमेरिका-इराण संघर्षाचे सामरिक परिणाम' या शीर्षकाचा लेख असे दोन्ही लेख आम्हाला खूप आवडले. विजय नाईक यांनी आपल्या लेखातून इराण-अमेरिका यांच्यातील शत्रुत्वाच्या वाटचालीवर प्रकाश टाकताना या उभय देशांतील संघर्ष टोकाला गेल्याचे वर्णन केले आहे. नाईक यांच्या लेखातील आकडेवारी घटना-घडामोडींचं महत्त्व अधोरेखित करणारी आहे. डॉ. खरे यांनी त्यांच्या लेखातून अमेरिका-इराण यांच्यातील संघर्षाच्या सामरिक परिणामांची जी चर्चा केली आहे, ती सुद्धा माहितीपूर्ण आहे. दोन्ही लेख उत्तम होते.*

**– व्ही.के.शिंदे नागपूर**

## 'मूकनायक'चा वारसा जपला जावा

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत कठीण परिस्थितीतही मूकनायक वृत्तपत्र चालवून समाज प्रबोधनाचं मोठं काम केलं. आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज यांच्या अर्थसाह्यामुळे प्रबोधनात्मक पत्रकारितेची सुरुवात करणे डॉ. बाबासाहेबांना शक्य झाले. डॉ. आंबेडकरांनी मूकनायक या आपल्या पहिल्याच वृत्तपत्रातून वंचितांचे प्रश्न हिरिरीने मांडल्याचे डॉ. हरिश्चंद्र निर्मळे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शंभर वर्षांपूर्वीचे मूकनायक' या लेखात सांगितले आहे. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या वंचित समाजाचे प्रश्न 'मूकनायक'मधून मांडून मूक समाजाचा नायक असल्याचेच दाखवून दिले आहे. डॉ. बाबासाहेबांच्या या समाज प्रबोधनकारी पत्रकारितेचा वारसा जपला गेला पाहिजे.*

**– संजय धावारे, मुंबई**

## 'मूकनायक'ची वाटचाल कळाली

*'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शंभर वर्षांपूर्वीचे 'मूकनायक' या लेखातून डॉ. हरिश्चंद्र निर्मळे यांनी डॉ. बाबासाहेबांच्या प्रबोधनकारी पत्रकारितेवर प्रकाश टाकला. राजर्षी शाहू महाराजांच्या पाठबळामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'मूकनायक'च्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि परिवर्तनवादी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवता आली, हे या लेखातून कळले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वृत्तपत्रातूनच दलितांचे प्रश्न वेशीवर टांगण्याचे काम केले, त्या कार्याला तोड नाही.*

**– विजय सराटे, नांदेड**

## 'आजकालचे प्रश्न' विचार करायला लावणारे

*१६ जानेवारी ते ३१ जानेवारीच्या अंकातील 'आजकालचे प्रश्न'मधील लेख विचार करायला लावणारे होते. पोटासाठी माणसाला काय करावं लागू शकतं, यावर जळजळीत प्रकाश टाकणारं 'गर्भाशय जपून ठेवा' शीर्षकांतर्गत टिपण गंभीर आहे. 'प्रामाणिकतेचं नाव कामगार' आणि 'भारतीय कुटुंबांना जातोय तडा' हे दोन लेखही छान होते. एकत्र कुटुंबपद्धती समाजातून हद्दपार होत असल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्येवरील भाष्यही अभ्यासपूर्ण होते.*

**– संजय एन. ठाकूर, ठाणे**


**सूचना** अंकाविषयी आपण पाठवलेल्या प्रतिक्रियांचे जरुर स्वागत आहे. संपर्क : 'द पीपल्स पोस्ट' सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१ ई-मेल : thepeoplespost2014@gmail.com

# वाढता, वाढता वाढताहेत कलंकित लोकप्रतिनिधी

गुन्हेगारी पार्श्वभूमी किंवा थेट गुन्ह्यांत अडकूनही वेगवेगळ्या निवडणुकांत निवडून येणाऱ्या उमेदवारांचा विषय केवळ राजकारणातच नव्हे तर राज्यघटना आणि लोकशाहीच्या दृष्टीनेही चिंताजनक बनला आहे. सर्वसामान्यांसाठीच नव्हे तर देशाच्या सर्वोच्च न्यायालयावरही अशी चिंता व्यक्त करण्याची वेळ आली आहे. २००४ मध्ये कलंकित खासदार २४ टक्के, २००९ मध्ये ३० टक्के, २०१४ मध्ये ३४ टक्के तर २०१९ मध्ये त्यांची संख्या ४३ टक्क्यांवर पोहोचली आहे. यातील गंभीर गुन्हे असणाऱ्या खासदारांची टक्केवारी अनुक्रमे १२, १४, २१ व २९ टक्के इतकी आहे. याचा अर्थ, साधे आणि गंभीर अशा दोन्ही श्रेणींत खासदारांची संख्या वाढते आहे. विधानसभा, महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, तालुका पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती या सर्व स्थानिक संस्थांमध्ये डोकावण्याचा प्रयत्न केल्यास तेथील कलंकित लोकप्रतिनिधींची संख्या आणखी वाढलेली दिसेल. दिल्लीत जे काही चित्र निर्माण होते ते झिरपत, झिरपत गाव पातळीवर येते हेही वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. आपला कारभार वरुन खाली येतो खालून वर जात नाही म्हणूनही हे सारे घडते. म. गांधी काय आणि डॉ. बाबासाहेब काय या सर्वांनी खालून वर जायला सांगितलं होत; पण तरीही दिल्लीतला कारभारी सर्वात वर म्हणजे लाल किल्ल्यावर राहून शेवटच्या रांगेतील शेवटच्या माणसाची भाषा बोलतो, पोत्यांनी मते मिळवतो. या सर्व पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाकडे पहायला हवे. कलंकित प्रतिनिधी राजकारणच नव्हे तर राज्यघटना आणि लोकशाहीही कलंकित करतात. संसदेवर आणि सर्व लोकशाही संस्थांवरही शिंतोडे उडवतात. मनगटशाही, झुंडशाहीला प्रोत्साहन देतात. डाग वाईट असतात याऐवजी कुठल्या तरी पावडरीनं तयार केलेला 'दाग अच्छे लगते है' हा संवादही फेकतात. जास्तीत जास्त डाग पडले की जास्तीत जास्त पावडर खपते. राजकारणातही जास्तीत जास्त डाग घेऊन आल्यावर जास्तीत जास्त मते मिळतात, असा एकेकाळी गैरसमज होता. वाढत्या कलंकित लोकप्रतिनिधींनी जणू काय ते वास्तव आहे असे वागण्याचा प्रयत्न चालवला आहे.

कलंकित खासदारांवर वेगवेगळ्या प्रकारचे आरोप आहेत. कोर्टात ते सिद्ध व्हायचे आहेत. खालच्या कोर्टात, मग वरच्या कोर्टात मग त्यावरच्या कोर्टात असा खो-खोचा खेळ चालू असतो. भ्रष्टाचार, बलात्कार, खून, खुनाचा प्रयत्न, जाळपोळ, लूट, खंडणी अशी जेवढी म्हणून वाईट कृत्ये आहेत, त्यातील बहुतेक सर्वांचा यात समावेश आहे. पूर्वी राजकीय गोष्टींसाठी, सामाजिक परिवर्तनासाठी, जनतेच्या मागण्यांसाठी अनेक नेत्यांना तुरुंगवास भेटायचा. त्यातले काही जण तुरुंगात राहूनही निवडून यायचे. आता त्यांची जागा गुन्हेगारांनी घेतली. तेही तुरुंगात राहून निवडून यायला लागले. सत्तेपर्यंत पोहोचायला लागले. कोण खाणसम्राट तर कोण आणखी कोणते तरी सम्राट. अंगभर सोने आणि काळजीभर वाईट गोष्टी घेऊन ते राजकारणात उतरले. राजकारण म्हणजे मळ आणि कलंक काढून टाकणारं स्वच्छता केंद्र बनलं. पूर्वी हे कलंकित पडद्यामागं राहून राजकारण खेळायचे. पडद्यात घुसमटायला लागलं म्हणून ते पडद्यावर आले आणि 'ओपन टू फिनिश' असा स्वत:च खेळ खेळू लागले. काहींनी स्वत:चे पक्ष काढले. काही रॉबिनहूड किंवा अण्णाभाऊंच्या कादंबरीतील वाचकाप्रमाणे स्वत:ला सादर करण्याचा प्रयत्न केला. काही गरिबांचे कैवारी तर काही जण कर्दनकाळ बनले. महाराष्ट्रात निवृत्त पोलिस अधिकाऱ्यांना कोणी पाडले, कर्नाटकात शिवराम कारंथांना कोणी पाडले तर कलंकित उमेदवारांनी. जेव्हा जेव्हा असं घडतं तेव्हा लोकशाहीला धक्का पोहोचतो. ५४५ पैकी ४२ टक्के कलंकित म्हणजे जवळपास निम्मे कलंकित लोकसभेत आहेत. ज्यांच्यावर गंभीर गुन्ह्यांचे आरोप आहेत, असे १४५ खासदार आहेत. देशातील सर्व विधीमंडळ आणि स्थानिक स्वराज्य संस्था मिसळल्यास आकडे लाखांत जातील.

राजकारण शहाण्या माणसाचे काम नाही, राजकारण म्हणजे बदमाशांचा खेळ असे बरेच वाक्प्रचार किती तरी वर्षांपासून अस्तित्वात आले आहेत. वाईट याचं वाटतं, की हे सारे वाक्प्रचार वास्तवाचं रुप घेऊन मिरवायला निघाले आहेत. आता प्रश्न पडतो, की जे घटनाकारांना अपेक्षित नव्हतं. असं का घडायला लागलं?



तासांच्या आत ही माहिती निवडणूक आयोगाकडे पाठवावी, राजकीय पक्षांनी आपल्या संकेतस्थळावर कलंकित प्रतिनिधींची माहिती द्यावी असे तर सर्वोच्च न्यायालयाने सांगितलेच; शिवाय वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी संसदेनेच मार्ग काढावा असेही सुचवले आहे. संसद सर्वोच्च आहे यात कुणीही शंका घेऊ नये. तसे घडल्यास ते घटनाविरोधी होईल. पण प्रश्न असा आहे, की संसदेतच कलंकितांचे प्रमाण वाढत असेल तर स्वच्छता मोहिमेसाठीचे कायदे करताना नेमकी परिस्थिती कशी तयार होईल?

विकासाचा मार्ग केवळ आणि केवळ राजकारणातून जातो समाजकारणातून नव्हे असे एक नवे तत्त्वज्ञान रुजू होत आहे. कलंकितांना स्वच्छ, शुद्ध करणारं राजकारण तयार झालं. जे स्वत:ला सात्विक, चारित्र्यसंपन्न समजत होते, त्यांच्याभोवतीही कलंकितांची गर्दी जमली आहे. राजकारणात चारित्र्याऐवजी समाजप्रेमाऐवजी, तत्त्वाऐवजी निवडून येण्याच्या क्षमतेला महत्त्व येऊ लागलं. गुन्हेगाराकडे असलेला बलदंडपणा, जात, पैसा, धर्म यालाही महत्त्व येऊ लागलं. भगव्या कपड्यातले अनेकजण उन्हातान्हाऐवजी सत्तेची ऊब घेऊ लागले आणि गुन्हेगार सत्तेच्या सावलीत सुरक्षारक्षक घेऊन फिरु लागले. संसद, लोकशाही, राज्यघटना वगैरे अनेक गोष्टी अडचणीत येतील काय अशी स्थिती तयार झाली. ते थांबवायचं असेल तर गुन्हेगार जन्माला घालणारी स्थिती आणि त्यांना निवडून देणारे मतदार यांच्यातही बदल घडवले पाहिजेत. असे बदल कायद्याने नव्हे तर प्रबोधनानं घडवता येतात हे कधीही विसरुन चालणार नाही.

उमेदवार गुन्हेगार आहे हे ठाऊक असूनही लोक त्याला मते का देतात, उमेदवार चारित्र्यवान आहे हे ठाऊक असूनही लोक अनेक उमेदवारांना का पाडतात? लोकशाही चांगली हवी अशी अपेक्षा करणारे लोकच कलंकितांना का निवडून देतात? राज्यघटनेची पूजा करणारे, तिला दिल दौलत आणि दुनिया समजणारेही अशी चूक का करतात किंवा अज्ञानापोटी हे सारे घडते काय? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. बायबल कुणाच्या हातात असावं लागतं, लोकांच्या की सैतानाच्या? सैतानाच्या हातात ते गेलं, की बायबलमध्ये सैतान किती महत्त्वपूर्ण आहे आणि तो आहे म्हणूनच बायबलची निर्मिती झाली असं ते सांगू लागतात. खलील जिब्रान यांची 'सैतान' कथा वाचल्यावर हे सारे काही कळेल. डॉ. बाबासाहेबांनी असाच इशारा दिला होता. लोकशाहीच्या मंदिरात शिरलेला सैतान बाहेर पडणार नसेल तर मंदिरच उडवावे लागेल असा तो इशारा होता. त्याकडं ना राज्यकर्त्यांनी लक्ष दिलं ना मतदारांनी! आता नाकातोंडात पाणी जाऊ लागले, जीव वाचवण्यासाठी पिलू पायाखाली घेण्याची वेळ आली. कलंकित लोक स्वत:ला हवं तस वातावरण तयार करतात. त्यासाठी संसद काय, लोकशाही काय आणि राज्यघटना काय यांना चिलखतं बनवतात. राज्यघटना हवी तशी म्हणजे स्वत:ला हवी तशी वापरण्याचा प्रयत्न करतात. आमदार, खासदार, मुख्यमंत्री वापरण्याचा प्रयत्न करतात. आमदार, खासदार, मुख्यमंत्री आणि मंत्री अशा सर्व पदांपर्यंत ते चाल करतात. महत्त्वाच्या पदाच्या निवडणुकीच्या वेळी आपले सदस्य फुटू नयेत म्हणून त्यांना कोंडून ठेवण्याची, सहलीला नेण्याची वेळ सर्वच पक्षांवर का आली? याचा अर्थ कोणी तरी फोडणारे आहे आणि कोणीतरी फुटणारेही आहे. कोणी तरी विकत घेणारे आहे आणि कोणी तरी विकले जाणारे ग्राहकही आहे. महत्त्वाचे म्हणजे, या सर्वांना निवडून देणारेही कोणी आहे. राजकीय पक्षांनी आपल्या गुन्हेगारांची पार्श्वभूमी फेसबुक, ट्विटर, राष्ट्रीय आणि प्रादेशिक वर्तमानपत्रे यामध्ये प्रसिद्ध करावी. निकालानंतर ७२

●●●



# केजरीवाल यांची हॅट्ट्रिक



विजय नाईक

२०१९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांत भाजपने दिल्लीतील लोकसभेच्या सर्व सात जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे दिल्लीत आपलेच सरकार येणार या भ्रमात भाजप राहिला. तब्बल २०० खासदार, अनेक केंद्रीय मंत्री, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह यांनी रास्वसंघाच्या कार्यकर्त्यांसह दिल्ली अक्षरशः पिंजून काढली. **अत्यंत घृणास्पद, द्वेषमूलक धार्मिक, जातीय व हिंसाचाराला प्रोत्साहन देणारा प्रचार केला. पण, 'आप'च्या 'झाडू' ने भाजपचे 'कमळ' कचऱ्यात फेकून दिले. काँग्रेसचा 'हात' कुठेच दिसला नाही. एखाद्या प्रख्यात मल्लाला तरूणाने धोबीपछाड घालून चितपट करावे, तसे भाजपचे राजकीय 'हिंदूकेसरी' अमित शाह यांचे झाले.**

दिल्लीत ८ फेब्रुवारी रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकांचे निकाल ११ फेब्रुवारी रोजी लागले आणि भारतीय जनता पक्षाचे 'बारा' वाजले. आम आदमी (आप) पक्षाला मतदारांनी ७० पैकी तब्बल ६२ जागा मिळवून दिल्या. भाजपला २०१५ च्या निवडणुकांत मिळालेल्या तीन जागांपेक्षा पाच जागा अधिक देऊन ८ जागा मिळवून दिल्या. काँग्रेस पक्षाच्या हाती गेल्या वेळेप्रमाणे भोपळा दिला. लढविलेल्या ६८ जागांपैकी काँग्रेसला तब्बल ६३ मतदारसंघांत अनामत रक्कम गमवावी लागली. दुसरीकडे, दारूण पराभव भाजपचा राजकीय माज उतरण्यास कारणीभूत होईल काय, हा प्रश्न मात्र कायम आहे.

केजरीवाल यांच्यापुढे भाजपने त्यांच्या उमेदवारीचा अर्ज भरण्याच्या दिवसापासून त्रास द्यायला सुरुवात केली. नवी दिल्ली मतदारसंघातून अर्ज करण्यासाठी ते पोहोचले, तेव्हा त्यांच्यापुढे ४५ उमेदवार उभे होते. आपच्या नेत्यानुसार, 'केजरीवाल यांना वेळेत अर्ज भरता येऊ नये, हा त्यामागे भाजपचा डाव होता.' त्यामुळे त्यांना स्वतःचा अर्ज भरण्यास तब्बल सहा तास तिष्ठत बसावे लागले. अर्ज भरावयास सायंकाळचे साडेसहा वाजले.

'आप'ला २०१५ मधील निवडणुकीत ७० पैकी ६७ व भाजपला ३ जागा मिळाल्या होत्या. भाजपला ४० ते ४२ टक्के मते मिळतील, असा अमित शाह यांचा कयास होता. प्रत्यक्षात भाजपला ३८.५१ टक्के मते मिळाली, तर 'आप'ने ५३.५७ टक्के मते मिळवली. काँग्रेसला केवळ ४.२६ टक्के मते मिळाली. २०१३ च्या विधानसभेच्या निवडणुकांत काँग्रेसला ८ जागा व २५ टक्के मते मिळाली होती; परंतु

विधानसभेच्या गेल्या दोन निवडणुकांत काँग्रेसची पाटी कोरी राहिली. याला सोनिया गांधी व राहुल गांधी यांचे कमकुवत नेतृत्त्व व दिल्लीतील ढिसाळ पक्ष संघटन जबाबदार आहे. २०१५ मध्ये एकूण मतदानाचे प्रमाण ६७.४७ टक्के होते. ते यंदा ६२.५९ टक्क्यांवर आले. पूर्व दिल्लीतून क्रिकेटपटू गौतम गंभीर हे भाजपचे लोकसभेतील सदस्य आहेत. पूर्व दिल्लीत भाजपचा बऱ्यापैकी जम आहे. त्यामुळे 'आप'चे ज्येष्ठ नेते व उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया पटपडगंज मतदारसंघातून पराभूत होतात की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. अखेर शेवटच्या दोन फेऱ्यांत त्यांचे पारडे भाजपचे उमेदवार रवींद्र सिंग नेगी यांच्यापेक्षा जड झाले. सिसोदिया यांना ७०,१३६ तर नेगी यांना ६६,९५६ मते मिळाली. सिसोदिया यांचा हा निसटता विजय होता. उत्तर पूर्व दिल्ली व दक्षिण-पश्चिम दिल्लीतील मतदारसंघात आपला कडवी लढत द्यावी लागली. तथापि, मध्य व नवी दिल्ली मतदारसंघातून आपला जोरदार पाठिंबा मिळाला. मध्य दिल्लीत चांदणी चौक, बालीमारन, मटिया महल, पटेन नगर, सदर बाजार, करोल बाग (अनुसूचित जाती) व मोतीनगर या मतदारसंघांतून यश मिळाले. दिल्लीच्या लोकसंख्या वर्गीकरणाकडे पाहिले, तर पूर्व दिल्लीत मध्यमवर्गीय, व्यापारी व झोपडपट्ट्यांत राहणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. मध्य दिल्लीत सरकारी नोकरदार, श्रीमंत व उच्चभ्रूंची संख्या अधिक असून, पश्चिम दिल्लीत प्रामुख्याने पंजाबी व्यापारी व धंदेवाईक आहेत. बाह्य दिल्लीला ग्रामीण भाग जोडलेला असल्याने तेथे शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. दिल्लीत हरियाना, बिहारी, पंजाबी व उत्तरप्रदेशीय लोकांचे प्रमाणही मोठे आहे. उत्तर प्रदेशाप्रमाणे भाजपने एकाही मुस्लिम उमेदवाराला दिल्लीच्या निवडणुकीचे तिकिट दिले नाही. 'आप'मधून भाजपमध्ये येऊन सरचिटणीस बनलेल्या शायजा इल्मी मांना उमेदवारी मिळेल, असे बोलले जात होते.

२०१९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांत भाजपने दिल्लीतील लोकसभेच्या सर्व सात जागा जिंकल्या. त्यामुळे दिल्लीत आपलेच सरकार येणार या भ्रमात भाजप राहिला. तब्बल २०० खासदार, अनेक केंद्रीय मंत्री, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह यांनी रास्वसंघाच्या कार्यकर्त्यांसह दिल्ली अक्षरशः पिंजून काढली. अत्यंत घृणास्पद, द्वेषमूलक धार्मिक, जातीय व हिंसाचाराला प्रोत्साहन देणारा प्रचार केला. पण, 'आप'च्या 'झाडू' ने भाजपचे 'कमळ' कचऱ्यात फेकून दिले. काँग्रेसचा 'हात' कुठेच दिसला नाही. एखाद्या प्रख्यात मल्लाला तरूणाने धोबीपछाड घालून चितपट करावे, तसे भाजपचे राजकीय 'हिंदूकेसरी' अमित शाह यांचे झाले.

जम्मू-काश्मीरविषयक घटनेतील ३७० व ३५ ए ही कलमे रद्द केल्यावर आलेला सुधारित नागरिकत्व कायदा, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी वहीच्या संदर्भात केलेल्या घोषणा, मुस्लिमांच्या त्रिवार तलाक प्रथेला बंदी घालणारा कायदा याला संसदेने दिलेल्या संमतीनंतर मुस्लिम महिलांची मते मिळविणाऱ्या भाजपला दिल्लीच्या विधानसभेतही मते मिळतील, अशी आशा होती. आता हिंदू व मुस्लिम यांच्यातील तेढ, वैमनस्य वाढविले, मुस्लिमांना व आप पक्षालाही 'पाकिस्तानी' ठरविले, की आपले काम फत्ते झाले, अशी भाजपची खात्री झाली; परंतु दिल्लीच्या बव्हंश हिंदू मतदारांनी भाजपऐवजी 'आप'ला मत दिले व भाजपला धडा शिकविला.

याचे प्रमुख कारण म्हणजे, गेल्या पाच वर्षात मुख्यमंत्री केजरीवाल यांनी पाणी, सडक, वीज, शिक्षण व आरोग्य या क्षेत्रांत केलेले ठाशीव काम व त्यामुळे गरीब, मध्यम वर्गीय, नोकरदार महिला यांना झालेला लाभ होय. गेल्या महिन्यात त्यांनी दिल्लीतील प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला पत्र पाठवून देशातील आठ धार्मिक व पर्यटन स्थळांना विनाशुल्क (रेल्वेप्रवासाचा खर्च दिल्ली सरकारने केला) प्रवास करण्याची सोय केली. शेकडो ज्येष्ठ नागरिकांनी याचा लाभ घेतला. तथापि, ही योजना सफल होते, असे दिसताच भाजपच्या हाती असलेल्या रेल्वे मंत्रालयाने गाड्या थांबविणे, रद्द करणे असे प्रकार सुरू केले. ते भाजपच्या विरोधात गेले. गेल्या पाच वर्षात दिल्लीच्या जनतेला दिसले, ते केजरीवाल यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी मोदी-शाह जोडीने नायब राज्यपालांचा गैरवापर करून त्यांच्या शासनप्रक्रियेला खीळ घालण्याचा केलेला प्रयत्न. दिल्लीतील तीनही महापालिका भाजपच्या हाती असल्याने त्यांनी केजरीवाल यांना द्यायचा तेवढा त्रास दिलाच. केंद्राच्या असहकार्यामुळे दिल्लीचे अनेक प्रश्न मार्गी लागले नाहीत. केजरीवाल यांच्यासाठी 'दैनंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' अशी स्थिती होती. तरीही २०० युनिट वीज वापरावर कोणतेही शुल्क न आकारणे, महिलांना बसमधून मोफत प्रवासाची सोय, त्यांच्या सुरक्षेसाठी बसमध्ये केलेली मार्शल्सची नेमणूक, सरकारी रुग्णालयांतून कमी पैशात अथवा मोफत शस्त्रक्रिया करण्याची सवलत, सरकारी शाळांतील शिक्षणव्यवस्थेत आमुलाग्र सुधारणा करून त्यांना दिलेली प्रतिष्ठा आदी अगदी सामान्य दिसणारी; परंतु नागरिकांना दिलासा देणारी व विश्वास निर्माण करणारी पावले केजरीवाल व त्यांच्या सहकाऱ्यांनी उचलली. त्याचे दृश्य परिणाम जनतेपुढे होते. ही केजरीवाल यांच्या जमेची मोठी बाजू होती.

त्याच्या अगदी उलट प्रचारतंत्र भाजपने वापरले. दिल्लीचे निवडणूक प्रभारी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर होते. त्यांनी 'केजरीवाल हे दहशतवादी आहेत,' असा आरोप करून आपण पुण्याचे असूनही किती असंस्कृत असू शकतो व कसे कोणत्याही थराला जाऊ शकतो, हे दाखवून दिले होते.

पंतप्रधान मोदी यांनी रामलीला मैदानातील जाहीर सभेत प्रचाराचा नारळ फोडताना आवाहन केले, की '८ फेब्रुवारी छुट्टीका दिन नही, राष्ट्रविरोधी राजनीती करनेवालों की छुट्टी करने का दिन है', दिल्लीला सुरक्षित करण्यासाठी, हिंसा व बेबंदशाहीपासून रोखण्यासाठी व २१ व्या शतकातील जागतिक

दर्जाची राजधानी बनविण्यासाठी भाजपला मते देण्याचे आवाहन त्यांनी केले. ध्यानात घ्यावयाची बाब म्हणजे, केंद्र सरकारच्या अधिकाराखाली दिल्लीतील पोलिस व्यवस्था असूनही भाजप दिल्लीला सुरक्षित करण्यात कमी पडला. म हिलांवरील हल्ले वाढले. 'बेटी बचाव' नारा पोकळ ठरला. मतदारांना त्याची जाणीव असल्याने त्यांनी मोदी यांच्या या आवाहनाकडे डोळेझाक केली. दिल्लीतील झोपडपट्टीवासियांना केजरीवाल यांनी आधीच सवलती दिल्याने अनधिकृत झोपडपट्ट्या अधिकृत केल्या जातील, हे भाजपचे आश्वासन फार उशिरा आल्याने त्याचाही प्रभाव पडला नाही. योगी आदित्यनाथ यांनी शाहीनबागला 'मिनी पाकिस्तान' म्हटले व 'केजरीवाल आंदोलकांना रोज बिर्याणी पुरवित आहेत,' असा आरोप केला. आदित्यनाथ तेवढ्यावरच थांबले नाहीत तर, 'आंदोलन करणाऱ्यांना साधी भाषा समजत नसेल, तर गोळ्या घालूनच त्यांना ताळ्यावर आणले पाहिजे,' असा इशारा दिला. आदित्यनाथ यांनी पटपडगंज, किरारी, नरेला, आदर्शनगर, मेहरोली, उत्तमनगर, द्वारका, विकासपुरी, तुघलकाबाद, रोहिणी, करावलनगर, शहादरा, बदरपूर या तेरा मतदारसंघांत विखारी प्रचार केला. त्यापैकी भाजपला फक्त तीन जागा मिळाल्या. परवेश साहब सिंग यांनी तळपातळी गाठत हिंदूंना उद्देशून इशारा दिला, की याच शाहीनबागमधील लोक उद्या तुमच्या घरात शिरून तुमच्या मुली व बहिणींवर बलात्कार करतील. अर्थराज्यमंत्री अनुराग ठाकूर यांनी नारा दिला, 'देश के गद्दारों को' श्रोत्यांनी जोरदार प्रतिसाद दिला, 'गोली मारो सालों को.' कपिल मिश्रा, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग, रविशंकर प्रसाद आदींनीही आंदोलकांना 'टुकडे टुकडे गँग' संबोधून मते वळविण्याचा प्रयत्न केला. गेल्या ५२ वर्षांच्या माझ्या दिल्लीतील वास्तव्यात मी अनेक सार्वत्रिक व विधानसभांच्या निवडणुकांचे वार्तांकन केले; परंतु समाजाला चिथावणारा व विभाजन करणारा असा प्रचार अनुभवला नाही.

अमित शाह यांच्यासह अन्य नेत्यांनी जी मुक्ताफळे उधळली, त्याला मतदार अक्षरशः विटले. सुधारित नागरिकत्व कायदा व राष्ट्रीय नागरिक नोंदणी वहीला विरोध करण्यासाठी पूर्व दिल्लीतील शाहीन बाग येथे १५ डिसेंबर, २०१९ रोजी सुरू झालेल्या मुस्लिम महिलांच्या बैठ्या संपाकडे निर्दे श करून अमित शाह यांनी, प्रचारसभेत चिथावणी देत म तदारांना सांगितले, की मतदान पेटीवर भाजपच्या कमळावर इतक्या जोराने बटन दाबा, की त्याचा शॉक शाहीन बागेतील संपकऱ्यांना बसून ८ फेब्रुवारीला ते पलायन करतील. मुस्लिम ांना आप पक्ष भडकावित आहे व मुस्लिमांचे नागरिकत्व रद्द होईल, असा प्रचार करीत आहे, असा आरोप त्यांनी केला.

भाजप सत्तेत आल्यापासून दलित व मुसलमानांवर होणारे हल्ले वाढले, लिंचिंग सुरू झाले. उच्चशिक्षणासाठी प्रसिद्ध असलेले जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, हैद्राबाद विद्यापीठ, जामिया मिलिया विद्यापीठ, अलीगढ मुस्लिम विद्यापीठ येथे हल्ले झाले. अलीकडे केंद्रीय मंत्री गिरीराज सिंग यांनी 'देवबंद, हे दहशतवादाचे उगमस्थान आहे,' असे भाजपच्या नेत्यांनाही आक्षेपार्ह वाटणारे विधान केले. या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम मतदानावर झाला व आजही होत आहे. मोदींवर टीका करणाऱ्यांना, सुधारित नागरिकत्व विधेयकाला विरोध करणाऱ्यांना व केंद्राला वाटेल त्या व्यक्तिला देशद्रोही ठरविण्याची जणू मोहीमच उघडण्यात आली आहे, असे आजचे चित्र आहे.

दिल्लीच्या निवडणुकांत केजरीवाल यांनी भाजपवर डाव उलटविला. त्यांनीच लोकांना विचारले, की तुमचा मुलगा दहशतवादी आहे असे तुम्हाला वाटते का? त्यांनी मोदी अथवा भाजपच्या अन्य नेत्यांवर वैयक्तिक टीका करण्याचे कटाक्षाने टाळले. शाहीनबागेतील आंदोलकांना हात लावला नाही. कारण, कायदा व सुव्यवस्था हा केंद्राच्या अखत्यारितील विषय होता. त्यामुळे, शाहीनबागेतील आंदोलकांनी भर रस्ता अडवून शांततेच्या मार्गाने संप केल्यामुळे त्यांना हटविण्यास केंद्र सरकारही धजावले नाही. या आंदोलकांना पाठिंबा देण्यासाठी देशातील अनेक शहरांतून उत्स्फूर्त प्रतिआंदोलने, निदर्शने झाली. केंद्र व भाजपच्या राजकारणाला तो एक इशारा होता व आहे. मतदानाच्या दोन दिवस आधी पंतप्रधान मोदी यांनी अयोध्येतील राम मंदिराच्या उभारणीसाठी प्रतिष्ठानाची घोषणा केली. त्यामागे दिल्लीतील मतदाराला भाजपकडे वळविण्याचे गणित होते. गेल्या दोन वर्षात भाजपला मध्यप्रदेश, छत्तीसगढ, राजस्थान, महाराष्ट्र व दिल्ली ही राज्ये गमवावी लागली. गुजरात व हरियानात भाजप काठावर पास झाला. आता बिहार, तामिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यांत विधानसभेच्या निवडणुका व्हावयाच्या आहेत. तेलंगणा, ओडिशा, पंजाब, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, पाँडिचेरी व वर उल्लेखलेल्या सहा राज्यांत बिगरभाजप सरकारे असून, हिंदू-मुस्लिमांत तेढ निम र्ण करणारा प्रचार केल्यास काय होऊ शकते, हे दिल्ली व अन्य राज्यांतील निवडणुकांनी दाखवून दिले आहे. दिल्लीच्या पराभवाचे खापर ना दिल्ली भाजप अध्यक्ष मनोज तिवारी, ना अमित शाह वा प्रकाश जावडेकर यांच्यावर फोडण्यात आले. त्यांच्यापैकी कुणी स्वतः जबाबदारीही स्वीकारली नाही. उलट काँग्रेसचे दिल्लीतील अध्यक्ष सुभाष चोप्रा यांनी पदाचा राजीनामा दिला. सोनिया गांधी, राहुल गांधी व प्रियंका गांधी नावापुरते प्रचारात उतरले. त्यांच्या प्रचारात दम नव्हता. तसेच माजी मुख्यमंत्री कै. शीला दीक्षित यांनी केलेल्या कामाच्या वारंवार केलेल्या उल्लेखाने मत काँग्रेसकडे वळले नाही. वीस वर्षांपूर्वी दिल्लीच्या राजकारणात केवळ भाजप व काँग्रेस हे दोनच पक्ष होते. काँग्रेसची जागा आता पूर्णार्थाने आप पक्षाने घेतल्याचे या निवडणुकीत सिद्ध झाले.

प्रश्न आहे तो दिल्लीव्यतिरिक्त 'आप'चा अन्य राज्यांत विस्तार होणार काय, हा? दिल्लीचे मॉडेल अन्य राज्यांत लागू होणार का? विरोधकांच्या महाआघाडीला बळ मिळणार का?

सहमतीने देशाला मान्य होईल, असे एक नेतृत्व विरोधकातून पुढे येणार का? विरोधकांना भाजपचे नेते कै. अरूण जेटली यांनी दिलेले 'टुकडे टुकडे गँग' हे बिरूद पुसले जाणार का?

केजरीवाल यांच्या राजकारणातील उदयाचे श्रेय सर्वस्वी राष्ट्रव्यापी भ्रष्टाचारविरोधी आंदोलन उभारणाऱ्या अण्णा हजारे यांना द्यावे लागेल. त्यांचा उल्लेख केजरीवाल कुठेही करीत नाहीत, की त्यांच्यावर आपला वरदहस्त आहे, असे अण्णांनी कधी म्हटलेले नाही. केजरीवाल यांनी गेल्या दहा वर्षात आपले राजकारण दिल्लीत केंद्रीत केले. स्वतःला ते हनुमान म्हणतात. निकालाच्या दिवशी ते बाबा खडकसिंग मार्गावरील प्रसिद्ध हनुमान मंदिरात जाऊन आले. भाजप रामभक्त असेल, तर आपण हनुमानभक्त आहोत, हे सांगण्यास त्यांनी पुढेमागे पाहिले नाही. त्यामुळे तेही सौम्य हिंदुत्वाचा वापर करतात, असे निवडणुकीत स्पष्ट दिसले; परंतु भाजपने जसे धार्मिक ध्रुवीकरण केले, ते करण्याचा अथवा भाजप नेत्यांच्या वैयक्तिक आरोपांना केजरीवाल यांनी उत्तर दिले नाही. त्याचा लाभ त्यांना झाला.

दिल्ली विधानसभेच्या पुढील निवडणुका २०२५ मध्ये होतील. तत्पूर्वी २०२४ मध्ये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. केजरीवाल यांना आप पक्षाला टिकवायचे असेल, तर दुपटीने काम करावे लागेल. मोदी यांचा नारा भलेही 'सबका साथ, सबका विकास व सबका विश्वास' असो, पण, तो दिल्लीपुरता प्रत्यक्षात आणण्याचे काम केले असेल, तर ते केजरीवाल यांनी. त्यांचा विरोध भाजप व काँग्रेस या दोन्ही पक्षांना आहे. सारांश, ज्या विरोधी गठबंधनात काँग्रेस असेल, तेथे केजरीवाल जाणे कठीण. शिवाय, त्यांच्या पक्षातून शायजा इल्मी, आशुतोष, स्वराज पक्षाचे योगेंद्र यादव, कायदेपंडित प्रशांत भूषण, किरण बेदी हे नेते बाहेर गेल्याने पक्षाला केवळ केजरीवाल यांच्या करिष्म्यावर अवलंबून राहावे लागत आहे. राजकीय निरीक्षकांच्या मते, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांत केजरीवाल पंजाब व हरियाना या दोन राज्यांव्यतिरिक्त राजकीय वाटचाल करण्याची शक्यता कमी. त्यांचा पक्ष निव्वळ दिल्लीपुरता प्रादेशिक पक्ष आहे. त्यांनी ना डाव्या आघाडीशी ना समाजवादी ना बहुजन समाज पक्षाशी जुळते घेतले. त्यामुळे, 'आप'च्या राजकीय विस्तारावर साहजिकच मर्यादा असणार आहेत.

तात्पर्य, राष्ट्रीय राजकारणाकडे पाहिल्यास भाजपला आव्हान देणारा एकही राजकीय पक्ष आज देशात नाही, की मोदी यांच्याइतका मान्यताप्राप्त नेता विरोधात नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी महाराष्ट्रात भाजपचा अश्व अडविला व भाजपला शह दिला. पण, पवार यांना महाराष्ट्रातील नवा राजकीय प्रयोग यशस्वी करण्यासाठी पुढील पाच वर्षे महाराष्ट्रातच आपली शक्ती लावावी लागेल. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर रामलीला मैदानातील जाहीर सभेत दिल्लीकरांना उद्देशून केजरीवाल उद्गारले, 'आपने गजब कर दिया. आय लव्ह यू.' ते म्हणाले, ज्यांनी भाजप, काँग्रेस व अन्य पक्षांना मते दिली, त्या सर्वांचा मी नेता आहे. मी भेदभाव करणार नाही. त्यांचीही कामे करीन. 'दोन दिवसांपूर्वी त्यांनी गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली, त्यावेळी दिल्लीच्या विकासाच्या संदर्भात मदत करण्याचे आश्वासन शाह यांनी दिले, ही भेटीची जमेची बाजू. प्रत्यक्षात काम होते ते पाहावयाचे.

कळीचा मुद्दा आहे, तो आर्थिक पातळीवर जबरदस्त घसरण चालू असताना मतांसाठी केवळ धार्मिक ध्रुवीकरण करणाऱ्या भाजपच्या राजकारणाला मतदार आणखी किती वर्षे भुलणार? मोदी व शाह यांना सातत्यानं पाठिंबा देणारा मतदार त्यांना प्रगतीबाबत जाब विचारणार की नाही? २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी अयोध्येतील राम मंदिर बांधून पूर्ण झालेले असेल. रास्वसंघ, विश्वहिंदू परिषद, राममंदिरवादी यांचे समाधान झालेले असेल; परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या असतील काय? ७ टक्क्यांवर जाऊ पाहणारे बेरोजगारीचे प्रमाण व चलनवाढीचे प्रमाण आटोक्यात आलेले असेल काय? आर्थिक विकासाची फळे जनतेपर्यंत पोहोचलेली असतील काय, की पुन्हा धार्मिक ध्रुवीकरण, मुस्लिम व दलित द्वेष, विरोधकांना उद्देशून पाकिस्तानचा 'जप', विचारवंतांबाबत अनादर, सरकारी संस्थांच्या अधिकृत आकडेवारीशी खेळ करीत, शिक्षणक्षेत्राचा खेळखंडोबा करीत भाजप आपले घोडे पुढे दामटणार, हे पाहावे लागेल. आपल्या मताशी सहमत नसेल त्या कोणत्याही व्यक्तिविरूद्ध देशद्रोहाचे खटले सरकार लादत आहे, त्यांना ऊठसूट अटक होत आहे. देशद्रोहाचा ठपका ठेवलेल्या व पोलिसांनी केलेल्या कारवाईची संख्या अडीचशेपर्यंत गेली आहे.

जम्मू-काश्मीरचे राजकारण सेनादलांच्या व अटकसत्रांच्या कारवाईत अडकले आहे. तेथे स्थिती सामान्य झालेली नाही. देशातील लोकशाही झपाट्याने संपुष्टात येत आहे काय, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. लोकशाही मार्गाने देशात हुकूमशाही आणता येते, हे माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणी लादून देशाला व जगाला दाखवून दिले होते. तुर्कस्तानचे अध्यक्ष रिसिप ताईप एर्डोहान यांनी नेमके तेच केले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे राजकारण लोकशाहीच्या मूल्यांची प्रतारणा करणारे आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन व चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या शासकीय प्रणालीबाबत अधिक न बोललेले बरे. चीन व रशियातील नेता व पक्ष विरोधकांवर जशी डूख धरून कारवाई होत आहे, किंबहुना त्याचेच अनुकरण देशात होताना दिसत आहे. अशा वेळी देशाच्या राजधानीत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी महाबळकट भाजपविरूद्ध दिलेला धडा महत्त्वपूर्ण ठरतो, यात शंका नाही. ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार असून ते नवी दिल्ली येथे कार्यरत आहेत.)**


# भाजपचा भुसा... दिल्लीचा दणका



जयदेव डोळे

अरविंद म्हणजे कमळ! दिल्लीत एका कमळाने दुसऱ्या कमळाचा पराभव केला!! नुसता पराभव म्हणणे अनुचित. चारीमुंड्या चीत, नेस्तनाबूत, अस्मान दाखवले किंवा थोबाड फोडले असा आक्रमक शब्दप्रयोग करावा इतका हा विधानसभा निवडणुकीतला लाजीरवाणा अन् केविलवाणा पराजय होता. गंमत म्हणजे भाजपने ओढवून घेतलेली ही नामुष्की. दिल्ली विधानसभा केवळ ७० जागांची. शहराची लोकसंख्या एक कोटीवर. तीन महापालिकांचा कारभार या शहरात आहे. तिन्ही मनपा भाजपच्या ताब्यात. केंद्र सरकार गेली सहा वर्षे भाजपकडेच. तरीही दिल्लीचे तख्त ताब्यात नाही घेता आले या पक्षाला. हत्ती चालत निघाले की अनेक कुत्री भुंकत राहतात; हत्ती त्यांच्याकडे दुर्लक्ष करून पुढे जात राहतो असा अहंकार भाजपचे नेते विरोधी पक्षांच्या टीकेच्या अनुषंगाने व्यक्त करायचे. झाले काय? आम आदमी पार्टीचा कुत्रारुपी झाडू हत्तीच्या ताकदीला ना भ्याला, ना लपून राहिला. रस्त्यावरच्या स्वतंत्र, स्वाभिमानी कुत्र्यांनी सत्तेच्या सोनेरी साखळदंडात जखडलेल्या सरकारी हत्तीलाच पळवून लावले! हा सरकारी हत्ती कमालीचा ऐतखाऊ अन् दिखाऊ बनून गेल्याचे त्याच्या माहुतालाही समजू शकले नाही. माहूत मश्गुल राहिल्याचे कारण तो गेली पाच वर्षे खालीच उतरलेला नाहीय. जमिनीवरचे वास्तव त्याला कळलेले नाहीय!

भाजप आणि तो जिथून जन्मला तो संघ परिवार भ्रमात जगणारी एक जमात आहे. ते स्वतःला खूप हुशार व चतुर समजतात. खरे तर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतच भाजपची भुसभुशीत जमीन दिसू लागली होती. पण पुलवामातल्या दहशतवादी हल्ल्याने केंद्रीय राखीव पोलिस बलाच्या ४५ जवानांचा बळी पडला आणि लोकभावना भाजपच्या बाजूने गेली. नाजूक क्षणी सरकार बदलून चालत नसते, असा सूज्ञ विचार भारतीय मतदार करू लागला. त्याने पुन्हा मोदींना जिंकवले. तब्बल ३०३ जागा देऊन टाकल्या. पण राष्ट्रवाद रिकाम्यापोटी घोषणा किती देऊ शकेल? रिकामे हात, रिकामी पोटे व रिकामी डोकी भावनिक मुद्दे फार काळ घोळवू शकत नसतात. मोदी सरकार ठोस काही न करता घोषणा घोळवत राहते हे समजताच आधी महाराष्ट्र व मग दिल्ली भाजपने गमावली. त्याआधी झारखंडही.



मतदानाची व राजकारणाची विद्वान चर्चा करू लागले, की मतदार किती चलाख! तो देशासाठी वेगळे मतदान अन् राज्यासाठी वेगळे मतदान करतो. किती समतोल, केवढा विचारी तो! एका वर्षात त्यानं महाराष्ट्र, झारखंड, दिल्ली येथून भाजपची भंबेरी उडवली. पुरता भंजाळला भाजप. नव्याने सरकार स्थापन करताच मोदी-शाह दुकलीने देशाला काय दिले? कोणती मागणी नसताना कश्मीरबाबतचे ३७० कलम काढून टाकले. तिहेरी तलाकचा प्रश्न कधीही उग्र बनला नसताना तो तसा भासवून तोही बेकायदा ठरवला. दरम्यान, अयोध्येच्या राममंदिराला सर्वोच्च न्यायालयाने मोकळीक दिली. त्यासंबंधी मोदी सरकार आपली पाठ थोपटून घेऊ लागले. घटनात्मक शर्तींचा भंग करून धर्माच्या आधारावर नागरिकत्व बहाल करण्याची घोषणा दुरूस्तीद्वारे करून टाकली. हे निर्णय म्हणजे जणू घोडामैदान मारले असा थाट मोदी-शाह करू लागले. ही दुक्कल करतीय म्हणजे उरलेल्या सरकारी सोबत्यांना आणखीन जोरात करावी लागणार. झारखंड, महाराष्ट्र आणि दिल्ली विधानसभांच्या निवडणुकांत हे तीन-चार मुद्दे जणू या राज्यांचा चेहरामोहरा बदलणार असे वातावरण भाजपने तयार केले. पण ते थोडेच पचनी पडणार? राज्याच्या कारभारात त्यांचा काय संबंध?

बेकारी, महागाई, मंदी, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, शेतकऱ्यांच्या समस्या, नुकसान भरपाई आदी कित्येक नेहमीचे मुद्दे राहिले बाजूला, त्याजागी मुसलमानांशी नाते सांगणारे हे प्रश्न जोशात मांडले जाऊ लागले. बेकारीशी मुस्लिमांचा काय संबंध? भ्रष्टाचाराचे हिंदू-मुस्लिम प्रश्नाशी कोणते नाते? कश्मीरचे ३७० कलम आणि ३६५ दिवस छळणारे महागाईचे मुद्दे कसे काय जुळणार? भारतीय मतदार जरा बुचकळ्यात पडला. मग सावरला अन् मनाशी म्हणाला, बस्स! हा तर परस्परांत द्वेष जागवायचा खटाटोप. काही कारण नसताना मनामनांत तिरस्कार उत्पन्न करायची ही धडपड. सावधान मतदार राजाहो!

त्यात भाजप भन्नाट आरोप करीत सुटला. केजरीवाल दहशतवादी आहेत असे केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर म्हणाले. दुसरे मंत्री अनुराग ठाकूर 'देश के गद्दारों को' असे म्हणायचे आणि 'गोली मारो सालों को' असे उत्तर श्रोत्यांकडून वदवून घ्यायचे. खुद्द पंतप्रधानांनी रामलीला मैदानातल्या सभेत 'एनआरसी' ची चर्चा मंत्रिमंडळात झालीच नाही असे खोटेच रेटून दिले.

खासदार प्रवेश वर्मा यांनी शाहीनबाग आंदोलक घरात शिरून बलात्कार करत सुटतील असा भयकंप उत्पन्न करू पाहिला. 'शाहीनबाग एक संयोग नही, एक प्रयोग है' असे नरेंद्र मोदींनी म्हटले आणि मुसलमान नागरिक कसे बेकाबू होत आहेत असे सुचवले. दिल्लीतले पाणी-वीज-वाहतूक, आरोग्य हे विषय सत्ताधारी काढेचनात! झाले, मतदार बिथरले आणि त्यांनी ७० पैकी ६२ जागा 'आप'ला जिंकून दिल्या. भाजप तीनवरून आठवर पोचला. प्रचारात उतरलेले मोदी, शाह आणि २०० खासदार, ३० मंत्री, सहा मुख्यमंत्री यांची तोंडे लाल झाली. अमितभाई तर म्हणे १० फेब्रुवारीच्या रात्रीपर्यंत ४५ जागा जिंकून भाजप सत्तेत येणार अशा धुंदीत होते. चार दिवसांनी ते ताळ्यावर आले.

का झाले असे? अमाप पैसा, अफाट कार्यकर्ते आणि सरकारी अप्रत्यक्ष ताकद असूनही भाजपचा असा खात्मा लोकांनी का केला? महाराष्ट्रात १०५ आणि झारखंडमध्ये २५ आमदारांवर भाजपला ब्रेक का लागला? तिथे मुख्यमंत्रीच निवडणुकीत का पडले?

भारतीय जनता पक्ष अत्यंत मर्यादित, संकुचित आणि हिणकस राजकारण करणारा आहे हे त्याने २०१९ या एका वर्षांत दाखवून दिले. पाकिस्तान, दहशतवाद आणि भारताची महासत्ता या मुद्यांवर तो वाट्टेल तेवढा बोलू शकतो. मात्र जनतेची रोजीरोटी, जीवनावश्यक सेवासोयी व भावी पिढ्यांची निश्चिंत वाटचाल याबद्दल त्याला काही सुचत नाही हेही सिद्ध झाले. याचे कारण संघाच्या शाखांतल्या बौद्धिकांमध्ये सापडते. या शाखांनी तयार केलेले प्रचारक अर्थशास्त्र, विज्ञान, पर्यावरण, बदलणारा समाज, आंतरराष्ट्रीय राजकारण, साहित्य, कला, आरोग्य, उद्योगधंदे अशा कैक विषयांत ढ असतात. भावनिक प्रचारात कुशल बनतात व राष्ट्रवाद, देशप्रेम, शत्रुराष्ट्र, मातृभूमी, सुरक्षा इत्यादी अमूर्त विषय उगाळत बसतात. वास्तवात कधी उतरतच नाहीत.

एकदा का 'राष्ट्रीय' मुद्दे तोंडात घोळवायची सवय जडली, की पाणी-वीज-रस्ते आदी सामान्य माणसांच्या गरजा तुच्छ वाटू लागतात. ते विषय हाताळणे कमीपणाचे भासू लागते. आधी देशाची काळजी, नंतर आपल्या कुटुंबाची असा आवेश तयार केला जातो. मात्र असा प्रचार करणारे पाहिल्यास ते कधीही उपाशीपोटी दिसत नाहीत, ना ते अर्धपोटी असतात. त्यांचा प्रचारकाचा थाट सांभाळायला त्यांचे पोट आधी भरायची जबाबदारी अनेकांवर असते. त्याप्रमाणे दिल्लीत ३७० कलम, तीन तलाक, नागरिकत्व हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मुद्दे खूप उधळले गेले. मात्र सारे मुसळ केरात!

दिल्ली प्रदेश भाजपत विजयकुमार मल्होत्रा, डॉ. हर्षवर्धन, मनोज तिवारी असे तीन गट आहेत. तिवारी भोजपुरी नट असून मल्होत्रा-हर्षवर्धन यांच्यापेक्षा खूप अनुभवी आहेत. दुसरे, सुषमा स्वराज, अरूण जेटली, मदनलाल खुराणा यांसारख्या सर्वसमावेशक वृत्तीचे नेते निधन पावल्याने भाजपकडे अतिरेकी विचार बोलणारे नेते वाढत चालले. म्हणजे माध्यमांत प्रसिद्धी खूप, मात्र खाली पाठबळ अत्यल्प असा भाजपचा नेतावर्ग होत चालला. प्रदेशाध्यक्ष तिवारी मग 'आप'पेक्षा पाचपट कमी पैशात वीज, पाणी देण्याच्या गोष्टी करू लागले. बकवास असेच वर्णन नागरिक करीत राहिले. फुकट वीज मिळत असताना पाचपट फुकट प्रकार काय असतो? लोक वैतागले. २०१५ च्या निवडणुकीत मुख्यमंत्री म्हणून अचानक किरण बेदी यांना उतरवणारा भाजप तीन जागांवर ढकलला गेला. यंदा एकही व्यक्ती या पदासाठी भाजपने पुढे आणली नाही!

अरविंद केजरीवाल यांचे वैशिष्ट्य हे, की त्यांनी भाजपच्या आरोपांच्या फैरी सरळ अंगावरून बाजूला जाऊ दिल्या. केवळ विकास व स्थानिक मुद्दे यावर आपण बोलू असे केजरीवाल ठरवत राहताच भाजप थकून गेला. खेरीज भाजपच्या नेहमीच्या विभाजनकारी, फूटपाड्या व विषारी प्रचाराचा मतदारांना फार त्रास होऊ लागला होता. दिल्लीत जातीय तणाव उद्‌भवणे कोणाला परवडेल?

अमित शाह यांची अवाजवी तारीफ देशभर होत चालली होती; पण झारखंड, दिल्ली यांनी ती धुळीस मिळवली. लागोपाठच्या निवडणुकांत विजय मिळवून देणारा कूटनीतीतज्ज्ञ असा लौकिक शाह यांनी माध्यमांकडून प्राप्त केला. पण अतिआत्मविश्वास असो, की हरभऱ्याच्या झाडावर बसवणे, शाह यांना आत्मलुब्ध होणे फार तोट्यात गेले. 'भारत कैसे हुआ मोदीमय' या शीर्षकाचे एक पुस्तक संतोषकुमार नामक एका पत्रकाराने लिहिलेय. 'ऐतिहासिक जीत की अंतर्व्यथा' असा त्याचा आशय शाह व मोदी यांनी भाजपचा निवडणुकांमधील विजय कसा पद्धतशीर, अचूक, कल्पक आणि आक्रमक केला याभोवती फिरतो. हा पत्रकार मुळीच फिकीर न करता मोदी-शाह यांच्या कौतुकात बुडून जातो आणि 'निवडणूकशास्त्र' कसे भारतात या दोघांनी रुजवलेय ते सांगत राहतो. ते वाचल्यावर साहजिकच झारखंड, दिल्ली, महाराष्ट्र येथे भाजपने सत्ता का गमावली याचे आश्चर्य वाटत राहते. पन्नाप्रमुख काय, बुथवार संघटन काय, जातवार मेळावे काय अन् कॉलेज ॲम्बॅसीडर काय, भाजपची एवढी सज्जता थक्क करणारी आहे.

सोशल मिडियामधून बेशरम असत्य, अफवा आणि अर्धसत्य पसरवले जाऊ लागले ते वेगळेच. सरकारी कार्यक्रम व पक्षाचा प्रचार यांमधील भेद पुसला जाऊ लागला. प्रत्येक निवडणूक फक्त आणि फक्त मोदी या व्यक्तीभोवती एकवटण्यात आली. त्याचबरोबर काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष यांवर हिणकस, मानभंग करणारे आणि विकृत आरोप सुरू झाले. या पक्षाचा अवमान, हा त्यांना मानणाऱ्यांचाही असतो याचा विसर भाजपला पडलाय.

प्रचार हा संघ परिवाराचा कणा! त्याच्या शब्दागणिक परिवाराचे ब्राह्मण्य प्रकटते. तुच्छता, अवमान व स्वश्रेष्ठत्व

ज्यांमधून प्रकटते ती भाषा ब्राह्मण्याची असते व आहे. बाकीचे पक्ष ब्राह्मणी वर्चस्वापासून मुक्त झाले. भाजप मात्र कधीही होणार नाही. कारण ब्राह्मण्य म्हणजे अभिजन लोकांची सत्ता हेच त्यांचे अंतिम उद्दिष्ट असते. जाती हटविल्या तर सारा हिंदू धर्म कोसळून पडतो हे संघ जाणतो. पक्षही जाणतो. म्हणून भाजप जातिव्यवस्थेवर कधीही हल्ले करीत नसतो. मात्र मोदी-शाह यांनी केलेला एक प्रयोग त्यांच्या फार अंगलट आला. साधारणपणे सारे प्रादेशिक पक्ष त्या त्या प्रदेशातल्या बहुसंख्य व बलाढ्य जातींनी बनलेले असतात. जमीन, शेती, संस्था, उद्योगधंदे, व्यापार, शिक्षण इत्यादी गोष्टींवर त्या जातीचा अमल असतो. सबब, सत्तेवरही तिचाच कब्जा असतो. मात्र या 'सर्वज्ञ' दुकलीने त्या त्या बलाढ्य जातीऐवजी छोट्या, अल्पसंख्याक जातीला मुख्यमंत्री करणे आरंभले. आरंभी या प्रयोगाचे कौतुक झाले. नंतर मात्र त्या बहुसंख्याकांना अन्याय वाटू लागला. जी जी राज्ये मोदी व शाह यांनी गेल्या दोन वर्षांत गमावली ती सारी त्यांच्या या अचाट युक्तीमुळे! त्याचबरोबर जात, धर्म, भाषा हे मुद्दे जीवनव्यवहार चालवायला कुठवर ताणायचे याचे तारतम्य सामान्य मतदार करीत असतो, याचाही या दुकलीला अंदाज आला नाही. तो येईलच कसा? अवघी वृत्तपत्रे, टीव्ही तिला खरे काही सांगू शकत नव्हती. खरे व वस्तुस्थितीचे बोलणेच विसरून गेलेली ही माध्यमे त्यांच्या दावणीबाहेर जातीलच कशी? झाले, या दोघांच्या अतिशहाणपणामुळे भाजपचे थोबाड फुटले.

सत्तेमुळे पैसा व पैशामुळे सत्ता हे कुचक्र भाजपला थांबवता आलेले नाही. त्यामुळे या कुबड्या भाजपला लाखो खुशमस्करे, तोंडपुजे व विदूषक देऊन बसल्या. ना या पक्षापाशी परखड बोलणारे विद्वान व अभ्यासक, ना तो कधी कुणाचे ऐकून घेतो. ब्राह्मण्याचे वैशिष्ट्य हे असते, की ते शीर्षस्थानी असल्याने आपापतः स्वतःचे निर्दोषत्व ठरवत असते. वास्तव जवळ केल्याने त्यावर डाग पडतो. आपल्या चुका कबूल केल्यास एक पायरी खाली उतरावे लागते याचे भय त्यास असते. म्हणून भाजपचे सातत्याने पराभव होत आहेत. मूळची नकारात्मक विचारांमधून जन्मलेली संघटना व त्याची भाजपसारखी संतती आत्मरत व स्वनामधन्य असणारच. आत्मप्रौढी गाजवत राहणे ही त्यांना मिळालेली शिकवण आहे. पोकळ आशावाद जागवत राहणे ही सर्वश्रेष्ठत्व टिकवून ठेवण्याची एक केविलवाणी युक्ती असते. ती भाजपला भोवते आहे, भोवणार आहे.

भारतीय जनता पक्ष भारतीय जनतेविरूद्ध भांडणारा पक्ष झाला आहे काय? त्याचे भांडण भारतीय विद्यार्थ्यांशी, भारतीय मुसलमानांशी, भारतीय दलितांशी, भारतीय आदिवासींशी, भारतीय कलावंत-साहित्यिक-विचारवंत यांच्याशी! असा सत्ताधारी पक्ष जगात कुठे असेल काय, जो आपल्याच नागरिकांना सदोदीत राष्ट्रद्रोही, शत्रुशी संगनमत करणारे आणि संशयित ठरवत राहतो? टीका, भाष्य या गोष्टी केवळ राजकीय पक्ष करीत नसतात. ते करणारे लोक स्वतंत्र विचारांचे असून त्यांना कोणताही पक्ष जवळचा नसतो. मात्र भाजप आपल्या चुका झाकायला आधार कशाचा घेतो, तर आपल्याला विरोध करणाऱ्या राजकीय पक्षाचा. एकदा का टीकाकारांना त्या पक्षांशी जोडून टाकले की त्यांची बदनामी होत राहील आणि आपले हित साधेल या भ्रमात भाजप कसा काय राहू शकतो, कळत नाही.

एनआरसी, सीएए व एनपीआर यांचा प्रभाव या निवडणुकांवर पडला काय? नक्कीच पडला. कारण या तीन गोष्टींनी देशामधील १८-२० टक्के मुसलमान आणि आसाम व बंगाल येथील लक्षावधी हिंदू काळजीत पडले. एवढा मोठा जनसमुदाय अस्थिर, असुरक्षित व अशांत होत राहतो, त्याचा देशावर परिणाम होणारच ना? नाही कितीही म्हटले तरी मुसलमानांच्या चिंता त्यांच्या मित्रांवर, शेजाऱ्यांवर आणि परिचितांवर प्रभाव पाडणारच. त्यामुळे चिंतातुर झालेला देश विचार काय करील, याला कोण जबाबदार याचा. काही कारण नसताना उकरून काढलेल्या विषयाचा.

भाजपने समजा आर्थिक प्रश्नाचा एखादा तोडगा काढून वाद उत्पन्न केला असता तर काय झाले असते? देश एवढा अस्थिर झाला असता काय? त्या मुद्यावर चर्चा, विवाद, बाजू, मतमतांतरे होऊन काहीतरी सर्वमान्य निष्कर्ष निघाला असता. पण नागरिकत्वाचा प्रचार करायचा मुद्दा निवडून विधानसभा जिंकायला निघालेला भाजप ऐकून घेईल कोणाचे? देशात घुसखोर असतील ते हाकललेच पाहिजेत. पण कोणी पोट जाळायला आला असेल तर त्याचे काय करणार? मानवतावादी कायद्यांच्या आधारावर अशा घुसखोरांचे काय करायचे ते ठरले आहे. रोहिंग्या मुसलमान म्यानमारचे बौद्ध सरकार छळू लागल्याने भारतात पळून आले. मग त्यांना का परत पाठवण्याची कारवाई सुरू झाली? त्यांचाही छळच झाला ना? तो धार्मिक मुद्यावरच झाला ना? या मुद्याचा वापर कोणी दहशतवादी कारवायांसाठी करू शकते. मात्र त्यासाठी पोलिस व सेना दले जागरूक पाहिजेत. एकदम अफगाणिस्तान, बांगलादेश, पाकिस्तान येथून हिंदू, ख्रिश्चन, पारशी, शीख, जैन, बौद्ध यांचे लोंढेच्या लोंढे भारतात येऊ लागले असे कधी भारतीयाला समजावले काय? इतकी संख्या देशात आली, म्हणून घटनादुरूस्ती केल्याचे मतदारांना प्रचारात मोदी-शाह यांनी सांगितले का?

त्यामुळे गंमत अशी, की आधी आमच्या समस्यांना तोडगा द्या, मग बाहेरून आलेल्यांना काय द्यायचे ते द्या, असा रोकडा विचार भारतीय मतदार करू लागले, तेव्हा काय घडते? तेव्हा भाजप नावाच्या तथाकथित पोलादी चौकटीचा भुसा होतो! अमूर्त, अप्रत्यक्ष व संदिग्ध समस्यांचा प्रचार कानठळ्या बसतील असा केला तरी खऱ्याखुऱ्या प्रश्नांचा दणका बसून या प्रचाराचा चक्काचूर होतो..... ●●●

**(लेखक ज्येष्ठ विचारवंत आणि पत्रकार आहेत.)**



ग्रामीण आणि कृषी क्षेत्रासाठी अपुरे नियोजन केल्यामुळे देशात गरिबी आणि विषमतेची दरी वाढणार आहे.

# गरिबी आणि विषमता वाढवणारा अर्थसंकल्प



सुरेश गायकवाड

सर्वसामान्य जनतेसाठी २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात विशेष असे काहीही नाही. एफडीआयच्या माध्यमातून परदेशी गुंतवणुकीला चालना देऊन शिक्षणाचे बाजारीकरण करून गोरगरीब आणि शोषितांच्या मुलामुलींसाठी शिक्षणाची दारे बंद करण्याचे काम सरकार करत आहे. **एलआयसी आणि रेल्वेचे खाजगीकरण, अनुसूचित जाती-जमातीसाठीच्या निधीमध्ये प्रचंड कपात, ग्रामीण आणि कृषी क्षेत्रासाठी अपुरे नियोजन आणि खाजगीकरणाला अवास्तव महत्त्व, यामुळे देशात गरिबी आणि विषमतेची दरी अजून जास्त वाढणार यात काही शंका नाही. हा अर्थसंकल्प 'सबका साथ, सबका विकास' च्या विपरित आहे.**

नोटाबंदी आणि जीएसटीमुळे अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडल्यानंतर राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाच्या (एनएसएसओ) सर्वेक्षणानुसार तयार झालेल्या बेरोजगारीचा अहवाल सरकारकडून मुद्दाम जाहीर करण्यात आला नाही; परंतु बिझनेस टुडे ह्या व्यावसायिक पाक्षिकाच्या मते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नोव्हेंबर २०१६ मधील नोटाबंदीच्या घोषणेनंतर एका सरकारी एजन्सीने केलेल्या रोजगारविषयक सर्वसमावेशक सर्वेक्षण अहवालानुसार, २०१७-२०१८ मधील बेरोजगारीचा दर ६.१ टक्के इतका आहे, जो चार दशकांतील सगळ्यात जास्त आहे. दोन कोटी रोजगार प्रतीवर्षी निर्माण करू असे सांगून सत्तेत आलेल्या सरकारने नोटाबंदी करून लाखो छोटे-मोठे उद्योग देशोधडीला लावले. यामुळे कोट्यवधी लोकांचे रोजगार गेले. अशा ह्या भयंकर बेरोजगारीचे परिणाम म्हणून बेरोजगारांमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. ही संख्या आता शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संख्येपेक्षाही अधिक झाली आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीनुसार, २०१८ मध्ये आत्महत्या केलेल्या बेरोजगारांच्या संख्येने, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या ओलांडली आहे. मागील दोन वर्षांत एकूण १२,९३६ बेरोजगारांनी आपले जीवन संपविले, तर १०,३४९ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवले. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या ताज्या आकडेवारीनुसार, २०१७-१८ मध्ये ही संख्या एकूण आत्महत्येच्या प्रमाणात १० टक्के इतकी मोठी आहे.

२०१७ मध्ये झालेल्या एकूण आत्महत्यांपैकी ९.४ % (१२,२४१) आत्महत्या बेरोजगारांच्या आहेत, तर शेती क्षेत्रामधील आत्महत्या ८.२% (१०,६५५) आहेत. २०१६ मध्ये एकूण १,३१,००८ आत्महत्यांपैकी ८.% (११,३७९) आत्महत्या ह्या कृषी क्षेत्रात झाल्या, ज्या बेरोजगारांच्या आत्महत्यांपेक्षा अधिक होत्या. २०१६ मध्ये बेरोजगारांच्या आत्महत्येचे प्रमाण ८ % (११, १७३) इतके होते. बेरोजगारांनी



**दीडशे लांब पल्ल्याच्या मार्गावर १०० रेल्वे खाजगी भागिदारीने चालवण्याचा निर्णय सरकारने घेतल्यामुळे सर्वात स्वस्त असलेला हा प्रवास गरिबांसाठी त्रासदायक ठरणार आहे.**

केलेल्या आत्महत्यांपैकी बहुसंख्य लोक हे रोजगार निर्मितीमध्ये अग्रेसर असणाऱ्या प्रगत राज्यांमधील आहेत. केरळमध्ये १,५८५ बेरोजगारांनी आत्महत्या केल्या. त्याखालोखाल तामिळनाडू (१,५७९), महाराष्ट्र (१,२६०), कर्नाटक (१,०९४) आणि उत्तर प्रदेश (९०२) या राज्यांचा क्रमांक लागतो.

बेरोजगारीचे स्वरूप हे इतके गंभीर असतानादेखील सरकारकडून कोणतेही विशेष प्रयत्न होताना दिसत नाहीत. अनेकांची २०२०-२१ च्या अर्थसंकल्पावर आशा होती. या अर्थसंकल्पात आर्थिक मंदी आणि बेरोजगारीवर काही ठोस निर्णय घेतले जातील आणि अर्थव्यवस्थेला गती मिळेल, अशी अशा बाळगून असताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अडीच तासांच्या भाषणाव्यतिरिक्त अर्थसंकल्पात विशेष काहीही नव्हते. विशेष म्हणजे, सरकार महागाई, बेरोजगारी आणि मंदी ह्या अर्थव्यवस्थेच्या समस्या मान्यदेखील करत नाही.

२०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील आकांक्षा, विकास, करुणा या तीन विषयांचा अविभाज्य भाग असल्याचे सांगून शिक्षण क्षेत्रासाठी ९९,३०० कोटी रुपये देण्यात आले आहेत, ज्यासाठी २०१९-२० च्या अर्थसंकल्पात ९४,८५३.६४ कोटींची तरतूद करण्यात आली होती. यात संख्येने जरी वाढ दिसत असली तरी प्रत्यक्षात मात्र तसे नाही. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीआधी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना १०% आरक्षण दिल्याने शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये शिक्षक, विद्यार्थी आणि संसाधनांमध्ये वाढ करावी लागली. परिणामी शिक्षणावरील खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. ही वाढ लक्षात घेता सध्या शिक्षणासाठी राखीव निधी खूप कमी आहे.

याव्यतिरिक्त गेल्या ५ वर्षात मोदी सरकारच्या काळात जीडीपीच्या टक्केवारीच्या तुलनेत शिक्षण क्षेत्रावरील खर्च कमी झाला आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयाने २०१४ ते २०१९ या कालावधीसाठी त्यांना उपलब्ध करून दिलेले ४ लाख कोटी रुपये खर्च न केल्याने अर्थसंकल्पीय उद्दिष्टे पूर्ण करण्यात हे मंत्रालय अपयशी ठरले. मागील काही वर्षांत शिक्षणावर खर्च झालेल्या जीडीपीची टक्केवारी जवळपास ३ टक्क्यांवर कायम आहे. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी (सीएमआयई) च्या अहवालानुसार, २०१४-१५ मध्ये मोदी सरकारने खर्च न केलेली रक्कम १७ टक्के होती, जी गेल्या दहा वर्षांतील सर्वाधिक आहे. सन २०१६ मध्ये मंत्रालयाने वाटप केलेल्या रकमेपैकी ९७.३४ टक्के खर्च केला, तर २०१७ च्या आर्थिक वर्षात हे प्रमाण किरकोळ वाढून ९९.४८ टक्क्यांवर गेले. वित्त वर्ष २०१८ मध्ये, मनुष्यबळ विकास मंत्रालयाला त्याच्या बजेटच्या वाटपापेक्षा जास्त खर्च करण्यात यश आले. मंत्रालयाने त्यांना देण्यात आलेल्या ७९,६८५.९५ कोटी रुपयांच्या तुलनेत ८०,२१४.६७ कोटी रुपये खर्च केले, ज्यामध्ये ०.६६ टक्क्याची किरकोळ वाढ आहे. सन २०१९ मध्ये मंत्रालयाने वाटप केलेल्या रकमेपैकी ९८.३७ टक्के खर्च केला. शैक्षणिक निधीच्या वाटपाचे प्रमाण वाढले; परंतु मनमोहनसिंग सरकारप्रमाणेच मोदी सरकारच्या काळातही शिक्षणावरील राखीव निधी खर्च करण्यात सरकार अपयशी ठरले.

२०१९-२० मध्ये प्रभारी अर्थमंत्री पीयूष गोयल यांनी शिक्षण क्षेत्रासाठी ९३,८४७.६४ कोटी रुपये वाटप करण्याची घोषणा केली, जी मागील वर्षी देण्यात आलेल्या ८५,०१०.२९ कोटींपेक्षा १० टक्के जास्त आहे; परंतु ही वाढ होण्याचे कारण असे आहे, की सरकारने उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) कोट्यासाठी १० टक्के आरक्षण जाहीर केले, ज्यामुळे केंद्रीय विद्यापीठांमधील २५ टक्क्यांच्या जागांमध्ये वाढ झाली.

सरकार एकीकडे जागतिक दर्जाची विद्यापीठे तयार करायचं म्हणत आहे; परंतु शिक्षणावर पुरेसा खर्च करताना मात्र दिसत नाही. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (ज्याची लवकरच अंमलबजावणी होणार आहे), सरकारने शिक्षणाचे बाजारीकरण करण्याचे ठरविले आहे. म्हणूनच २०२० च्या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्राला वित्तपुरवठा करण्यासाठी सरकारने बाह्य व्यावसायिक कर्ज आणि परकीय थेट गुंतवणुकीची मदत घेण्याचे ठरविले आहे. अर्थात, सरकारी शिक्षण संस्थांचे खाजगीकरण आणि बाजारीकरण करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. उद्योगपती गुंतवणूक केवळ नफा कमावण्यासाठी करत असतात. म्हणून येणाऱ्या काळात जर सरकारी शिक्षणात खाजगी गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर झाली तर सरकारी शिक्षण महाग होणार. शिक्षणासाठी लोकांना लाखो रुपये मोजावे लागतील. गोरगरिबांना शिक्षण परवडणार नाही. विशेष करून दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्गीय समाज शिक्षणापासून कायमचा वंचित राहील; परंतु सरकारी शिक्षणाचे बाजारीकरण सरकारला सोपे जाणार नाही. २०१९ मध्ये शुल्कवाढीविरुद्ध देशभरातील विद्यार्थ्यांनी आंदोलने करून सरकारची डोकेदुखी वाढवली. शेवटी सरकारला शुल्कवाढ मागे घ्यावी लागली. म्हणून येणाऱ्या काळात सरकारी शिक्षण संस्थांमधील खाजगी

# अर्थसंकल्पात 'सामाजिक न्याय' कुठे आहे ?

समाजातील असमानता नष्ट करण्यासाठी लक्ष केंद्रीत करणारे सरकार खऱ्या व चिरंतन विकासाकडे घेऊन जाणारे सरकार असते; परंतु या अपेक्षा पूर्ण करण्यात मोदी सरकार अपयशी ठरले आहे. २०२० च्या अर्थसंकल्पात सामाजिक न्यायासाठी म्हणून केली जाणारी तरतूद अत्यल्प असल्याने सामाजिक न्यायाच्या बाबतीत सरकार गंभीर नसल्याचे स्पष्ट झाले आहे. २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात सामाजिक न्याय विभागाला न्याय देण्यात सरकार अपयशी ठरल्याचे यावरून दिसून येते. वंचित घटकांसाठीचे अर्थसंकल्पातील स्थान त्यांना अधिक मागे नेणारे आहे. कारण मागील अर्थसंकल्पात सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विषयावरील आर्थिक तरतूद ११ टक्क्यांनी कमी करण्यात आली होती. ती या अर्थसंकल्पात केवळ २ टक्के वाढवण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात दिव्यांग आणि वृद्धांसाठीची तरतूद एकत्रित जाहीर करण्यात आली आहे. यातून कोणत्या घटकाला किती निधी मिळणार हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे समाजातील या घटकांसाठीची सरकारची जबाबदारी किती संदिग्ध आहे हे दिसून येते. गाव, गरीब आणि शेतकरी आर्थिक धोरणाच्या केंद्रस्थानी राहील, असे आश्वासन सरकारने दिले होते. मात्र त्यासाठी या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली नाही. अंगणवाड्या वाढविण्यासाठी तरतूद करण्यात आली, पण तिथं काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांसाठी पुरेसा आणि वेळेवर पगार देण्याबाबत सरकारची भूमिका संदिग्ध आहे. त्यामुळे अंगणवाड्या प्रत्यक्षात चालणार कशा, असा प्रश्न विचारला जात आहे. मलनिस्सारणासाठी यांत्रिक वापर करण्यावर आर्थिक तरतूद करताना मैला वाहून नेणाऱ्या माणसाचे पुनर्वसन करणे महत्त्वाचे आहे. मात्र याचा सरकारला सोयीस्कर विसर पडल्याचे दिसते. खाजगी भागीदारीच्या सहभागाने वैद्यकीय महाविद्यालये आणि दवाखाने उभारले तर आर्थिकदृष्ट्या कमकुवत आणि गरीब वर्गाला आरोग्य अधिकारासारखा मूलभूत हक्क मिळण्याबाबत आता अडचण निर्माण होऊ शकते. सामाजिक स्वास्थ्य आणि सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या बाबींमधून कार्पोरेट हित जपण्यासाठी सरकारने प्रयत्न करणे ही बाब अन्यायाला सुरुवात ठरू शकते. सामाजिक न्यायासाठी सरकारने अंगणवाडी, पोषण आहार, आरोग्यविषयक योजना यासाठी जास्तीची आर्थिक तरतूद करायला हवी होती, ती केलेली दिसत नाही.

मागासवर्गीय आणि आदिवासी यांच्यासाठीची तरतूद वाढविली जावी ही अपेक्षा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पूर्ण होत असते, हे या अर्थसंकल्पातने अधोरेखित केले आहे. स्वच्छ भारत आणि महिला विकासाच्या नावाखाली जाहिरातींवर प्रचंड खर्च केला जातो. दुसरीकडे, मात्र उपेक्षित घटक अपुऱ्या तरतुदीमुळे उपेक्षितच राहत असतात. गोरगरिबांना जीवन जगणं सुलभ करणे सरकारचे कर्तव्य असते; परंतु सामान्यांपेक्षा उद्योग व्यवसायांना या अर्थसंकल्पात सोयी-सुविधा निर्माण करून देण्याचा संकल्प सरकारने केलेला दिसतो. समाजातील सर्वांना रोजगाराच्या समान संधी मिळाव्यात आणि समाजात समता प्रस्थापित व्हावी अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जवळपास ९० वर्षांपूर्वी मांडली होती. त्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले; परंतु त्याचे प्रतिबिंब आजही उमटताना दिसत नाही. 'समान काम समान वेतन' हा कायदा येऊन पाच दशकं होत असली तरी सारख्या कामाला सारखे वेतन अजूनही मिळत नाही. याला सरकारची उद्योगधार्जिणी नीती जबाबदार आहे. कमाईत प्रचंड तफावत असलेल्या देशांमध्ये जगात भारत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. सामाजिक न्यायाला दुय्यम ठरवून त्याबाबतीत कलुषित दृष्टिकोन बाळगण्यानेच या स्थितीला खतपाणी मिळते आहे. विशिष्ट वर्गाची मतपेढी हस्तगत करण्यासाठी योजना आणल्या जातात, मात्र त्यांची काटेकोर अंमलबजावणी करण्यापेक्षा त्यावर भाषणबाजीच अधिक केली जाते. त्यामुळे सामाजिक न्यायाची संकल्पना कागदावरच राहते. मानवी विकासाचे सामाजिक निर्देशांक गाठण्याचे ध्येयच स्पष्ट नसल्याने एक मोठी सामाजिक अन्यायाची प्रक्रिया सुरू होते, याचे भान या अर्थसंकल्पात ठेवल्याचे दिसत नाही.

**सामाजिक न्यायासाठी केवळ २ टक्के** : अर्थसंकल्पात सामाजिक न्याय आणि सक्षमीकरणासाठीची आर्थिक तरतूद केवळ २ टक्के आहे. विशेष म्हणजे, गाव, गरीब आणि शेतकऱ्यांसाठी आर्थिक तरतूद नाही. अपंग आणि ज्येष्ठांसाठी एकत्रित तरतुदीमुळे गोंधळाची स्थिती आहे. या अर्थसंकल्पातून सरकारने उद्योग आणि व्यवसायांना पायघड्या घालण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय सामान्यांपेक्षा कार्पोरेट क्षेत्राच्या हिताला अधिक प्राधान्य दिल्यामुळे हा अर्थसंकल्प कार्पोरेट क्षेत्राचे हित जपणारा असल्याचेच दिसून येते.

**वंचितांना आणखी मागे लोटणारा अर्थसंकल्प** : या अर्थसंकल्पात सामाजिक न्यायाकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे हा अर्थसंकल्प म्हणजे वंचितांना आणखी मागे लोटणारा अर्थसंकल्प ठरला आहे. अपुऱ्या तरतुदीमुळे सरकारवरील नाराज नागरिकांची संख्या वाढणार असून कमकुवत घटकांच्या मूलभूत हक्कांकडेही दुर्लक्ष होणार आहे.

गुंतवणुकीमुळे शिक्षण महाग झाले तर सरकारला विद्यार्थ्यांच्या मोठ्या आंदोलनांना सामोरे जावे लागणार आहे. परिणामी विद्यापीठे सरकारविरोधी आंदोलनाची केंद्रे बनतील. सरकार एक नवीन कार्यक्रमदेखील सुरू करणार आहे, ज्यामध्ये अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या तरुणांना शिक्षण संपल्यावर एका वर्षापर्यंत शहरी स्थानिक संस्थांमध्ये इंटर्नशिप करावी लागणार आहे. म्हणजे सरकार शहरी स्थानिक संस्थांना मोफत किंवा स्वस्त दरात रोजगार उपलब्ध करून देणार आहे. तंत्रज्ञानाच्या ह्या युगात सरकार अशा तरुणांचा स्थानिक पातळीवर राजकीय फायद्यासाठीदेखील वापर करू शकते. यामुळे होणारे आणखी एक नुकसान म्हणजे खाजगी शिक्षण संस्थांचा शहरी स्थानिक संस्थांमध्ये हस्तक्षेप वाढू शकतो. एकंदरीत २०२० च्या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रात सुधारणा करून जागतिक दर्जाची विद्यापीठे निर्माण करण्यासाठी कुठलेही विशेष प्रयत्न दिसत नाहीत. शैक्षणिक सुधारणेला प्राधान्य देत असल्याचा सरकार केवळ गाजावाजा करत आहे. त्यासाठीचे प्रयत्न मात्र सरकारकडून होताना दिसत नाहीत.

'स्मार्ट शहर' हा मोदी सरकारचा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे, जो जून २०१५ मध्ये सुरू करण्यात आला आहे. १०० स्मार्ट शहरांच्या विकासासाठी आणि इतर ५०० शहरांच्या पुनरुज्जीवनासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने एकूण ९८,००० कोटी मंजूर केले. हजारो कोटींची तरतूद करूनदेखील मागच्या पाच वर्षात एकही स्मार्ट शहर उभे राहिले नाही. तरीदेखील २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात पुन्हा पाच नवीन स्मार्ट शहरे बनविण्याचा संकल्प सरकारने केला आहे. केंद्र सरकारच्या 'स्मार्ट सिटी मिशन' ह्या अधिकृत वेबसाईटनुसार, भारतातील शहरांना ॲमस्टरडम, मिलान, न्यूयॉर्क सिटी इत्यादींसारख्या नियोजनबद्ध, संपूर्ण सोईसुविधांनीयुक्त विकसित शहरांप्रमाणे बनवण्याचे उद्दिष्ट आहे; परंतु मागच्या पाच वर्षात कंत्राटी तत्त्वावर मैला साफ करणाऱ्या कामगारांसाठी कुठल्याही तरतुदी करण्यात आलेल्या नाहीत. अनुसूचित जातीच्या खर्च न होणाऱ्या राखीव निधीचादेखील सरकार ह्या कामगारांसाठी वापर करत नाही. शेकडो सफाई कामगार जर देशातील महानगरांमध्ये सीवर लाईनमध्ये गुदमरून मारत असतील तर ही स्मार्ट शहरे कोणासाठी?

दहशतवादाशी संबंधित माहितीवर नियंत्रण ठेवणाऱ्या 'दक्षिण आशिया दहशतवाद पोर्टल' नुसार, २०१० ते ऑगस्ट २०१७ दरम्यान जम्मू-काश्मीरमध्ये ४११ सुरक्षा जवानांचा मृत्यू झाला. याचा अर्थ, २०१० पासून काश्मीरमधील बंडखोरीने सरासरी ५१ जवानांचा जीव घेतला आहे. सीमेवर जवानांचा जीव नेहमीच धोक्यात असतो. जीव मुठीत धरून जवान देशाचे संरक्षण करीत असतात; परंतु सैनिकांप्रमाणेच आपला जीव मुठीत धरून सीवरमध्ये उतरून मैला साफ करणाऱ्या कामगारांचे कामदेखील तितकेच धोकादायक आहे. रेमन मॅगसेसे पुरस्कार विजेता बेझवाडा विल्सनची 'सफाई कर्मचारी आंदोलन' नावाची संस्था सफाई करणाऱ्या मजुरांवर काम करत असते. ह्या संस्थेने गोळा केलेल्या आकडेवारीनुसार, २०१० पासून ३५६ जणांचा सीवर लाईनमध्ये मैला साफ करताना जीव गेला आहे. दरवर्षी सरासरी ४४ सफाई कामगारांचा अशा प्रकारे जीव जातो; परंतु २०१७ मध्ये सीवर लाईनमध्ये काम करताना मरणाऱ्यांची संख्या ९० वर गेली होती आणि सीमेवर मरणाऱ्या जवानांची संख्या ५४ होती. 'सबका साथ, सबका विकास' म्हणणारे सरकार जनतेची फसवणूक करत आहे.

शेतकऱ्यांचे उत्पादन दुप्पट करण्यासाठी नैसर्गिक इंधन, सौर ऊर्जा, जलसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय असा १६ बिंदू असलेला कार्यक्रम सरकारने जाहीर केला आहे. यातील काही घोषणा ग्रामीण आणि शेतकरी वर्गाला दीर्घकाळ फायदा मिळून देणाऱ्या ठरू शकतात; परंतु ह्या योजनांची अंमलबजावणी कशी करणार, याचे कुठलेही नियोजन सरकारजवळ नाही. विशेष म्हणजे, ह्या सगळ्या घोषणांचे उद्दिष्ट एका वर्षात नाही तर २०२२ पर्यंत साध्य करण्याचे ठरले आहे. तर काही उद्दिष्ट हे २०२५ पर्यंत गाठायचं ठरलं आहे आणि त्यासाठी कृषी, पाटबंधारे, ग्रामीण विकास आणि संबंधित कामांसाठी २.८३ लाख कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. तूर्तास शेतकऱ्यांना कुठलाही दिलासा मिळणार नाही.

एक गोष्ट विशेष करून नमूद करावी लागेल ती म्हणजे, मोदी सरकार नेहमीच मतदारांना डोक्यात ठेऊन काही गोष्टी प्रत्येक अर्थसंकल्पात आणत आहे. २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या आधी सरकारने शेतकऱ्यांना प्रतिवर्षी तीन टप्प्यांत ६,००० रुपये आर्थिक मदतीची घोषणा केली होती. दलित आणि मागासांना आकर्षित करणारे निर्णय जाहीर केले होते. मच्छिमार, आदिवासी आणि सवर्णांना आकर्षित करण्यासाठी म्हणून २०२० च्या अर्थसंकल्पात वेगवेगळ्या योजना घोषित करण्यात आल्या आहेत. त्या येत्या पाच वर्षात राबविण्याचे ठरविले आहे. सागर मित्र योजनेच्या तरतुदी, झारखंडमध्ये आदिवासी संग्रहालय उभे करणे आणि राम मंदिरासाठी ट्रस्ट निर्माण करून निधी देणे ह्या सर्व गोष्टी मतदारांना आकर्षित करण्यासाठीच आहेत. एकंदरीत करांच्या नवीन स्लॅबमुळे मध्यमवर्गीयांना थोडासा दिलासा मिळू शकतो. मात्र सर्वसामान्य जनतेसाठी २०२०-२१ चा अर्थसंकल्प विशेष काही नाही. एफडीआयच्या माध्यमातून परदेशी गुंतवणुकीला चालना देऊन शिक्षणाचे बाजारीकरण करून गोरगरीब आणि शोषितांच्या मुलामुलींसाठी शिक्षणाची दारे बंद करण्याचे काम सरकार करत आहे. एलआयसी आणि रेल्वेचे खाजगीकरण, अनुसूचित जाती जमातीसाठीच्या निधीमध्ये प्रचंड कपात, ग्रामीण व कृषी क्षेत्रासाठी अपुरे नियोजन आणि खाजगीकरणाला अवास्तव महत्त्व, यामुळे गरिबी आणि विषमतेची दरी अजून जास्त वाढणार यात काही शंका नाही. हा अर्थसंकल्प 'सबका साथ, सबका विकास' च्या विपरित आहे.

●●●

**(लेखक दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात डॉक्टरेट करीत आहेत.)**

# विकास व प्रशासनाचा ढाचा आमुलाग्र बदलण्याचे आव्हान



✍ प्रा. एच. एम. देसरडा

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना अनावृत्त पत्र

श्री. ठाकरेजी, नमस्कार,

महाविकास आघाडी सरकारचे मुख्यमंत्री म्हणून आपले अभिनंदन, कारकीर्दीस शुभेच्छा.

महाराष्ट्रातील शेती-पाणी-रोजगार-पर्यावरण व एकंदर विकासविषयक प्रश्नांचा मी गेली पाच दशके जो अभ्यास, विवेचन, विश्लेषण करत आहे त्याची आपणास कल्पना आहे. आजमितीला महाराष्ट्राच्या १३ कोटी जनतेला भेडसावणाऱ्या मुख्य समस्यांकडे आपले लक्ष वेधण्यासाठी हा पत्रप्रपंच! धोरणात्मकदृष्ट्या कळीचे काही तथ्ये व मुद्दे व्यापक विचारार्थ पुढे मांडले आहेत:

१. विकास ही मूलत: राजकीय प्रक्रिया आहे. येथे सर्वप्रथम हे नमूद करणे आवश्यक आहे, की विकास व प्रशासनाचा प्रचलित ढाचा (ग्रोथ ॲन्ड गव्हरनन्स मॉडेल) संरचनात्मकरित्या प्रामुख्याने श्रमिकजनविरोधी-निसर्गविरोधी-समाजविरोधी आहे. पारंपरिक सरंजामी, भांडवली, तथाकथित समाजवादी या सर्व राजकीय अर्थव्यवस्था बांडगुळीच होत्या व आजही कमीअधिक फरकाने तशाच आहेत. याचे एक ढळढळीत उदाहरण म्हणजे राज्याच्या २०१९-२० सालच्या अर्थसंकल्पातील महसुली जमेपैकी ६० टक्के रक्कम वेतने, निवृत्तीवेतन व कर्जावरील व्याज अदा करण्यासाठी खर्ची पडते. याचा अर्थ, सरकारी लवाजम्याच्या पगार व पेन्शनसाठी आणि तथाकथित विकास प्रकल्पांसाठी जे भरमसाठ कर्ज घेतले त्यावरील व्याजापोटी यंदाच्या वर्षी सरकार १ लाख ८७ हजार कोटी रुपये खर्च करणार. गोरगरिबांच्या कल्याणासाठी जमा केलेल्या सार्वजनिक पैशाचा असा वापर अनाठायी आहे.

२. परिणामी राज्यावरील कर्ज ४ लाख ७१ हजार कोटी रुपये झाले. खरं तर राज्य सरकारने महामंडळे, सहकारी संस्था व अन्य काही प्रकल्पांसाठी घेतलेल्या कर्जाला जी हमी दिली, त्याची जबाबदारीदेखील आणखी जवळपास दोन लाख कोटी रुपये आहे. थोडक्यात, आज राज्याची आर्थिक स्थिती 'मोगलाई गेली तगारे (अजगरी बांधकामे), पेशवाई गेली नगारे आणि आजची सरकारे चालली तगारे-नगारे-पगारे' अशी आहे! या विळख्यातून बाहेर कसे यायचे हा एक अत्यंत अवघड प्रश्न आ वासून उभा आहे! सातवा वेतन पावला, आठव्याची प्रतीक्षा...

३. एकीकडे संख्येने दहा टक्के असलेल्या नेता-बाबू-थैल्ला-झोला महाजन अभिजन वर्गाची रोज दिवाळी तर दुसरीकडे ९० टक्के असलेल्या सामान्य जनतेचा कायम शिमगा! कोण आहेत हे ९० टक्के असलेले जनसमूह? शेतकरी, शेतमजूर, मच्छीमार, बांधकाम मजूर, घरकाम करणाऱ्या आयाबहिणी, गडीमजूर, खाणी-खदाणीत काम करणारे मजूर आणि मोलमजुरीचे काम करणारे लहानमोठे श्रमजीवी (महात्मा फुले यांनी स्त्री-पुरुष कष्टकरी व्हावेत म्हटले होते ते सर्व). यापैकी निम्मे आहेत शेतकरी व शेतमजूर. त्यांची दैना सर्वश्रुत असून फडणवीस सरकारच्या कार्यकाळात पंधरा हजार शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची आपत्ती ओढवली. आजही दररोज पाच ते दहा शेतकरी स्वत:चे जीवन संपवत आहेत. त्याला पायबंद घालण्यासाठी संपूर्ण कर्जमुक्ती, शेतमालाला आधारभूत किंमत याचे सूतोवाच 'किमान समान कार्यक्रमात' आहे. मात्र, त्याने शेती व शेतकऱ्यांची समस्या कायम सुटण्याची सुतराम शक्यता नाही, हे नीट ध्यानी घेणे आवश्यक आहे.

४. शेती अरिष्टाचे मूळ व मुख्य कारण हरितक्रांतीपुरस्कृत रासायनिक व औद्योगिक कृषीपद्धती, तंत्रज्ञान व पीकरचनेतील अनाठायी बदल हे आहे. हायब्रीड बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके या 'हाराकि' तंत्रज्ञानामुळे शेतकरी कर्जबाजारी, परावलंबी व पंगू झाला आहे. या वस्तुस्थितीचा जोपर्यंत आपण गांभीर्याने विचार करणार नाही, तोपर्यंत शेती व शेतकऱ्यांची परवड थांबणार नाही. एक तर ६० टक्के शेतजमीन जे प्रत्यक्ष त्या जमिनीवर राबत नाहीत, घाम गाळत नाहीत त्यांच्या मालकीची आहे. मुख्य म्हणजे त्यापैकी अनेकांना व्यापारधंदा, नोकरी-व्यवसायाचे चांगले उत्पन्न आहे. या तुलनेत शेतीत काम करणाऱ्यांपैकी निम्मे तर भूमिहीन मजूर आहेत. सोबतच बटाई, वाटा, ठोका व अन्य प्रकारे जे शेती कसतात त्यांना कर्ज, विमा, आपत्कालिक नुकसान मोबदला या कशाचाही लाभ मिळत नाही. मुख्य गोम म्हणजे कसणाऱ्यांना जमीन मालकी हक्क देणाऱ्या भूसुधारणा (लॅन्ड रिफार्म) झाल्या नाहीत. होय, लोकसंख्या वाढीमुळे जमीनधारणेचे आकारमान घटले असून बहुसंख्य शेतकरी कशीबशी गुजराण होईल अशाच शेतीत जखडले आहेत. मात्र, ऊसशेती असो की द्राक्षे, गुलाब, जरबेरा, पॉलीहाऊस यांचा लाभ मूठभरांनाच होतो, हे उघड सत्य आहे. ऊसशेती महाराष्ट्राच्या जमीन, पाणी व पर्यावरणाचे वाटोळे करत आहे

ही बाब जगजाहीर असताना किती काळ ऊसशेती, साखर कारखानदारीला अनुदाने, सवलती व राजाश्रय देत राहणार?

५. यावर उपाय म्हणजे प्रत्यक्ष शेतावर राबणाऱ्याला, घाम गाळत कुणबिक करणाऱ्यालाच शेतीधारणेचा, मालकीचा अधिकार देणारा कायदा सत्त्वर संमत करणे हाच शेती अरिष्टावर मात करण्याचा समतामूलक, शाश्वत पर्याय आहे. खचितच ही फार मूलगामी बदल करावी लागणारी सूचना आहे. मात्र, अशा प्रकारच्या कृषीक्रांतीखेरीज, हरितक्रांतीने निर्माण केलेल्या संकटावर मात करता येणार नाही, एवढे मात्र नक्की. अन्यथा, रोग म्हशीला व औषध पखालीला हा गोरखधंदा चालू राहील. शिवाजी-शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्राला श्रमजीवी आदिवासी-दलित-बहुजन स्त्री-पुरुषांच्या व्यापक हिताचे असे कायदे व धोरणात्मक बदल करणे अवघड जाऊ नये! अर्थात, सकृत्दर्शनी, सवंग लाभाचे मलमपट्टी उपाय करण्याऐवजी अपरिहार्य असलेली ठोस शस्त्रक्रिया करणे म्हणजेच गोरगरिबांना सवलतीचे तुकडे नव्हे तर मूलभूत हक्क देणारे धोरणात्मक बदल करणे ही आज काळाची गरज आहे.

६. वर सुचविलेल्या धोरणात्मक बदलांमुळे महाराष्ट्राच्या शेतकरी, शेतमजूर कष्टकऱ्यांचेच नव्हे तर यच्चयावत लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आवश्यक ती सेंद्रियशेती, विषमुक्त अन्ननिर्मितीला चालना मिळेल. किंबहुना ती जाणीवपूर्वक देण्यात यावी, जेणेकरून जमीन, पशू व मानवाचे आरोग्य सुधारेल; पर्यावरणाचे रक्षण होईल. अखेर आम्ही ज्याला विकास म्हणतो त्याचे प्रयोजन तरी काय? माणसांना सुदृढ सुखी समाधानी ठेवणे ही जर विकासाची मुख्य कसोटी मानली तर मग हे बदल करण्यास अडचण तरी काय? खरं तर जो धोका आणि अडसर आहे, ती संधी मानून यावर निर्धाराने उपाय केले तर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे उद्दिष्ट साध्य होईल.

७. शेती व शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याइतकाच महत्त्वाचा प्रश्न रोजगारवृद्धीचा आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील जमीन, पाणी, वने, पशूधन, मानव संसाधने, सौर/ व अन्य नूतनीकृत ऊर्जा साधने ही एकूण साधनस्त्रोत आहेत. त्याला कार्यप्रवण करण्यासाठी लागणारी वित्तीय व पायाभूत संसाधने राज्यात आहेत. महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र ३ कोटी ८ लाख हेक्टर एवढे असून जमीन वापर आकडेवारीनुसार १ कोटी ७० लाख हेक्टर पिकांखाली तर ५२ लाख हेक्टर वनक्षेत्र आहे. तथापि, वनक्षेत्राबाबतची ही आकडेवारी अजिबात वस्तुस्थितीदर्शक नाही. स्वतंत्र अभ्यास व जाणकारांच्या मते, यापैकी निम्म्या क्षेत्रावरदेखील आवश्यक घनतेचे वन नाही. केवळ कागदोपत्रीच ही जमीन वनखात्याकडे असल्याचे दर्शविले जाते. प्रत्यक्षात यावर अतिक्रमणे झाली असून या जमिनी आता वनीकरणासाठी उपलब्ध होतील का, हीच मुळी शंकास्पद बाब आहे. हे वास्तव लक्षात घेऊन राज्यातील एकूण भौगोलिक क्षेत्राचे आजघडीला असलेल्या प्रत्यक्ष वापर प्रकारानुसार सर्वेक्षण करून यापुढील वापर मुक्रर केला जावा. भूमी, जल, जैवविविधता संवर्धन, रोजगार व पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याखेरीज विकासाच्या गोंडस नावाने चाललेले सर्व भव्यदिव्य प्रकल्प, बड्या बाता निरर्थक आहेत.

८. वृत्तपत्रांतील बातम्यानुसार असे दिसते, की आपण राज्यातील प्रकल्पांचा आढावा घेत आहात. नक्कीच ती आवश्यक बाब असून फडणवीस सरकारने १२ लाख कोटी रुपये गुंतवणुकीचे जे प्रकल्प सुरू केले, त्यापैकी बुलेट ट्रेनसह बहुसंख्य अविवेकी, अजगरी पांढरे हत्ती आहेत. 'जलयुक्त शिवार' हादेखील जल व पर्यावरण संरक्षणाऐवजी निसर्ग व्यवस्थेचे उद्ध्वस्तीकरण करणारा भ्रष्टाचारयुक्त कार्यक्रम आहे. जनहित याचिकेनुसार नियुक्त तज्ज्ञ समिती व न्यायालयाच्या आदेशानुसार त्यात संकल्पनात्मक व कार्यक्रमात्मक बदल व रोजगार हमी योजनेशी सांगड घालून कार्यक्षमपणे राबविण्यास आपण प्राधान्य द्यावे, ही विनंती. दारिद्र्य व दुष्काळ निर्मूलन, पूरनियंत्रण, नैसर्गिक व मानव संसाधन संवर्धनाच्या दृष्टीने हा मूलभूत पाणलोट क्षेत्रविकास उपक्रम असून एकात्मिक पाणलोट क्षेत्रविकास हेच मूळ नाव पूर्ववत करून फडणवीसांच्या प्रसिद्धी व भ्रष्टाचाराच्या फडाला आवर घालावा.

९. चार लाख कोटी रुपये खर्चाच्या राज्याच्या अर्थसंकल्पातील जवळपास दीडलाख कोटी रुपयातून शिक्षणावर ७१ हजार कोटी, आरोग्य व कुटुंब कल्याण १५ हजार कोटी, समाजकल्याण व पोषण आहार १३ हजार कोटी, पाणीपुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण व नगरविकास ३० हजार कोटी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग यांचे कल्याण १८ हजार कोटी यासाठी खर्च होतात. लोककल्याणासाठी हे सर्व आवश्यक खर्च व तरतूद असली तरी याची फलश्रुती फार निराशाजनक आहे. या सर्व सेवा व योजनांची अंमलबजावणी परिणामकारकपणे होण्यासाठी प्रभावी देखरेख व संनियंत्रण यंत्रणेची नितांत गरज आहे. या मोक्याच्या सेवासुविधा कार्यक्षमतेने चालविण्यात सेवा हमी आयोग महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. सोबतच १० रुपयांमध्ये जेवणथाळी देण्याची जी व्यवस्था करत आहात ती निश्चितच स्वागतार्ह बाब असून माध्यान्ह भोजन पोषण आहारासह या सर्व योजना तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर चालविल्यास लोकांची मोठी सोय होईल.

१०. हे खरे आहे, की आपल्या सरकारसमोर आज अनेक ज्वलंत समस्या आहेत. त्यासाठी निधीची तरतूद करावी लागेल. याबाबत आपल्या राज्याची एक जमेची बाजू आहे, की महाराष्ट्र हे देशातील श्रीमंत राज्य असून या वित्त वर्षाचे अपेक्षित राज्य उत्पन्न २८ लाख कोटी रुपये आहे. राज्याचा स्वत:चा कर महसूल यावर्षी २ लाख १० हजार कोटी रुपये आहे. तो माफक कर दरवाढ व चोख वसुलीद्वारे दीडपट करणे सहज शक्य आहे. याखेरीज एक मोठे कर उत्पन्न स्त्रोत आहे ते म्हणजे अब्जाधीशांकडे असलेल्या **उर्वरित पान ४६**



# भाजपचे उच्चवर्गीय - उच्चवर्णीय बजेट!



कॉ. भालचंद्र कांगो

मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांना मागच्या वर्षी १ लाख ४५ हजार कोटी रुपये व या अर्थसंकल्पात ४० हजार कोटी रुपये सवलत देण्यात आली. म्हणजे १ लाख ८५ हजार कोटी रुपये सवलत! **म्हणजे सर्वसामान्य माणसांना मदत करण्याच्या योजनांवर कात्री तर मोठ्या करदात्यांना सवलत ही भाजपाची वर्गीय विचारसरणी आहे.**

भाजप सरकारचे हे ७ वे वर्ष! अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे दुसरे बजेट! या बजेटच्या वेळेस देशाची अर्थव्यवस्था चांगली नसल्याची, मंदीचे सावट आल्याची सर्व लक्षणे दिसत आहेत. अपेक्षित वाढ नाही, मागच्या अर्थसंकल्पात गृहीत धरलेले कर संकलन होत नाही, होणार नाही हे पण स्पष्टपणे दिसत आहे. मागच्या पाच वर्षापूर्वी २ कोटी रोजगार निर्मितीचे स्वप्न हवेत विरून आता ४५ वर्षातील सर्वात जास्त बेरोजगारीचे हे वर्ष असल्याचे वास्तव झपाट्याने समोर आले आहे. सर्व जगात सर्वात जास्त वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून जोरात व जोशात सांगितले जात असताना वास्तवात जीडीपी वाढ ६ टक्क्यांपेक्षा काही अंदाजानुसार जेमतेम ५ टक्केच असल्याचे दारूण चित्र आहे. मागच्या महिन्यापर्यंत सर्वच मंत्री सर्व काही आलबेल असल्याचे व आर्थिक मंदी ही विरोधकांची प्रचार आघाडी असल्याचे सांगत होते. सर्व आकडेवारीविषयी सरकारी आकडेवारीही त्यात आली. प्रश्नचिन्ह उभे करून सर्व माहितीविषयी संशय निर्माण करून आपलेच म्हणणे खरे असल्याची ही योजना करण्यात आली; परंतु वास्तव लपविता आले नाही. उलट आता जागतिक मंदीचा फटका भारताला बसत आहे व म्हणून अपेक्षित वाढ नाही व हे तात्पुरते कारण आहे. अर्थव्यवस्था परत झेप घेणार आहे व ट्रिलियन डॉलर्सचे स्वप्न २०२५ पर्यंत साकार होणार असल्याचे दावे केले जात आहेत. पण डॉलर्समध्ये जीडीपी मोजताना डॉलर्सचा रुपयामध्ये दर किती हे गुलदस्त्यात आहे. आपले पंतप्रधान २०१४ साली १ डॉलरला ४० रु. असा दर आणण्याचे स्वप्न पाहत होते. आज वास्तवात ७१ रुपयांपेक्षा जास्त हा दर आहे. हेच चित्र झाल्यास फार वाढ न करता रुपयांत ५ मिलियनचे स्वप्न पूर्ण होऊ शकेल! जीएसटीचा अपेक्षित परतावा नाही. त्यामुळे राज्यांना या वर्षी १ लाख ५० हजार कोटी रुपयांचा वाटा कमी मिळणार, अशी साधार भीती आहे. त्याचे तणाव जाणवत आहेत. केंद्र-राज्य संबंध ताणले जात आहेत. शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र; परंतु यावर जेमतेम १.२ टक्के

(जीडीपीच्या) खर्च होणार असल्याने खाजगीकरण हाच मार्ग शिक्षणासाठी सरकार स्वीकारणार हे स्पष्ट आहे.

मागच्या अर्थसंकल्पात २७ लाख कोटींहून जास्त खर्च करणार असे सांगण्यात आले. प्रत्यक्षात २६ लाख कोटीच झाला. आता मात्र येत्या ३ वर्षात १ लाख कोटी खर्चाचे स्वप्न दाखवले गेले आहे! मनरेगावर ८ हजार कोटी रुपयांचा खर्च कमी करण्यात येणार आहे. दलित, आदिवासी विभागासाठी निधी हा कमी करण्यात आला आहे. शालेय पोषणावर मागच्या वर्षी ११ हजार कोटी खर्च अपेक्षित होता तो प्रत्यक्षात ९,८०० कोटीच झाला. या वर्षात तर निधीच कमी करण्यात आला आहे.

दुसरीकडे, मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांना मागच्या वर्षी १ लाख ४५ हजार कोटी रुपये व या अर्थसंकल्पात ४० हजार कोटी रुपये सवलत देण्यात आली. म्हणजे १ लाख ८५ हजार कोटी रुपये सवलत! म्हणजे सर्वसामान्य माणसांना मदत करण्याच्या योजनांवर कात्री तर मोठ्या करदात्यांना सवलत ही भाजपाची वर्गीय विचारसरणी आहे. भारतीय वास्तवात मोठ्या करदात्यांमध्ये उच्चवर्णीयांचा जास्त भरणा असल्याने उच्चवर्णीय व उच्चवर्गीय अर्थसंकल्प असे यथार्थ वर्णन या अर्थसंकल्पाचे करता येईल.

बजेटमध्ये फसवी आकडेवारी आधाराला घेतली असल्याची साधार भीती आहे. निर्मला सीतारामन यांनी २००८ साली जगभर मंदीची लाट असताना मनमोहन सिंग सरकारने मोठ्या प्रमाणावर सरकारी खर्च वाढवून मंदीवर मात केली असल्याचे सांगितले. या मार्गामुळे देश संकटात सापडला असे सांगून, खाजगीकरणाची कास धरली आहे. बँका अडचणीत असताना त्यांना भांडवल पुरवठा केलेला नाही.उलट बीपीसीएलसारखे नफ्यातील उद्योग खाजगी करून सर्व आधारावर चांगली कामगिरी करणाऱ्या जीवन विम्याचे भाग खाजगी घटकांना विकून १ लाख कोटीहून जास्त निधी उभारण्याचे स्वप्न पाहिल्याचे सीतारामन यांनी म्हटले आहे.

२ लाख कोटी निर्गुंतवणुकीतून मिळवायचे या अर्थसंकल्पात ठरविण्यात आले आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खाजगीकरणाचा मार्ग स्वीकारून अर्थव्यवस्था परावलंबी येणाऱ्या सरकारसाठी करणार आहे. बजेटमध्ये १० टक्के वाढ होण्याची बात आहे. प्रत्यक्षात दरवाढ ध्यानात घेता ही वाढ ६ टक्के असणार आहे; परंतु ते कसे होणार? यासंबंधी स्पष्ट चित्र नाही.

अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राकडून अपेक्षित गुंतवणूक नाही. कारण जनतेकडून अपेक्षित प्रमाणावर खरेदी व खर्च होत नाही. यावर उपाय म्हणजे जनतेला पैसे देण्याच्या योजनेवर जास्त प्रमाणावर तरतूद करणे; परंतु गुंतवणुकीसाठी कर्ज स्वस्त करणे वा जास्त कर्जपुरवठा करणे हा मार्ग स्वीकारला असल्याचे हे सरळ व साधे चित्र आहे. ते बदलण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पात नाही. बँकांत विशेषतः सहकारी व खाजगी बँकांत पैसे बुडण्याची भीती आहे व त्याचा परिणाम सरकारी बँकांनाही जाणवत आहे. यावर उपाय म्हणून लोकांच्या ठेवींवर १ लाख रुपयांऐवजी ५ लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण देण्याची घोषणा आहे. त्याचे स्वागत; परंतु लोकांचा बँकांवरचा विश्वास का उडाला! बँकांची कर्ज का बुडतात या प्रश्नाचे उत्तर नाही. उलट कर्ज बुडवणाऱ्यांना कर्ज माफ करून बँकांना बुडविण्याचा वा अडचणीत आणण्याचे प्रयत्न आहेत. त्यामुळेच कर्ज बुडवणाऱ्यांची नावे जाहीर केली जात नाहीत!

भारतीय अर्थव्यवस्थेत भांडवलपुरवठा करणाऱ्या बँकांशिवायच्या इतर कंपन्या व संस्थाही आज अडचणीत आहेत. सर्वसामान्य माणसांचे पैसे मोठ्या प्रमाणावर या संस्थांत आहेत व त्यांना अर्थसंकल्पात दिलासा नाही. अर्थात, मध्यमवर्गासाठी नवीन पद्धतीने कर भरल्यास सवलत जाहीर केली आहे. त्यामुळे ४० हजार कोटी रुपये जातील असे सांगितले आहे; परंतु अर्थसंकल्पात कर वाढीतून मागच्या वर्षीपेक्षा १४ टक्के जास्त वाढ होईल, असा दावा केला आहे.

प्रत्यक्षात २०१८-१९ या काळात कॉर्पोरेट करातून अपेक्षेपेक्षा ८ टक्के कमी पैसा आला. त्यामुळे वाढीव कर कसा येणार हा प्रश्न आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मंदी असताना निर्यात वाढणार कशी, याचे उत्तर नाही. सर्वात जास्त आश्चर्य म्हणजे, यावर्षी आयात-निर्यात करात तोटा किती याची आकडेवारी म्हणजे करंट अकाऊंट डेफिस्टची माहितीच नाही!

रोजगारनिर्मितीची माहिती नाही. उलट विकास, रोजगार हा खाजगीकरणामार्फतच होणार असल्याची भूमिका आहे. मोठाली स्वप्ने दाखविणे व वास्तवाच्या सत्याता लपविणे हा मार्ग आहे. २ कोटी रोजगारनिर्मिती ५ मिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्था, शेतकऱ्यांचे उत्पन्न २०२१ पर्यंत दुप्पट असे सांगून विकासाचा आभास निर्माण केला जात आहे.

प्रमुख वित्तीय सल्लागाराने ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था २०२४ साली नव्हे २०२५ साली होईलं असे सांगून एक वर्ष वाढवून घेतले आहे व हेच पुढे होणार आहे. आज अर्थव्यवस्थेपुढे जे प्रश्न आहेत ते काय आहेत? लोकांची क्रयशक्ती, खर्च करण्याची क्षमता कमी झाली आहे. विशेषतः ग्रामीण भागात! विषमता बेसुमार वाढली आहे. बेरोजगारीही वाढली आहे. गुंतवणूकदार गुंतवणूक करीत नाहीत तसे वातावरण नाही. याशिवाय विभागीय विकास असमतोल होत आहे. राज्य-केंद्र संबंध पैशांच्या अपेक्षित वाटपाअभावी तणावग्रस्त होत आहेत. शिक्षण व आरोग्य सर्वसामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जात आहे. याशिवाय पर्यावरणाचे संकट, तंत्रज्ञानाचे वाढते आव्हान या सर्व समस्यांबरोबर जागतिक अर्थव्यवस्थेतील मंदी असे इतरही प्रश्न आहेत. या प्रश्नांची उत्तरे एकाच अर्थसंकल्पात देता येणार नाहीत; परंतु त्यांचे भान ठेवावे लागते, ते नाही; असे खेदाने म्हणावे लागेल. ●●●

**(लेखक भाकपचे ज्येष्ठ पदाधिकारी आहेत.)**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महार-मांग वतनदार परिषद कसबे तडवळे




ज्ञानेश्वर ढावरे

परिषदेच्या निमित्ताने प्रथमच दलित लोक सांघिक भावनेने एकत्र येऊन जिवाभावाने काम करीत असल्याचे दिसते. रेल्वेची सोय सोडली तर बाकी प्रवासाची साधने नव्हती. तरी दहा दहा, वीस वीस कोस पायी चालत जाऊन जाहिराती, पावती बुके व प्रचार यासाठी हे लोक स्वयंस्फूर्तीने गावोगाव फिरत होते. **या परिषदेच्या कार्याला आपलाही हातभार लागला पाहिजे, अशी तळमळ कार्यकर्त्यांच्या मनात होती. या कार्यास हातभार लावणे हे आपल्या कुटुंबातल्या सुखदु:खापेक्षा महत्त्वाचे आहे, असे लोकांना वाटत होते.**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील कसबे तडवळे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत १९४२ मध्ये २२ आणि २३ फेब्रुवारी असे दोन दिवस महार-मांग वतनदार परिषद पार पडली. परिषदेच्या ७८ व्या स्मृतीदिनानिमित्त हा लेख...**

मोगलाईमधील मराठवाडा हा मागासलेला विभाग आहे. तिथल्या दलितांची स्थिती फार बिकट आहे. त्यांच्या उन्नतीसाठी लवकर काही करणे गरजेचे आहे, अशी बाबासाहेबांच्या मनात तळमळ होती. याबाबत बाबासाहेबांनी प्रमुख अशा कार्यकर्त्यांशी विचारविनिमय केला होता असे म्हणतात व त्यासाठी या भागात परिषद घ्यावयाची असे ठरवून परिषदेसाठी कसबे तडवळे या गावची निवड केली. या परिषदेसाठी याच गावची निवड करण्यामागील कारणामध्ये मराठवाड्यातील दलितांना परिषदेचा फायदा व्हावा या कारणाबरोबरच खालीलही काही कारणे होती. बाबासाहेबांचे एक जिवलग दिवंगत हरिभाऊ तोरणे जन्म अंदाजे १८७०-७५ च्या आसपासचा. ते १८९२ साली शिक्षक म्हणून नोकरीस लागले. तारूण्यात ते क्रांतीबा महात्मा जोतीराव फुले यांच्या विचाराने प्रेरित होऊन समाजकार्य करीत होते. ते स्वतः कवी, लेखक होते. त्यांनी सत्यशोधकी जलसे केले. पुढे डॉ. आंबेडकरी जलसे रचून दिले. दिवंगत हरिभाऊ तोरणे यांच्यावरील लेखात त्यांना, सुगावा दि. ८७ मध्ये आयु. आप्पा रणपिसे यांनी 'भीमक्रांती-संग्रामातील गरनाळी तोफ' असे म्हटलेले आहे. दिवंगत हरिभाऊ तोरणे हे 'लोकास्ट स्कूल'चे प्रथम शिक्षक म्हणून १९१४ साली तडवळ्यात आले होते. या गावी असताना दलितांना त्यांनी आपल्या हक्काची जाणीव करून दलितांमध्ये जागृती घडवून आणली होती. ते स्वतः शिक्षक आणि कार्यकर्ते असल्यामुळे आपल्या हाताखालील विद्यार्थ्यांवर त्यांनी चांगल्या प्रकारचे संस्कार केले असतील हे ओघानेच आले. म्हणूनच की काय १९३८ च्या पूर्वीपासून ''या तालुक्यातील अस्पृश्य मानलेल्या बांधवांची शैक्षणिक, सामाजिक वगैरे बाबतीतील अडी-अडचणी एकमुखाने जाहीर करून दाद लावून घेण्यासाठी'' बार्शी तालुक्यातील 'अस्पृश्य बांधवांच्या परिषदा' याच गावाने पुढाकार घेऊन घडून आणल्या होत्या. दिवंगत सावळा तुकाराम भालेराव, दिवंगत भिकाजी सखाराम भालेराव, दिवंगत गोविंद फरिद भालेराव, दिवंगत यशवंत पिराजी सोनवणे, दिवंगत काशिनाथ मारूती सोनवणे, दिवंगत धर्मा फरिदा भालेराव हे त्या काळातले प्रमुख कार्यकर्ते होते. दिवंगत. हरिभाऊ तोरणे या गावाहून बदलून गेल्यानंतर वरील लोक सामाजिक कार्य करीत होते. तडवळ्याच्या आसपास दहा-बारा मोठी खेडी आहेत, त्या गावच्या लोकांना तडवळ्याच्या बाजाराला यावे लागे व मुख्य म्हणजे कसबे तडवळे या गावी जात पंचायतीचे निर्णय देण्याचे काम होत असल्यामुळे आजूबाजूचे दलित लोक तडवळ्यातील दलितांना मानीत होते. त्याचबरोबर या भागात हे गाव मोठे असल्यामुळे परिषदेची सोय या गावी होणे शक्य होते. कसबे तडवळे हे तेव्हाच्या राजकीयदृष्ट्या १० मैल मोगलाईच्या आत घुसलेले, तिन्ही बाजुंनी मोगलाई मराठवाड्याची सीमा असल्यामुळे मोगलाईतील आजूबाजूच्या खेड्यातील लोकांना परिषदेस येण्याचे सोयीचे व्हावे, तसेच या गावी दूरच्या गावाहून येण्याची सोय होती. या सर्व बाबी दिवंगत हरिभाऊ तोरणे यांना माहीत होत्या. त्यामुळे या परिषदेसाठी कसबे तडवळे या गावची निवड केली असावी. एका पत्राच्या गोषवाऱ्यावरून तडवळ्यातील लोकांना माहीत व्हावयाच्या अगोदरच परिषदेसाठी या गावचे नाव निश्चित झाले होते असे वाटते.



**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत १९४२ मध्ये कसबे तडवळे येथे परिषद झाली. यावेळी प्रमुख कार्यकर्त्यांसोबत बाबासाहेब.**

दि. २७/११/४० रोजी माजी आमदार दिवंगत. जे.एस. ऐदाळे यांनी आयु. भगवान भिवाजी भालेराव यांना ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिषदेसाठी तडवळे मुक्कामी येणार आहेत'' असे कळविले होते. पुढे दिवंगत हरिभाऊ तोरणे आणि मा. आ. दिवंगत जे.एस. ऐदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेच्या कार्यास सुरुवात झाली होती. या भागातील दलितांमध्ये चैतन्य निर्माण करणारी या परिषदेची जी पहिली जाहिरात काढण्यात आली ती बरीच मोठी असून त्यात मजकूरही बराच आहे. त्यातला काही भाग असा –

''सोलापूर जिल्हा व मोगलाई भागातील मराठवाड्यातील महार, मांग बांधवास विनंती की, वतनदार म्हणून आपणास बिनपोटी करावी लागणारी कामे, त्याबाबत होणारा नारा सरकारी पडित जमिनी, मिळणाऱ्या मार्गातील अडचणी, गावात रिकामी जागा असून आपल्याला झोपडी बांधण्यापुरत्याही जागा मिळत नाहीत. त्या अडचणी, अस्पृश्यतेमुळे उद्भवणारे सामाजिक प्रसंग आणि मुलाबाळांच्या शैक्षणिक दैन्यावस्था वगैरे बाबतीत आपल्या लोकांची योग्य दाद लावून घेण्याचे प्रयत्न आपल्या पुढारी मंडळींकडून निदान खालसा मुलखात जरी अनेकवेळा झाले असले तरी त्याबाबत समाधानकारक यश अजूनही आलेले नाही. म्हणून इंग्रजी विभागातील आणि मोगलाईपैकी मराठवाडा विभागातील आपल्या बांधवांची जोडसभा बोलविण्याचा विचार बऱ्याच दिवसांपासून घटत होता. त्यासंबंधी प. पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट घेऊन कसबे तडवळे (ढोकी) ता. बार्शी येथे ही परिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याच अध्यक्षतेखाली येत्या जानेवारीत भरविण्याचे निश्चित ठरविले आहे.'' (परिषदेमध्ये चर्चिले गेलेले सर्वच मुद्दे जाहिरातीत आले आहेत असे नाही.)

ही पहिली वहिली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिषदेविषयीची या भागातली जाहिरात पाहून लोक आनंदून गेले होते. बाबासाहेबांना पाहण्यासाठी व त्यांचे विचार ऐकण्यासाठी इकडील जनता अत्यंत उत्सुक होती. या परिषदेसाठी सर्वसामान्य कार्यकर्त्यांपासून मोठ्या कार्यकर्त्यांपर्यंत सर्वजण तनमनधनाने झटत होते. कसबे तडवळे येथील कार्यकर्त्यांशिवाय दिवंगत देवीचंद दशरथ कदम, शंकर दशरथ कदम (तुळजापूर), दिवंगत विठ्ठल केशव बनसोडे, दिवंगत आनंद विठ्ठल शिंगाडे, दिवंगत माधव माने, दिवंगत प्रल्हाद सोपान सरवदे (आयु. यशपाल सरवदे यांचे वडील), दिवंगत आपाराव अमृता माळाळे (सर्व उस्मानाबाद), दिवंगत भाऊराव धावारे (तेर), दिवंगत मा.आ. जिवापा ऐदाळे (पंढरपूर), दिवंगत हरिभाऊ तोरणे (सोलापूर), दिवंगत माधवराव सवाई (बीड), सोपानराव धनवे (निजाम राजवटीतील एम.एल.ए. नांदेड), अमृता नागू कांबळे (बीदर), नामदेव लिंबाजी भोसले (वाशी), मरिबा कारभारी (लातूर) हे अनेक ठिकाणचे कार्यकर्ते कार्यरत होतेच. त्याशिवाय वेगवेगळ्या जिल्ह्यातील ५४ गावांचा ही परिषद होईपर्यंत सतत संपर्क होता. दिवंगत हरिभाऊ तोरणे यांच्या उपस्थितीत एक बैठक होऊन गेल्यानंतर 'आम्हाला बैठकीस येता आले नाही, बैठकीत काय चर्चा झाल्या ते आम्हाला कळवा' अशा पत्राद्वारे विचारणा होत होत्या. कलासाहेब कांबळे अक्कलकोट यांनी एका पत्रात अक्कलकोट येथेही सभा घेण्याचा मनोदय यावेळी व्यक्त केला होता. आमच्याकडे अमूक एवढी वर्गणी जमा होईल असे काहीजण पत्रात कळवित होते. तर दिवंगत हरिभाऊ तोरणे हे कुणी कार्यकर्ता कर्तव्यदक्ष व कार्यनिष्ठ नाहीत असे

आपल्या पत्रात रागावत होते. पावतीबुके घेऊन जाण्यासाठी स्वतः पायी चालत दूरदूरच्या ठिकाणहून लोक येऊन जात होते व प्रचारासाठी शेकडो लोक जाहिराती वाटीत फिरत होते. काही गावांना जाहिराती मिळाल्या नव्हत्या. म्हणून त्या लवकर पाठवा म्हणून पत्ते पाठवित होते तर काही ठिकाणी पावतीबुके मिळाली नव्हती, तरी लोक वर्गणीचे पैसे जमा करीत होते. सोपानराव धनवे (निजाम राजवटीतील एम.एल.ए. नांदेड) यांना जाहिराती मिळाल्या नव्हत्या. त्या त्वरित पाठवा म्हणून त्यांचा तगादा चालू होता.

या परिषदेच्या निमित्ताने प्रथमच इकडील दलित लोक सांघिक भावनेने एकत्र येऊन जिवाभावाने काम करीत असल्याचे दिसते. रेल्वेची सोय सोडली तर बाकी प्रवासाची साधने नव्हती. तरी दहा दहा, वीस वीस कोस पायी चालत जाऊन जाहिराती, पावती बुके व प्रचार यासाठी हे लोक स्वयंस्फूर्तीने गावोगाव फिरत होते. या परिषदेच्या कार्याला आपलाही हातभार लागला पाहिजे, अशी तळमळ कार्यकर्त्यांच्या मनात होती. या कार्यास हातभार लावणे हे आपल्या कुटुंबातल्या सुखदुःखापेक्षा महत्त्वाचे आहे, असे लोकांना वाटत होते. परिषदेच्या कार्यासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हाती घेतलेल्या कार्यासाठी गावोगाव फिरून पैसे जमविण्यासाठी इतरांबरोबर दिवंगत माणिक मेसू भालेराव यांनीही पावतीबुके घेतली होती; परंतु त्यांचा थोरला मुलगा आजारी असल्यामुळे पावती बुके घेऊन दोन-तीन दिवस झाले तरी त्यांना नेमून दिलेल्या गावांच्या फिरतीवर जाता आले नव्हते. पण मुलाचा आजार काही उतरेना. शेवटी आपल्या मुलास तसेच आजारी टाकून कुणाचेही न ऐकता फिरतीवर जाताना ते म्हणाले, ''पन आता आजून कुटवर थांबू? जी ऽ व्हइल ती व्हईल! त्याला इलाज नाही. आता मला आडऊ नका. जाऊद्या. पोरगं मेलं तर त्याला माती दिऊन टाका

!!'' असे म्हणत ते फिरतीवरती निघून गेले होते. जानेवारी महिन्यात होणारी परिषद रद्द झाली म्हणून वरून कळविण्यात आले होते, तेव्हा सगळीकडून परिषदेबाबत विचारणा होत होती. पुन्हा २२/२/१९४१ ही तारीख नक्की ठरल्याचे कळविले, लोक पुन्हा कामाला लागले. दिनांक ३/२/४१ च्या पंढरपूरहून मा.आ. दिवंगत जिवाप्पा ऐदाळे यांनी लिहिलेल्या पत्रात उपशाम मास्तर मुंबई यांचे एक पत्र आले आहे; त्यात ते लिहितात की, ''प्रत्यक्ष जीवाप्पा मला प्रत्यक्ष भेटल्याशिवाय सभेची तारीख नक्की करण्यात येत नाही असे बाबासाहेबांचे म्हणणे आहे. मी १०/२/४१ ला मुंबईस जाण्याचे ठरविले आहे.'' असे लिहून त्यांनी लगेच आयु. भगवान भिवाजी भालेराव यांना पंढरपूरला येण्यास त्याच पत्रात सांगितले. पुढे परिषदेची तारीख २३/२/४१ हीच नक्की ठरली.

परिषदेची तयारी पूर्ण झाली होती. आपल्या घरच्या लग्न समारंभासाठी उत्साहाने, काळजीने झटावे त्याप्रमाणे लोकांकडून कामे पार पडत होती. बाबासाहेबांच्या मुक्कामाची व्यवस्था 'मराठी मुलांची शाळा'त करण्यात आली होती. बाबासाहेबांसाठी दिवंगत गणपतराव पाटील यांच्याकडून लाकडी पलंग व गादी मागून आणली होती. कार्यकर्ते एक एक वस्तू जमा करून ठेवत होते तर ज्या शाळेत बाबासाहेबांचा मुक्काम होणार होता, त्या शाळेतील हेडमास्तरांनी कार्यक्रमासाठी देऊ केलेल्या खुर्च्या २० तारखेसच आपल्या कार्यालयात जमा करून ठेवल्या. दाराला दोन कुलपे लावली व ते आपल्या गावी निघून गेले होते. मग ४७ मैल दूर असलेल्या बार्शी अर्बन बँकेकडून २५ खुर्च्या व टेबल आणले. कार्यक्रमाचे स्टेज मातीच्या विटा पाडून त्या वाळवून आठ फूट उंचीचे आणि दहा फूट लांबी रुंदीचे स्टेज तयार करून ठेवले होते. बार्शी, कुर्डूवाडी ही तडवळ्याच्या प्रवास मार्गावरील मोठी गावे. फुलांचे हार आणण्यासाठी काहीजण बार्शीला गेले होते. पण लोकांनी अगोदरच हात-तुरे घेऊन ठेवल्यामुळे तिथे ते मिळाले नाहीत. ते लोक पुन्हा कुर्डूवाडीस गेले. तेथेही बार्शीसारखेच झालेले. मग आता काय करायचे? त्यांच्यापुढे असा प्रश्न पडला. कुणाला तरी आठवण झाली. कुर्डूवाडीपासून पंढरपूर जवळ. चला म्हणाले पंढरपूरला. तिथं पांडुरंगाला वाहण्यासाठी केलेले हार तयार असतात. ते घेऊन येऊ! मग ते लोक पंढरपूरला गेले व पांडुरंगाचे हारतुरे तडवळ्यात घेऊन आले.

दिनांक २२/२/१९४१ रोजी सकाळी दहाच्या दरम्यान दहा हजार लोक उत्सुक होऊन बाबासाहेब येण्याची वाट पहात होते. रेल्वेने येत असल्याचे दिसताच आपापल्या गावाहून आलेले हालक्या, ढोल, तडमतासे, बँड, नगारे मोठ्यामोठ्यांनी वाजविण्यास सुरुवात झाली. आनंदाने लोक वाद्याबरोबर नाचत होते. फुलांच्या माळांनी आच्छादलेली आणि गाडीतल्या लोकांनी आपल्याबरोबर आणलेल्या हारतुऱ्यांच्या सुगंधाने रेल्वे स्टेशनचा परिसर दरवळला. घोषणांनी रेल्वे स्टेशनचा परिसर दुमदुमला. दिवंगत एकनाथ भालेराव (सु. कथाकार आयु. योगीराज वाघमारे यांचे सासरे) याच रेल्वे स्टेशनवर पोर्टर म्हणून नोकरीस होते. रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून आनंदी उल्हासात सामील होण्यासाठी ते झरझर स्टेशनकडे परत आले व हातातील झेंड्यासह 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय!!' म्हणून उडी मारली. ते त्यांच्या स्टेशन मास्तरांनी पाहिले व ते त्यांच्याजवळ येऊन रागाने म्हणाले, ''का ऽ रे? तू सरकारी नोकर असून आंबेडकर की जय म्हणतोस?'' ते ऐकून स्टेशन मास्तरांना काय म्हणावे हे दिवंगत एकनाथ भालेराव यांना कळेना. त्यांचा राग अनावर झाला. तेही रागाने म्हणाले, ''का ऽ य? मी सरकारी नवकर हाय मनून आमच्या बाबासाहेबांचा जयजयकार करू नकू? आं ऽऽ मी हजारदा जयजयकार करीन की! ह्या झेंड्यासाठीच जयजयकार करू नकू हुई? धर घी, ही तुजा झेंडा!'' असे म्हणून त्यांनी आपल्या हातातले दोन्ही झेंडे मास्तरांच्या अंगावर फेकून दिले व पुन्हा उडी मारून 'डॉ ऽ कटर बाबासाहेब आंबेडकरकी जय ऽ!' असा जय गाजवला. ही परिषद म्हणजे उल्हासाने चेतनामय झालेली भलीमोठी जत्राच



**परिषदेप्रसंगी याच बैलगाडीतून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची मिरवणूक काढण्यात आली होती. ही ऐतिहासिक बैलगाडी आजही जपून ठेवण्यात आली आहे.**

होती. या परिषदेस लोक 'नवीन कपडे लेऊन, नटून थटून' आले होते, असे सांगतात. या भागात एवढ्या मोठ्या संख्येने, अमाप उत्साहाने इतके लोक एकत्र येण्याचा तो पहिलाच प्रसंग!

बाबासाहेबांच्या संरक्षणासाठी गावगावच्या लोकांनी तलवारी, भाले, कुऱ्हाडी, गुप्त्या, जंबीये अशी शस्त्रास्त्रे आपल्याबरोबर आणली होती. मिरवणूक संपल्यानंतर ती सर्व एका घरात जमा करून ठेवली तेव्हा ते घरच त्या शस्त्रास्त्राने गच्च भरले होते. सत्यशोधक चळवळीचे एक कार्यकर्ते मराठा समाजाचे एक सद्‌गृहस्थ दिवंगत शंकरराव निंबाळकर हे बाबासाहेबांना येऊन भेटले होते आणि त्यांनी बाबासाहेबांना आहेर करण्याची इच्छा व्यक्त केली होती. दुपारी बाबासाहेबांबरोबर कार्यकर्ते चर्चा करीत असताना पूर्वी मनुस्मृती जाळल्याचे ऐकून संतप्त झालेले व तो संतप्तपणा अजूनही काही प्रमाणात असलेले काही ब्राह्मण लोक बाबासाहेबांबरोबर चर्चा करण्यासाठी आले होते. या प्रसंगाचेवेळी बोलणे काय झाले हे निश्चितपणे कळू शकत नाही, पण अनेकांच्या सांगण्यातील सारांश असा सांगता येईल की, आठ-दहा लोकांचा आलेला जमाव शाळेच्या पटांगणात काहीवेळ आपसात बोलत थांबला होता. शाळेच्या दाराजवळ गेल्यावर तिथून काहीजण माघारी निघून गेले. ''त्यांची पाच-सात माणसं पोथ्या घेऊन बाबासाहेबांजवळ बोलत बसले होते. ऋग्वेद कशावर लिहिलेला आहे म्हणून बाबासाहेबांनी त्यांना विचारले पण ते काहीच बोलल नाहीत! चर्चा करायला आलेल्या लोकांना जेव्हा बाबासाहेब फाडफाड बोलू लागले तेव्हा ते एक एक करीत निघून गेले!'' बार्शीहून एक मेहतर समाजाचा ५० च्या वयाच्या आसपासचा गृहस्थ आला होता. त्याने आयु. भगवान भिवाजी भालेराव यांची भेट घेतली आणि बाबासाहेबांची सेवा करण्याची आपली फार इच्छा आहे, असे त्यानं सांगितले.

आयु. भगवान भिवाजी भालेराव हे कसबे तडवळे येथे 'सन्मित्र तरूण संघ' नावाचे वाचनालय चालवित होते. या गावातीलच नव्हे तर या भागातील त्या काळातले सर्व जाती धर्मांचे लोक त्याचा फायदा घेत असलेले आणि वाचनालयासाठी स्वतंत्र इमारत असलेले ते एकमेव वाचनालय असावे. दुपारी बाबासाहेबांनी हे वाचनालय पाहिले व त्या वाचनालयास अभिप्राय दिला तो असा -

'आज रोजी वाचनालयास भेट दिली. वाचनालयात मासिके, वर्तमानपत्रे व पुस्तके आहेत. या वाचनालयाचा स्पृश्य व अस्पृश्य उपभोग घेत आहेत. थोड्याच दिवसात वाचनालयाची भरभराट होवो. सर्व व्यवस्था पाहून समाधान वाटले.' (बी.आर. आंबेडकर २३/२/४१)

कसबे तडवळे हे गाव पाण्याविषयी फार सधन. रेल्वेच्या इंजिनास लागणाऱ्या पाण्यासाठी रेल्वेनेही पाण्याची सोय या गावी करून ठेवली होती व आजही आहे. त्या काळातल्या महारवाड्यात पाण्याने डबडबलेले मोठमोठे चार आड होते व गावालगतही तशाच विहिरी. पण माणसांची एवढी गर्दी झाली होती, की त्या सर्व आड-विहिरींचे पाणी आटून गेले होते. दिवंगत शंकरराव निंबाळकर यांनी आपल्या मालकीच्या आडाचे पाणी त्यादिवशी दलितांना भरू दिले. अस्पृश्यांनी गावातल्या आडाचे पाणी भरणे हे पहिल्यांदाच घडले. हा पिण्याच्या पाण्याचा आड दिवंगत शंकरराव निंबाळकर यांनी बाटऊ दिल्याबद्दल गावातल्या जुनाट शहाण्या लोकांनी तो आड शंकररावांच्या मालकीचा होता तरी त्यांच्यावर गाववाल्यांना बहिष्कार टाकावयास लावला. या परिषदेच्यावेळी लोकांना जेवण्यासाठी वीस कढ्या खीर केली होती. या भागात पहिल्यांदाच महार-मांग या जाती मांडीला मांडी लावून जेवल्या. हे सहभोजनसुद्धा त्या काळातली क्रांती होती.

बाबासाहेबांचे भाषण चालू असताना माय-बापड्यांनी चित्त एकवटून बाबासाहेबांचे बोल ऐकले. बाबासाहेबांचा संदेश म्हणजे आपल्या उद्धाराचा मंत्र आहे म्हणून पुढील आयुष्यात ज्या मार्गांनी जाण्यास बाबासाहेब सांगत होते ते मार्ग श्रोत्यांनी आपल्या हृदयात कोरून ठेवले. कस्तारवा, उपासमार सहन करा, पण आपल्या मुलामुलींना शिकवल्याशिवाय राहू नका. ज्यामुळे तुम्हाला कमी लेखण्यात येते, ती गावकींची कामे करण्याचे सोडून द्या. अन्याय, अत्याचार सहन करू नका. संघटित व्हा. एकीने वागा. हा बाबासाहेबांचा संदेश ऐकून व तो अंमलात आणण्याची खुणगाठ बांधूनच जमावाने परिषदेचे ठिकाण सोडले.

''तडवळ्यात बाबासाहेबांचे भाषण ऐकल्यावरच लोक ईचार कराय लागले. खालच्या जाती वरच्या जाती सब लबाड हाय! तीच मान्स हायती आन आपुन काय मान्सं नाहू? आता काय आपुन त्यांचा मार खायचा नाही. त्यांची

गावकीची कामं करायची नाहीत! दुसरी कोंचींबी कामं करू. न्हायतर उपाशी राहू! पन आता त्यांचा जाच जुलूम सोसायचा नाही. शिकल्याबिगर खरंखोटं काय कळत नाही. आमच्यावर शिक्षणबंदी करूनच ह्यानी आमची सेवा करणे हाच तुमचा धरम हाय असं सांगून जन्मठेपेहून भयानक आमाला सजा दिली. काय कुरकुर करन्याचीबी कुणाची ताकद नव्हती. आता मातर लेकरांना शिकऊ! शिकऊच!!'' असे जिद्दीचे विचार लोकांच्या मनात बिंबले.

या परिषदेतून इकडील दलितांना आत्मोद्धाराचा मार्ग सापडला. आपणास कुणीतरी वाली आहे हे पाहून व ऐकून लोक आनंदून गेले. या गावातच नव्हे तर या पूर्ण परिघामध्ये असा क्रांतिकारी उत्सव पूर्वी कधी झालाच नव्हता. तो यावेळी झाला आणि तो पूर्णपणे परिणामकारक ठरला. क्रांतीचे स्फुल्लिंग याच परिषदेतून फैलावत गेले. त्यांनी खेडोपाडी चेतनामय झाली. अनंक काळचा आळस झटकून टाकून कार्यकर्ते समाजक्रांतीच्या कामाला लागले. पेरलेल्या जमिनीत पहिल्या पावसाने धान्याच्या ओळी नवांकूर घेऊन टरटरून वर याव्यात त्याप्रमाणे अनेक लहान-मोठे कार्यकर्ते या परिषदेनंतर उदयाला आले आणि शांत बसलेले मोहोळ एकाएकी घोंगत निघावे त्याप्रमाणे बाबासाहेबांचा संदेश खेड्यापाड्यातील दलितांना देण्यासाठी तहानभूक, कुणाचा विरोध यांची पर्वा न करता कार्यकर्ते तळमळीने सर्वसामान्यांना उपदेश करीत फिरू लागले. सभा, बैठका, जलसे, पोवाडे या माध्यमाद्वारा कार्यकर्ते, कलावंत व शाहीर या बाबासाहेबांच्या संदेशाने झपाटलेल्या लोकांनी समाजमनं अगदी पिंजून काढली. बाबासाहेबांच्या विचारधारेचा झेंडा घेऊन ते विचार घराघरात पोहोचवण्यासाठी कार्यकर्ते जणू पळत होते. या काळात कार्यकर्त्यांनी अहोरात्र जागून, जागवून जे समाज प्रबोधन घडवून आणले त्याला तोड नाही. गावक्या सोडून देण्याचे प्रश्नी अपवादात्मकाही जुनाट स्वकियांचा रोष ओढवून घेतला तर तुम्ही गावक्या कसे करीत नाहीत ते आम्ही पाहून घेतो, अशा सवर्णांच्या धमक्याही पचविल्या. जलसेवाले गावोगाव भटकले 'आज जलसा होणार आहे हो ऽ ऽ' अशा बाजारानी दवंड्या देऊन जलसे केले. अंधश्रद्धेच्या निर्मूलनासाठी आपल्यातूनच काही लोकांचा विरोध होणार हे गृहीत धरूनच त्यांनी घराघरातला कोपरा न् कोपरा धुंडाळून देवाच्या सामानाची पोती भरली. माळपरड्यांचा ढीग जमा करून त्यांची होळी केली. देव अंगात आणणाऱ्या 'दुभाषावर' कडक नजर ठेवली. पोतराजाची डोकी भादरली. अंगात आल्यावर अनेकजण एकदाच नाचत असत. तेव्हा नकळत सराट्याचे गोल काटे खाली टाकून अनेकदा अनेकांच्या अंगातले वारे घालवले. मेलेली जनावरे खाण्याचे काही लोक सोडून देईनात. तेव्हा सोललेल्या जनावरांवर फिनेल टाकले. अनेकदा मारलेही. हे कार्यकर्ते झपाटून जाऊन कार्य करीत होते. हे खरोखरच त्या कार्यकर्त्यांचे मंतरलेले दिवस होते. या काळात ज्या तळमळीने कार्यकर्त्यांनी कार्य केले त्याला खरोखरच तोड नाही. समाजक्रांतीच्या आकांक्षेने प्रेरित होऊन परंपरानिष्ठ असलेला स्थिर समाज त्यांनी आपल्या तळमळीच्या प्रबळ ताकदीने हालवून सोडला. त्या काळास शतकी प्रणाम!

कसबे तडवळे येथे झालेल्या या परिषदेस फेब्रुवारी २०१९ मध्ये ७९ वर्षे पूर्ण होतात. तेव्हा पिढ्यान पिढ्यापासून गावकीचा राहिलेला पूर्वाश्रमीचा महार आणि डॉ. आंबेडकरी चळवळीतला आजचा बौद्ध यांचा सामाजिक, सांस्कृतिक आढावा घेण्यास काही हरकत नाही. डॉ. आंबेडकरी चळवळीमधून ज्यांनी जातीयता, रुढी, परंपरा, शकुनापशकुन, मुहूर्त, व्रत-वैकल्य, देवभोळेपणा या सर्वांपासून डॉ. आंबेडकरी चळवळीमधून जी मुक्ती मिळवली आहे, जे खरोखरी 'मानसिक स्वातंत्र्य' मिळाले आहे, ते गणिताच्या भाषेत आकडेवारीवरून सिद्ध करता येण्यासारखे नाही. मात्र बाबासाहेबांनी दलितांना आत्मोद्धारासाठी जे मार्ग सांगितले आणि ज्यांनी ते सुरुवातीपासूनच आत्मसात केले, त्या अन्य मार्गांपैकी शिक्षणाच्या बाबतीत कसबे तडवळे येथील प्रगतीचा आढावा घेणे शक्य आहे. कसबे तडवळे येथील दलितांची लोकसंख्या त्या काळी फार तर शंभरच्या आसपास असेल. पण याच लोकांतून शिक्षणासाठी अत्यंत हालअपेष्टा सहन करीत शिक्षण पूर्ण केले आणि त्यातूनच एक नवी पिढी पुढे आली ती अशी -

आयु. अर्जून हिर भालेराव (पेन्शनर हेड मास्तर), आयु. भगवान भिवाजी भालेराव (पेन्शनर हेड मास्तर), दिवंगत दत्तात्रय सोनवणे (शिक्षक), आयु. भागाप्पा दगडू सोनवणे (पेन्शनर हेड मास्तर), दिवंगत मुरलीधर बापू भालेराव (रेल्वे हेडक्लर्क), विठ्ठलराव भालेराव (पोष्ट मास्तर), (वरील लोक चळवळीतल्या पहिल्या पिढीतले) आयु. माणिक जगन्नाथ भालेराव, आयु. सदाशिव गोपाळ भालेराव (पेन्शनर हेड मास्तर), आयु. दत्तात्रय एकनाथ भालेराव (नि. पोलिस इनस्पेक्टर), आयु. प्रल्हाद सावळाराम भालेराव (निवृत्त ड्रायव्हर), आयु. विठ्ठल भालेराव (नि. हवालदार), आयु. विष्णु गोपाळ भालेराव (नि. रेल्वे ड्रायव्हर), आयु. अभिमन्यू धर्मा भालेराव (नि. कॅप्टन सैनिकी सेवा), आयु. लकूळ गोपाळ भालेराव (ओ.एस. रेल्वे डिव्हिजन), आयु. विलास गोपाळ भालेराव (ग. इंजिनियर पो. अन्ड टे.क.), आयु. मधुकर भिवाजी भालेराव (सु.वा पो ॲन्ड टेक), आयु. प्रभाकर भिवाजी भालेराव (एक्झिक्युटिव्ह इंजिनियर इरिगेशन), आयु. प्रताप दत्तात्रय सोनवणे (से. प्रमुख रेल्वे कमर्शिअल विभाग), आयु. अशोक गोपाळ भालेराव (सहाय्यक आयुक्त, पोलिस गुप्तचर विभाग, मुंबई), आयु. अनंत लाला सोनवणे (हेडमास्तर), आयु. विजय लाला सोनवणे (सेल्स टॅक्स आयुक्त 'दलित साहित्य का नको?' चे लेखक), आयु. रवींद्र एकनाथ भालेराव (ओ.एस. समाज कल्याण), आयु. डॉ. पी.जी. सांगोलकर (डेप्युटी डायरेक्टर आरोग्य सेवा, एमबीबीएस, डी.एच., ओ.व्हि.डी.एच.), आयुष्यमती. डॉ. आशा पी. सांगोलकर (एमबीबीएस मेडिकल आफिसर), आयु. दयानंद अभिमन्यू भालेराव (प्राध्यापक), आयु. तानाजी

साहेबराव सोनवणे (प्राध्यापक), आयु. प्रवीण प्रल्हाद भालेराव (कनिष्ठ अभियंता, एमएसईबी), आयु. अभय विष्णू भालेराव (सिव्हिल इंजिनियर). अगदी पहिल्यांदाच जे नोकरीला लागते त्यांची आणि नंतरच्या काळातील ज्यांना हुद्दे आहेत, अशांची ही यादी आहे. या परिषदेतून म्हणा किंवा या एकूण चळवळीमधून पूर्वाश्रमीच्या महारांनी जशी प्रगती केली, तशी मातंग समाजाची किती झाली? असे वाटणे साहजिक आहे; परंतु मातंग समाजाने पहिल्यापासून जसे अंबादेवी मंदिरप्रवेश अमरावती, पर्वती मंदिर सत्याग्रह पुणे येथे जशी परंपरावाद्यांची बाजू घेऊन वडिलोपार्जित चालत आलेला धर्म पाळण्यास आम्ही तयार आहोत म्हणून मंदिरप्रवेश नको म्हणून दलित चळवळीस विरोध केला. काही अपवाद वगळता तशाच प्रकारची भूमिका मातंग समाजाने या पन्नास पाऊणशे वर्षांच्या कालावधीत घेतली. हे विरोध करणे काही ठिकाणी तर सवतीमत्सरासारखे झाले. बौद्ध लोक अंधश्रद्धेला विरोध करतात, काही काही बोलतात म्हणून आमच्या मातंग समाजाचे लोक चार पाचच्याऐवजी दहाबारा पोतराज बोलावून 'बौद्धांच्या उरावर' सगळ्या गावातून वाजत गाजत मरिआई मिरवून आणून 'चां ऽ ग भला ऽऽ !' करून समाधान मानून घेतात. दिघ्घ निकाय या पुस्तकाचे लेखक आयु. वसंत धावारे यांनी उस्मानाबादला घडलेल्या एका सत्य घटनेची मजेशीर आठवण सांगितली. दलित कार्यकर्ते मुलांना शाळेत घाला म्हणून सांगत फिरायचे व आग्रह धरायचे. तेव्हा केवळ या चळवळीला विरोध करायचा म्हणून मातंग समाजाचे लोक मुद्दाम आपली मुलेच शाळेत पाठवित नव्हते! अशा या ना त्या कारणाने हा समाज या चळवळीपासून दूर राहिला. मातंग समाजाच्या कालोगणती मागाहून भटक्या विमुक्त समाजाचे तळमळीचे कार्यकर्ते फुले-आंबेडकरांना मानतात. विचार विनिमयासाठी व्यासपीठावर एकत्र येतात. बरेच दलित नसलेले लेखक, विचारवंत, कार्यकर्तेही फुले-आंबेडकरांना मानतात, तळमळीने आपले विचार मांडतात. पण आमचे काही मातंग बांधव बाबासाहेबांवर, या चळवळीवर टीका करण्यातच स्वतःला धन्य समजून घेऊन 'ज ऽ य मातंग!' म्हणून आपल्याच कोषात मशगूल राहातात! खरे पाहता या समाजव्यवस्थेने पूर्वाश्रमीच्या महारांपेक्षा मातंगांना जास्त यातना सोसाव्या लागल्या. महारांना गावकथापोटी मिळणारी बलुती तरी होती, गावगाड्यात महारांना शेवटचे स्थान तरी होते. ते स्थानही मातंग समाजाला त्या व्यवस्थेत नव्हते. या अन्यायाचा किती प्रचंड विद्रोह उफाळून यावयास हवा होता. पण फुले-आंबेडकरी विचारापासून हे दूर राहिल्यामुळे तसे घडले नाही. यांच्या कितीतरी मागाहून भटक्या विमुक्तांचा 'बंद दरवाजा' किलकिला झाला. पण ज्या व्यवस्थेने आपणास हीनदीन लेखून लाचारीचं जिणं जगण्यास लावलं, त्याचाच अजून जय गाजवणं ही आत्मवंचना आहे हे या समाजाच्या अजून ध्यानी येईना! या भागात तर सतत असे घडत आले आहे की, हा मतदार संघ राखीव असल्यामुळे निवडणुका पुढे वर्ष सहामहिने असतात तेव्हा ज्यांना तिकिट मिळण्याचे निश्चित झालेले असते तो माणूस इकडे येऊन चलो, तिकडे चलो म्हणून आपल्या नावाच्या मोठमोठ्या जाहिराती काढतो. मातंग समाजाच्या उन्नतीच्या नावाखाली सभा घेतो. या सभा संमेलनास मात्र मातंग समाज शंभर टक्के प्रतिसाद देतो. मनात काही आशा घेऊन असतो. पण तो निवडणुकीत पडलेला माणूस पुन्हा कधीच इकडे येत नाही! त्याच्या पुढच्या वेळी दुसरा माणूस पहिल्याने जे केले तसेच 'कार्य' करून निघून जातो.

दुसरे असे की, समाजाची कळकळ म्हणून कार्य करीत फिरणारा कार्यकर्ता मातंग समाजात अजूनही सापडत नाही. पण तो कार्यकर्ता तरी का सापडावा? ज्या रुढी परंपरांनी आपणास बहिष्कृत केले त्या अन्यायी परंपरांची प्रखर विरोधाची जाणीव जोपर्यंत मनात रूजत नाही तोपर्यंत समाज कार्यकर्ता तयार तरी कसा व्हावा? जे दलित मुक्तीचे आणि मानवी प्रगतीचे फुले-आंबेडकरी विचार हेच या देशातील कार्यकर्त्यांचे एकमेव इंधन आहे, त्या इंधनाचा (विचारांचा) उपयोग न करता उलट इथल्या परंपराच जर पूज्य मानून त्यांचाच जर जय गाजवायचा असेल तर क्रांती राहोच पण सुधारणा घडवून आणण्याचीही पंचाईत! अशा विचारांचे कार्यकर्ते बाबासाहेबांना पत्र लिहिणाऱ्या आयु. दे.ना. कांबळे यांच्यापासून आजपर्यंत आम्हीच मातंग समाजाचा एकमेव पुढारी किंवा भावी पुढारी आहे असे म्हणणारे आहेत. पण मातंग समाज ज्या गतीने पुढे यावयास हवा होता तसे काही झाले नाही. गेल्या पन्नास पाऊणशे वर्षांमध्ये फुले-आंबेडकरी विचाराने आणि फुले-आंबेडकरी विचाराशिवाय जे परिवर्तन झाले नाही हा दोन्ही समाजांमधील फरक लक्षात घ्यावा. जातीत माणसांची विभागणी झाली असल्यामुळे आंबेडकरी चळवळीचा महार-मातंगातला फरक जर दूरचा वाटत असेल तर आंबेडकरी चळवळीचा आंबेडकरी विचार आत्मसात करणे व न करणे यातला एकाच जातीतलाही फरक नजरेस आणता येण्यासारखा आहे. कसबे तडवळे या गावी भालेराव, सोनवणे व निकाळजे या तीन आडनावांच्या बौद्धांची वस्ती. तिन्ही आडनावांची लोकसंख्या जवळजवळ समान असल्यासारखी. पण अगदी सुरुवातीलाच बाबासाहेबांनी जे संदेश दिले ते तेव्हापासूनच ज्यांनी अंमलात आणले, ते मागील दिलेल्या यादीमध्ये पुढे गेलेले दिसतात आणि ज्यांनी बाबासाहेबांचे विचार समजून घेऊन अंमलात आणण्यास उशीर केला ते मागे राहिलेले दिसतात. या कार्यक्रमाच्या दिवशी पोतराज व साधू यापैकी ज्यांनी ज्यांनी आपल्या डोक्यावरचे केस कापले त्याचे प्रमुख होते कडकाथ महाराज. ते मातंग समाजाचे प्रमुख होते. त्यांनी केस कापण्यास बऱ्याच लोकांना प्रवृत्त केले होते. या काळी महार-मातंग समाजाचे संबंध एकोप्याचे होते. त्यापुढील काळी जयंतीची मिरवणूक निघे, तेव्हा दादाराव कसबे व दासू कसबे हे बाबासाहेबांच्या फोटोजवळ बैलगाडीत बसलेले असत. ●●●

**(लेखक सामाजिक कार्यकर्ते आहेत.)**




# ‘मूकनायक’ म्हणजे आंबेडकरी पत्रकारितेची सुरुवात

अस्पृश्यांतील नवा माणूस परंपरागत मानसिकता झुगारून देऊन स्वत:ची नवी सृष्टी निर्माण करणारा असेल,अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धारणा होती. त्या धारणेला बळ मिळावे म्हणून त्यांनी वृत्तपत्रासारखे माध्यम स्वीकारले अन् ३१ जानेवारी १९२० रोजी ‘मूकनायक’ची सुरुवात केली. लोकशिक्षण आणि लोकसेवा ही वृत्तपत्रांची मूलभूत प्रेरणा असते. त्यातून समाजधारणेचे महान काम करता येऊ शकते, असा विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होता. समाजधारणेबरोबरच समाजनिर्मितीची प्रतिज्ञा वृत्तपत्र करीत असतात. **त्यामुळे त्यांना प्रसंगी संघर्षसन्मुखता स्वीकारावी लागते. शोषण, दास्य, हुकुमशाही याविरुध्द प्रसंगी जहाल रुप धारण करावे लागते; परंतु भारतातील वृत्तपत्रे पुष्कळदा आपल्या स्वीकृत कार्यापासून दुरावलेली आहेत. परिणामी तत्त्वच्युती आणि लाचारी स्वीकारणारी वृत्तपत्रे मानवी कलह आणि नैतिक अध:पतनाला कारणीभूत ठरतात.**



यशवंत भंडारे

छपाईच्या तंत्रज्ञानाच्या शोधाने जगभर प्रबोधनाच्या युगाचा प्रारंभ झाला. हा शोध क्रांतिकारक ठरला. इ.स.नंतरच्या दुसऱ्या शतकात मुद्रण कलेचा उगम चीनमध्ये झाल्याचं गृहीत धरलं तरी खऱ्या अर्थानं विकसित मुद्रण कलेचा विकास होण्यास इ.स. १४५० हे वर्षे उजाडावे लागलं. त्याचं श्रेय गुटेनबर्ग यांच्याकडे जातं. भारतामध्ये मुद्रणतंत्र प्रथम इ.स. १५५६ मध्ये माहीत झालं.यावर्षी गोव्यात पोर्तुगीज लोकांनी एक मुद्रणालय सुरू केलं; परंतु त्यावर छापलेल्या पहिल्या पुस्तकाची भाषा आणि लिपी मात्र परकीय होती. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी एक छापखाना उभारला होता; परंतु त्यांना तो सुरू करणं शक्य झालं नाही, त्यांनी तो १६७४ मध्ये गुजरातमधील भीमजी पारेख या व्यापाऱ्यास विकला. तथापि, खऱ्या अर्थानं महाराष्ट्रात मुद्रणची सुरुवात १८१२ मध्ये झाली. त्यावर्षी अमेरिकन मिशनने मुंबईत मुद्रणालय सुरू केले. त्यांनी रामपूर येथून देवनागरी लिपीचे काही खिळेही त्यासाठी आणले होते. त्यावर १८१७ मध्ये छापलेले एक

पुस्तक उपलब्ध आहे.

मुद्रणतंत्राची सुरुवात झाल्यानंतर गेल्या पाच शतकांपेक्षाही जास्त काळ या तंत्रानं सुसंस्कृत समाजावर एक प्रकारे प्रभुत्व ठेवलं आहे आणि ज्ञानाचा ठेवा जतन करून ज्ञान प्रसाराचे काम कौशल्यानं केलं आहे. साधारणपणे ज्या काळात मोठे वैज्ञानिक शोध जगात लागत होते, त्याच काळात मुद्रण तंत्राचा शोध लागल्यानं ज्ञानाच्या प्रसाराला फार मोठी मदत झाली. शिवाय समाजातील आर्थिक किंवा सैध्दांतिकदृष्ट्या सांस्कृतिक संगमाला चालना मिळाली. त्यामुळं जगातील ज्ञान पसरण्याला मुद्रणाच्या शोधामुळं फार मोठी चालना मिळाली. म्हणून मुद्रणाच्या शोधाला ज्ञान प्रसाराच्या दृष्टीनं ऐतिहासिक महत्त्व आहे. मुद्रणामुळं ज्ञानाचा साठा होण्यास आणि त्याची अविरत वाढ होण्यास मदत झाली. प्रत्येक पुढील युगाला मागच्या ज्ञानाचा ठेवा मिळाला आणि त्या त्या काळातील माणसांनी पूर्वीच्या ज्ञानाचा उपयोग करून त्यात नवीन भर घातली; परंतु भारतात मात्र हे सर्व ज्ञान कुलूपबंद होतं. केवळ काही लोकांपुरतं मर्यादित होतं. हे कुलूपं तोडण्याचं काम ब्रिटिशांच्या आगमनानंतर झालं. त्यामुळे अनेक वर्गाला त्यातही शुद्र-अतिशुद्रांसाठी अशा ज्ञानाच्या मंदिराचं कुलूपं तोडल्यानं त्या मंदिरांची दारं थोडी खिळखिळी झाली. त्या ज्ञानरुपी मंदिरात अशा उपेक्षितांना महात्मा जोतिराव फुले यांनी सर्वप्रथम प्रवेश दिला. त्यामुळं या ज्ञान मंदिरातील ज्ञानरुपी प्रकाशानं हा समाज थोडासा प्रकाशमान होऊ शकला. ब्रिटिशांच्या धोरणांचाही त्यास हातभार लागला. समाज सुधारकांनी सामाजिक प्रबोधनाच्या माध्यमातून बळ देण्याचं काम केलं. अर्थात, एकोणिसाव्या शतकात भारतासह महाराष्ट्रात प्रबोधनाला सुरुवात झाली.

ब्रिटिशांच्या भारत आगमनानंतर त्यांनी सुरू केलेल्या सर्व प्रकारच्या सुधारणांमुळं आधुनिक वैचारिक क्रांतीची बीजं देशात रुजण्यास सुरुवात झाली. त्याचा परिणाम म्हणजे विवेकवादाचे तेजस्वी हत्यार परजून समाजसुधारकांनी समाजाला नवे परिमाण, नवा प्रत्यय आणि नवी गतिमानता देण्याचे प्रभावी अन् जोरकस प्रयत्न महाराष्ट्रात केले. प्रबोधनपर्वाचे नियंते म्हणून एकोणिसाव्या शतकातील समाजचिंतक आणि समाजसुधारक यांना संपूर्ण श्रेय द्यावे लागेल. प्रबोधनाच्या माध्यमातून सामाजिक व्यवस्थेची पुनर्मांडणी करणे, जागरण करणे, परिवर्तनास मानवी मन तयार करणे आणि मानवाला सर्वांगीण प्रतिष्ठा मिळवून देण्याचा विचार समाजमनावर बिंबवण्याचं काम मराठी वृत्तपत्रसृष्टीनं केलं. कारण, '' ब्रिटिशांच्या पूर्वीच्या हजार वर्षांच्या काळात येथे समाजरचनेची जी तत्त्वे मान्य आणि रुढ झाली होती. त्यातील जवळजवळ प्रत्येक तत्त्व मानवी प्रतिष्ठेला घातक असेच होते. कलियुगाची कल्पना, नियतीवाद, संसाराची उपेक्षा, तर्काची अवहेलना, जन्मनिष्ठ उच्चनीचता, शब्दप्रामाण्य ही तत्त्वे व्यक्तीच्या स्वत्वाची पायमल्ली करणारी होती. येथील आचारधर्म, त्यांचे सर्व कर्मकांड त्यांच्याच आधाराने उभारलेले होते. असल्या धर्माच्या अनुयायांमध्ये मानवी कर्तृत्वाचा निर्देशांक असा कोणताही गुण निर्माण होणे शक्य नव्हते,'' असे मत डॉ. पु. ग. सहस्त्रबुध्दे यांच्या 'केसरीची त्रिमूर्ती ' या ग्रंथात नोंदवले आहे. या मतावरून तत्कालीन समाजजीवनाची प्रचिती येते. त्यामुळे वृत्तपत्र हे आधुनिक विकासाचे आणि लोकशिक्षणाचे प्रभावी साधन आहे, हे ओळखून त्याचा वापर समाज सुधारकांनी मोठ्या नियोजकतेने केला.

महाराष्ट्राने नेहमीच देशाचं वैचारिक आणि प्रबोधनाचं नेतृत्व केलं आहे. त्यातही आधुनिक माध्यमांचा अर्थात वृत्तपत्रांचा-नियतकालिकांचा त्यासाठी चपखलपणे वापर करण्यातही महाराष्ट्र आघाडीवर राहिला. वृत्तपत्रांच्या माध्यमातून संपूर्ण देशातील समाजमनावर परिणाम करू शकणारे प्रबोधक, विचारवंत, समाजसुधारक आणि संपादक महाराष्ट्राच्या मातीतूनच निर्माण झाले आहेत. त्यांच्या वैचारिक वारशाचं स्फुल्लिंग घेऊन नवसमाज निर्मितीचं काम सुमारे दीडशे ते पावणेदोनशे वर्षांपासून सुरू झालं आहे. महाराष्ट्राबरोबरच देशातही नवविचार आणि नवीदिशा देण्याचं काम या मंडळींनी केलं आहे. महाराष्ट्राच्या नि देशाच्या सर्वांगीण प्रगतीचं आणि वृत्तपत्रांचं घनिष्ट असं नातं राहिलं आहे. मराठी वृत्तपत्रांनी समाज सुधारणा, राष्ट्रउभारणी, राष्ट्राची प्रगति, समाजप्रबोधन आणि समाज जागृतीचा जणू विडाच उचललेला असल्यानं भारताच्या नव्या जडणघडणीचं बहुतांश श्रेय मराठी वृत्तपत्रांच्या संपादकांना, पत्रकारांना नक्कीच द्यावं लागेल.

भारतातील पहिलं वृत्तपत्र १८ जानेवारी १७८० रोजी जेम्स ऑगस्ट हिकी या ब्रिटिश गृहस्थानं 'बेंगॉल गॅझेट' या नावानं सुरू केलं. विशेष म्हणजे हिकी यांनी आपलं वृत्तपत्र सर्वांसाठी खुलं असेल आणि ते कुठल्याही दडपणापासून मुक्त असेल, असं जाहीर केलं. त्याच्या अधिक भारतीय होण्याच्या कारणांमुळं ब्रिटिशांनी त्याला हे वृत्तपत्र बंद करण्यास भाग पाडलं. तसं पाहिलं तर भारतीय भाषेतील पहिलं वृत्तपत्रही समाजसुधारकानच सुरू केलं. ते म्हणजे राजाराम मोहन राय यांनी. त्यांनी १८२० मध्ये संवाद कौमुदी  या नावाचं वृत्तपत्र बंगाली भाषेत सुरू केलं. तर मराठीतील पहिलं दर्पण नावाचं वृत्तपत्र ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलं. जांभेकर यांनी १८८ वर्षापूर्वी दर्पण सुरू करताना पहिल्या अंकात त्यामागची मांडलेली भूमिका खऱ्या अर्थानं प्रबोधन, माहिती, शिक्षण आणि मनोरंजन या वृत्तपत्राच्या मूळ हेतूशी समरस होणारी आहे.  नव्या ज्ञानाचा, पाश्चात्य विद्यांचा लोकांना परिचय व्हावा, त्याचा अभ्यास व्हावा आणि त्याव्दारे देशाची समृध्दी व्हावी, लोकांचे कल्याण साधावे असे सांगून जांभेकरांनी धर्म आणि समाजसुधारणांसाठी पोषक अशीच भूमिका घेतली होती. अर्थात, ज्ञानाधारित समाज (knowledge Based Society) ची संकल्पना मांडली होती.

लोकमान्य टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांनी १८८१ मध्ये केसरीची सुरुवात केली. पण आगरकर आणि

टिळकांमध्ये वैचारिक मतभेद झाले अन् १८८७ मध्ये केसरीतून आगरकर बाहेर पडले. त्यांनी 'सुधारक' हे वृत्तपत्र सुरू केले. टिळकांनी 'केसरी' नव्या भूमिकेतून चालवला. केसरीसंबंधी टिळकांनी व्यक्त केलेली भावनाच त्यांचा वृत्तपत्रविषयक हेतू स्पष्ट करतो. ते म्हणतात, लोकमत जागृती, खळबळ व संघशक्ती उत्पन्न करणे हेच वृत्तपत्राचे या दृष्टीने आमचे मुख्य कर्तव्य असते, असे आम्ही समजतो. आम्ही केसरीत जे लेख लिहितो ते केवळ राज्यकर्त्यांकरिता नसून, आमच्या मनातील विचार, तळमळ किंवा जळफळ सर्व मराठी वाचकांच्या मनात उतरावी एवढ्याकरिताच आहे. आमच्या लेखाचा जर असा परिणाम होत नसेल तर आमचे श्रम फुकट गेले असे आम्ही समजू. अर्थात, टिळकांना लोकांत जागृती करण्याबरोबरच त्यांना संघटित करून त्यांना कृतीप्रवण करावयाचे होते. म्हणजे लोकांत जागृती करून स्वातंत्र्य लढ्यासाठी एकत्र करून स्वातंत्र्याच्या समरात भारतीय जनतेला सहभागी करून घ्यावयाचे होते.

टिळकांच्या वृत्तपत्रीय हेतूच्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही हेतू असाच होता. टिळकांना ब्रिटिशांच्या जोखडातून भारत मुक्त करण्यासाठी लोकजागृती करावयाची होती तर बाबासाहेबांना वृत्तपत्राच्या माध्यमातून अस्पृश्य समाज बांधवांमध्ये जागृती करून, त्यांचे संघटन करून अस्पृश्यांना आत्मपरीक्षण करण्यास बाध्य करून त्यांच्यात आत्मसन्मानाची, सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होण्याची प्रेरणा निर्माण करून त्यांना स्वकियांबरोबरच्या संघर्षाला जुंपावयाचे होते. टिळकांचा शत्रू एकच होता तो म्हणजे ब्रिटिश. बाबासाहेबांना स्वकियांबरोबरच (म्हणजेच उच्चवर्णीय), ब्रिटिशांशीही दोन हात करावे लागत होते. स्वजातीतील अज्ञानाविरुध्दही संघर्ष करून स्वकीय अस्पृश्यांमध्ये चेतना निर्माण करण्याची मोठी कसरत बाबासाहेबांना करावी लागत होती. सर्वार्थानं गलितगात्र झालेल्या समाजात समग्र सामाजिक क्रांतीची बीजं पेरावयाची होती.

अस्पृश्यांतील नवा माणूस परंपरागत मानसिकता झुगारून देऊन स्वत:ची नवी सृष्टी निर्माण करणारा असेल,अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धारणा होती. त्या धारणेला बळ मिळावे म्हणून त्यांनी वृत्तपत्रासारखे माध्यम स्वीकारले अन् ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक'ची सुरुवात केली. लोकशिक्षण आणि लोकसेवा ही वृत्तपत्रांची मूलभूत प्रेरणा असते. त्यातून समाजधारणेचे महान काम करता येऊ शकते, असा विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होता. समाजधारणेबरोबरच समाजनिर्मितीची प्रतिज्ञा वृत्तपत्र करीत असतात. त्यामुळे त्यांना प्रसंगी संघर्षसन्मुखता स्वीकारावी लागते. शोषण, दास्य, हुकुमशाही याविरुध्द प्रसंगी जहाल रुप धारण करावे लागते; परंतु भारतातील वृत्तपत्रे पुष्कळदा आपल्या स्वीकृत कार्यापासून दुरावलेली आहेत. परिणामी तत्त्वच्युती आणि लाचारी स्वीकारणारी वृत्तपत्रे मानवी कलह आणि नैतिक अध:पतनाला कारणीभूत ठरतात. जेव्हा वृत्तपत्र लोकमत जागविणे आणि जगविणे या आपल्या बांधिलकीपासून दूर जातात तेंव्हा सभ्यता, संस्कृती, लोकभावना आणि लोकमानस याची प्रतिमा मलिन करतात. याची जाणीव ठेऊन बाबासाहेबांनी पत्रकारितेचे कार्य सुरू केले. त्याच तत्कालीन वृत्तपत्रांचा अस्पृश्य समाजाप्रती विशेष असा दृष्टिकोन होता. पांढरपेशी दृष्टिकोनातून ते अस्पृश्यांच्या प्रश्नांकडे पाहत असत. त्यामुळे त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विचारांना खूप मर्यादा होत्या. ''सामाजिक प्रश्नांचे हे रण प्रामुख्याने पांढरपेशांपुरतेच मर्यादित होते. बहुजन समाज आणि त्या पलिकडील असलेला दलित वर्ग त्यांच्या सामाजिक तसेच अन्य प्रश्नांची जाणीवही फारशी निर्माण झाल्याचे आढळत नाही, '' असे रा. के. लेले यांनी 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या ग्रंथात नोंदविलेले मत वस्तुस्थितीचे द्योतक आहे.

तथापि, महात्मा जोतीराव फुल्यांच्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीतून १ जानेवारी १८७७ रोजी कृष्णराव भालेकर यांनी 'दीनबंधू' हे वृत्तपत्र सुरू केले. 'दीनबंधू'ची सुरुवात एका अपरिहार्यतेतून झाली होती. 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथात डॉ.गंगाधर पानतावणे यांनी यावर नेमके बोट ठेवले आहे. ते म्हणतात, '' ब्राम्हणेत्तर वृत्तपत्रेही एका अपरिहार्य गरजेतून जन्माला आल्यामुळं शेतकरी, कष्टकरी यांच्या जीवन मरणाच्या प्रश्नांचा ऊहापोह त्यातून होत असे. शुद्रातिशुद्रांमध्ये नवी जागृती निर्माण करण्याचा आणि धार्मिक शोषणाचा समाचार घेऊन त्यास कारणीभूत असणाऱ्या वृत्ती प्रवृतींचा शोध घेण्यासाठी दीनबंधू, दीनमित्र, शेतकऱ्यांचा कैवारी, अंबालहरी, विजयी मराठा यांसारख्या ब्राम्हणेत्तर पत्रांनी आपली लेखणी परजली. त्यामुळे ह्या पत्रांना त्याकाळी विरोधही फार मोठ्या प्रमाणात झाला.'' यावरून तत्कालीन पत्रकारितेचे स्वरुप, भूमिका आणि कार्य करण्याची पध्दती लक्षात येते.

विशेष म्हणजे, ब्राम्हणेत्तर वृत्तपत्रांनी ब्राम्हणेत्तरांची अस्मिता जागविण्याचे काम मोठ्या प्रमाणावर केले; परंतु ब्राम्हणेतरातील बहिष्कृत वर्गाला, या वृत्तपत्रांत फारसे स्थान नव्हते. ''बहुतेक ब्राम्हणी पत्रांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांची उपेक्षा केली. त्यांच्या मुक्तीलढ्याचा उच्चार केला नाही हे आपण समजू शकतो; परंतु महात्मा फुल्यांच्या तत्त्वज्ञानातून उभे राहिलेल्या ब्राम्हणेत्तर पत्रांनी अस्पृश्याच्या मूलभूत प्रश्नांवर कधीही भर दिला नाही. अस्पृश्यांच्या मुक्तीसंग्रामाला प्राथम्य आणि प्राधान्य देण्याची या पत्रांची तयारी नव्हती. तेंव्हा आपले प्रश्न आपणच मांडले पाहिजे, ही भूमिका दलितांना घेण्याशिवाय गत्यंतर नव्हते. आपल्या सुख-दुखाचा, व्यक्तिमत्वाचा, संघर्षाचा विचार स्वत: व्यक्त करण्याची गरज ज्या पहिल्या दलित पत्रकाराला वाटली त्याचे नाव गोपाळबाबा वलंगकर. त्यांनी १८८८ मध्ये 'विटाळ विध्वंसन' नावाची पुस्तिकाही लिहिली होती. ते १८८६ मध्ये लष्करातून निवृत्त झाले

होते. त्यांनी 'दीनबंधू' आणि इतर वृत्तपत्रांतून लेखन करून अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली.

दलितांचे पहिले संपादक म्हणून शिवराम जानबा कांबळे यांचा उल्लेख करावा लागतो. १ जुलै, १९०८ रोजी जन्माला आलेले, शिवराम कांबळे यांचे 'सोमवंशीय मित्र' हे पहिले दलितपत्र होय. त्यापूर्वी म्हणजे शिवराम जानबा कांबळे यांच्यापूर्वी किसन फागू बंदसोडे यांनी तीन वृत्तपत्र काढल्याचे म्हटले जाते. त्यात १९०१ मधील 'मराठी दीनबंधू' , १९०६ मधील 'अंत्यज विलाप' आणि १९०७ मधील 'महारांचा सुधारक' यांचा समावेश होतो; परंतु ही तीनही पत्रे प्रकाशित झाली किंवा नाही याची माहिती मिळाली नसल्याचे डॉ. गंगाधर पानतावणे यांनी नोंदविले आहे. शिवराम जानबा कांबळे यांचा जन्म पुणे येथे १८७५ मध्ये झाला होता. कोल्हापूर येथून प्रकाशित होणाऱ्या 'मराठा दीनबंधू' या पत्रात कांबळे यांचे पहिले पत्र १५ ऑक्टोबर १९०२ रोजी प्रसिध्द झाले होते. नागपूर जिल्ह्यातील मोहपा येथे १८ फेब्रुवारी, १८७९ रोजी जन्मलेल्या किसन फागू बंदसोडे यांचे गोपाळबाबा वलंगकर आणि शिवराम कांबळे यांच्याबरोबरीचे कार्य आहे. समाजाचे निरीक्षण आणि समाजासाठी करावयाची कर्तव्ये यातून घडलेले चिंतन, लेखनाच्या रुपाने त्यांनी प्रगट केले. देशसेवा, सुबोध पत्रिका, मुंबई वैभव, ज्ञानप्रकाश, केसरी आणि काळ या त्यावेळच्या वृत्तपत्रांतून त्यांनी सामाजिक आणि धार्मिक प्रश्नांसंबंधीचे लेखन प्रकाशित केले. निरश्रित हिंद नागरिक (१९१०), विटाळ विध्वंसक (१९१३) आणि मजूर पत्रिका (१९१८) ही वृत्तपत्रे सुरू करून त्यांनी दलितांचे प्रश्न जगाच्या वेशीवर मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व दलित पत्रकारांनी कधी प्रखर तर कधी सौम्य भाषेचा वापर करून अत्यंत जोमदार कार्य आपल्या लेखणीद्वारे केले. त्यांच्या पत्रकारितेच्या उद्दिष्टांकडे सूक्ष्मपणे लक्ष दिल्यास त्यांची पत्रकारिता केवळ नि केवळ अस्पृश्यांच्या जागृतीच्या उद्दिष्टाने जन्माला आली होती, असे दिसते. प्रामुख्याने अस्पृश्यता घालवणे, अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी हिंदू समाज आणि ब्रिटिश सरकार यांच्याकडे विनंती करणे, अस्पृश्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, अस्पृश्यांना त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून देणे, समाज, धर्म, संस्कृती, इतिहास, अस्पृश्याची एकूण स्थिती याबाबत वैचारिक लेखनही प्रसिध्द करणे हा त्या पत्रकारितेचा हेतू राहिला. त्या पत्रकारांच्या लेखनास भाषेचा डौल नव्हता; परंतु अंत:करणाला भिडणारी सरळ आणि सुलभ भाषा हीच त्यांच्या विचारवहनाचे माध्यम होते. तथापि, बाबासाहेबपूर्व पत्रकारांच्या पत्रकारितेला राजकीय चळवळ आणि राजकीय विचारांची पार्श्वभूमी नव्हती. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचाच उदय व्हावा लागला. वस्तुत: राजकीय हक्कांपेक्षा सामाजिक हक्कांची लढाईच त्यांना महत्त्वाची वाटली आणि त्या हक्कांच्या मागणीसाठी त्यांनी लोकप्रबोधनाचा वसा घेतला होता.

''भावी उन्नती आणि तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरुपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही,'' असा ठाम विश्वास असलेल्या डॉ.बाबासाहेबांनी 'मूकनायक'च्या हेतूचा पहिल्या अंकात मांडलेल्या उद्देशातून त्यांच्या पत्रकारितेची दिशा स्पष्ट होते. बाबासाहेब म्हणतात, ''आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या आणि पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाय योजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती आणि तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरुपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही; परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या वृत्तपत्रांकडे पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट अशा जातीचे हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातींच्या हिताची पर्वा त्यांना नसते. इतकेच नव्हे तर केंव्हा केंव्हा त्यांना अहितकारक असेही प्रताप त्यातून निघतात. अशा पत्रकारांना आमचा इशारा आहे की, कोणतीही एखादी जात अवनत झाली तर तिच्या अवनतीचा चट्टा इतर जातीस बसल्याशिवाय राहणार नाही.''

इंग्रजीत एक म्हण आहे, 'हू विल वॉच द वॉचमन' पहारेकरी नेमून जबाबदारी संपत नाही, तर तो झोपला आहे की जागा आहे हेही बघावे लागते. एरवी तो झोपलेलाच असण्याचा संभव असतो. हे काम वृत्तपत्रांनी करावयाचे असते, तेच तत्कालीन वृत्तपत्रांच्या संपादकांनी दुर्लक्षित केले होते. वृत्तपत्रांनी समाजात 'जागल्या' म्हणून काम करावे, असेही म्हटले जाते. 'जागल्या' जर एकाच जातीच्या हिताचा विचार करणारा असेल तर इतरांच्या हितांचा पालापाचोळा होतो. तेच तत्कालीन पत्रकारितेत होत होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अशा मनोवृत्तीच्या पत्रकारांची चीड होती. म्हणून त्यांनी आगबोटीचे उदाहरण देऊन हा विचार अधिक ठळकपणे स्पष्ट केला. ते म्हणाले, ''ज्याप्रमाणे आगबोटीत बसून प्रवास करणाऱ्या उतारुने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा जर का इतरांच्या खोलीत छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधी घ्यावी लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने, अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार, यात बिलकुल शंका नाही. म्हणूनच स्वहितसाधू पत्रांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करावयाचे पडतमूर्खाचे लक्षण शिकू नये.'' वृत्तपत्रांनी सर्वच जातींच्या कल्याणाचा विचार करावा, त्या अनुषंगाने भूमिका घ्यावी. स्वार्थप्रेरित आणि स्वहिताच्या मागे लागलेली पत्रे स्वत:बरोबरच इतरांचेही नुकसान करतात. या मनोगतात बाबासाहेबांनी वृत्तपत्रांची नैतिक जबाबदारी नेमकी कोणती असावी, हेच ठामपणे सांगितले आहे.

एकूण काय तर गुळगुळीत कागदावर बुळबुळीत मजकूर छापून लोकांचे रंजन करणे हे काही त्या काळच्या सर्वच वृत्तपत्रांचे मुख्य ध्येय नव्हते. स्वदेश संरक्षण करण्यासाठी आपले साधन नेहमी लखख धारदार ठेवण्याची दक्षता


मूकनायक



त्यांनी 'जागल्या' सारखी घेतली. तीच जागल्याची भूमिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वीकारली. ती भूमिका त्यांनी केवळ स्वीकारली नाही तर ती भूमिका त्यांनी यशस्वी केली. शाहू महाराज यांनी उदार हस्ते केलेल्या अडीच हजार रुपयांच्या मदतीतून बाबासाहेबांनी मूकनायक या पाक्षिकाचा प्रारंभ केला. 'मूकनायक' हे नावही अर्थपूर्ण असेच होतं. हजारो वर्षापासून मूक झालेल्या समाजाचे नायकत्व स्वीकारून 'मूक' झालेल्या समाजाला जागवण्याचं कार्य सुरू करण्याची जणू घोषणाच त्यांनी केली होती. आजचे मुके उद्या नक्की बोलू लागतील हा विश्वास त्यांना उपेक्षित समाजाला द्यावयाचा होता. रा.क.लेले यांनी ''मूकनायक हे नाव मूकजनांना बोलायला लावण्याचे साधन आहे, हे सूचित करणारे होते. 'मूक करोती वाचालम' याचा पडसादही नावात आढळतो. मूक असलेला, दबलेला असा हा समाज आहे. तरी गर्जना करून नायक बनण्याची धमकही त्याच्यात आहे, असा आत्मविश्वासही नावातून दृग्गोचर होतो,'' असे मत नोंदविले आहे. वृत्तपत्रासारख्या लोकसंवादाच्या माध्यमातून बाबासाहेबांनी प्रबोधनाची ज्योत पेटवली. मूकनायक सुरू केलं तेव्हा बाबासाहेब सिडनेहॅम या मुंबईतील सरकारी महाविद्यालयात प्राध्यापक होते. म्हणून ते 'मूकनायक'चं संपादकपद स्वीकारू शकत नव्हते. त्यामुळं त्यांनी पांडुरंग नंदराम भटकर या तरुणाकडे संपादकत्वाची जबाबदारी सोपवली. तथापि, मूकनायकच्या अंकातलं सर्व लेखन प्रामुख्यानं बाबासाहेब करत असत. मूकनायकच्या पहिल्या चौदा अंकांतील लेखन-संपादकीय बाबासाहेबांनी लिहिले. अस्पृश्यांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरेल अशा स्वतंत्र वृत्तपत्राची गरज मूकनायकनं पूर्ण केली होती.

पाक्षिक 'मूकनायक'चा रजिस्ट्रेशन क्रमांक बी १४३० होता. दर शनिवारी त्याचा अंक प्रकाशित होत असे. 'मूकनायक' शीर्षकाच्या उजव्या बाजूला जाहिरातींचे दर तर डाव्या बाजूस वर्गणीचा दर छापलेला असे. जाहिरातीचा दर असा लिहिला जात असे. ''कॉलमच्या दर ओळीस पहिल्या वेळी पाच आणे, दुसऱ्या वेळी चार आणे आणि कायम अडीच आणे.'' किरकोळ अंकाची किंमत दीड आणा होती. 'मूकनायक'चे कार्यालय १४, हरारवाला बिल्डिंग, डॉ. बाटलीवाला रोड, पायेबावडी, वरळ, मुंबई येथे होते. त्याची छपाई का. र. मित्र यांच्या 'मनोरंजन' छापखान्यात होई. 'मूकनायक' सुरू झाले तेव्हा लोकमान्य टिळक हयात होते. इतर अनेक वृत्तपत्रांची दखल घेणाऱ्या केसरीनं 'मूकनायक'ची दखल घेण्याचं सौजन्य दाखवलं नाही. जागा नसल्याचे कारण देऊन पैसे घेऊन जाहिरात छापण्यासही 'केसरी'नं नकार दिला.

बाबासाहेबांना इंग्रजीत विचार करण्याची आणि लिहिण्याची सवय होती. त्यामुळे मूकनायकसाठी लेखन करताना ते प्रथम इंग्रजीत लिहित आणि त्याचे नंतर मराठीत स्वत:च भाषांतर करत. बाबासाहेबांचे सर्वच लेखन प्रामुख्यानं इंग्रजी भाषेतून आहे. त्यांनी मराठी भाषेत केलेले लेखनही तितकेच मौलिक आहे. त्याचे प्रमाण कमी आहे; परंतु गुणात्मकदृष्ट्या खूपच उपयुक्त आहे. त्यांचे मराठी भाषेतील लेखन काहीसे दुर्लक्षित राहिल्याचे जाणवत असले तरी त्यांच्या विचारवहनाला त्यामुळे मोठी मदत झाली आहे. त्यांच्या मराठी भाषा प्रेमाचे प्रतिबिंब मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता आणि प्रबुध्द भारत या चार वृत्तपत्रांच्या माध्यमातून उमटले आहे.

लोकजागृती, प्रबोधन आणि परिवर्तनासाठी लोकांच्याच भाषेत संवाद साधावा लागतो. तोच संवाद जनसामान्यांच्या मनाचा ताबा घेऊन त्यांच्या वैचारिक , मानसिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाची नांदी ठरतो, हे बुध्दाने पंचवीसशे वर्षापूर्वी हेरले होते. त्यामुळे त्यांनी तेव्हा अभिजनाच्या संस्कृत भाषेत संवाद साधला नाही. लोकांच्या दैनंदिन व्यवहारातील 'पाली' भाषेचाच वापर केला. ज्यांना लोकांशी थेट संवाद साधून समग्र परिवर्तनासाठी जनमत तयार करावे लागते ते जनतेचीच भाषा

बोलतात. त्याचप्रमाणे बाबासाहेबांचा समाज मोठ्या प्रमाणात निरक्षर, अज्ञानी, परंपरांच्या जोखडात जखडलेला होता. त्याला त्या जोखडातून बंधमुक्त करावयाचे होते. त्यामुळे त्यांनी त्याच्याच भाषेचा वापर त्यांच्यासाठीच्या लेखनासाठी केला आणि थेट संवादासाठीही केला. विशेष म्हणजे, बाबासाहेबांनी त्यांच्या लेखनास कुठेही इंग्रजी वळण लागू दिले नाही. हल्ली अर्धशिक्षितही मराठी बोलताना इंग्रजी शब्दांचा नुसता भडीमार करतात; परंतु बाबासाहेबांची मराठी भाषा अस्सल मराठी भाषा होती. मराठी भाषेचा निखळ झराच जणू त्यांच्या मराठी लेखनातून खळाळताना दिसतो. जणू मराठी मन, मराठी भाषा आणि मराठी संस्कृती जगणाऱ्या माणसाला असा उधारपणा आणि उपरेपणा करण्याची गरजच भासली नाही. त्यांच्या मराठी लेखनाचा दुसरा विशेष गुण म्हणजे त्यांची भाषा कारण नसताना ग्रांथिक आणि क्लिष्ट बनविण्याची त्यांना कधीच आवश्यकता वाटली नाही. आभासी अन् स्वप्नाळू विश्वात स्वत:ला हरवून न घेता बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या उत्थानाची जाणीव कायम जागृत ठेवली. त्यांचे मूकनायकातील लेखन याची प्रचिती देते.

मूकनायक व्यवस्थितपणे चालू राहील याची खबरदारी बाबासाहेब स्वत: घेत होते. संपादक पांडुरंग भटकर जरी असले तरी व्यवस्थापक म्हणून साताऱ्याचे ज्ञानदेव घोलप यांची नियुक्ती केली होती. 'मूकनायक'ला साजेशी बिरुदावली ही त्यांनी अभ्यासाअंती शोधून निश्चित केली. लोकसंत तुकाराम महाराजांच्या अभंगाची त्यांनी निवड केली.

काय करु आता धरुनिया भीड ।<br>
नि:शंक हे तोंड वाजविले ।।<br>
नव्हे जगी कोणी मुकियांचा जाण ।<br>
सार्थक लागून नव्हे हित ।। १ ।।

तुकारामांनी या अभंगात 'मूकजनां'च्या अवस्थेचे वास्तव चित्रण तर केले आहेच त्याशिवाय 'आपली मुकी बिचारी कुणी हाका' अशी अवस्था करून घेण्यात काही अर्थ नाही, असा सूचक भावही व्यक्त केला आहे. मूकनायकच्या पहिल्या अंकातील अग्रलेखाचे शीर्षक 'मनोगत' असे देऊन मूकनायक सुरू करण्यामागची त्यांची नेमकी काय भूमिका आहे, हे विषद केले आहे. या अंकात अग्रलेखाबरोबरच स्फूट आणि सामाजिक कार्यासंबंधीची माहितीही देण्यात आली होती. मूकनायकच्या पहिल्या अग्रलेखात बाबासाहेबांतील बिन्नीच्या संपादकांचे सर्व गुण दिसून येतात. संपादकाकडे इतिहासाची, संस्कृतीची, धर्माची, वर्तमानात जगण्याची आणि भविष्य कवेत घेण्याची दृष्टी असावी लागते. ती बाबासाहेबांच्या ठायी ओतप्रोत भरलेली होती. म्हणूनच मूकनायकच्या पहिल्याच अंकात ते उराशी बाळगलेल्या ध्येयसिध्दीसाठी आणि सामाजिक परिवर्तनासाठी आपली वाणी, लेखणी झिजवणार असल्याचे सूतोवाच करतात. त्यांना कसा समाज आणि कसे राष्ट्र हवे आहे, याचेही दिशादर्शन त्यांनी या अंकात केले आहे. धर्मवाद, जातीवाद, सर्व प्रकारच्या विषमतेला मूठमाती देऊन नव्या समता, बंधुता आणि मानवता वादावर आधारित समाजाचे स्वप्न ते पाहताना दिसतात. त्यांच्या पत्रकारितेचा हाच ध्येयवाद होता.

वृत्तपत्राकडे आपण समाजाच्या आशाअपेक्षांचा दर्पण (आरसा) म्हणून पाहात असू तर त्यातून आपणास खूप काही मिळावयास हवे. सामाजिक चळवळीला नेमकी दिशा मिळावी. आरसा जसे तटस्थपणे काम करतो तसेच काम वृत्तपत्राच्या संपादकाने वैचारिक नेतृत्व देऊन करणे आवश्यक असते. त्यामुळे संपादक दूरदृष्टीचा आणि व्यापक वैचारिक गुणांचा परिपोष अंगी असलेला असावा. वृत्तपत्र हे सामाजिक अस्त्र असते. त्या अस्त्रातील स्फोटकांची आणि सामर्थ्यांची परिपूर्ण जाणीव संपादकांना असावी लागते. लोकांच्या प्रश्नांना, समस्यांना, त्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या घटकांना, समाजाच्या प्रगतीआड येणाऱ्या घटकांशी दोन हात करण्याची तयारी संपादकांच्या लेखनीत असावी लागते. आपले विचार आणि भूमिका निर्भिडपणे मांडून लोकमत बनवण्याचा सातत्याने आग्रहही संपादकास धरावा लागतो. विशेष म्हणजे, समाजामध्ये विशिष्ट विचारांचा प्रसार करून समाजाचे मतपरिवर्तनही साध्य करावे लागते. या सगळ्या संपादकीय गुणांची शिदोरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संपादकीय लेखातून वाचकांच्या समोर उलगडून दाखविली.

मूकनायकची घडी व्यवस्थित बसल्यानंतर त्यांचे अपूर्ण राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी ५ जुलै, १९२० रोजी ते इंग्लंडला रवाना झाले. पांडुरंग भटकर यांना मूकनायकच्या वाटचालीबाबत दिशादर्शन देऊन त्यांनी त्यांना या कामासाठी तयार केले होते. भटकर व्यवस्थापक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली मूकनायक चालवत होते. १९०८ मध्ये पुण्यातील फर्ग्यूसन कॉलेजमधून इंटरपर्यंतचं शिक्षण घेतलेल्या भटकरांचा लहान असतानाच ब्राम्हण मुलीशी विवाह झाला होता. भटकरांच्या विवाहास खूप विरोधही झाला होता. त्यामुळे त्यांना प्रतिष्ठा मिळवून द्यावी आणि त्यांच्या शिक्षणाचा उपयोगही व्हावा म्हणून बाबासाहेबांनी त्यांना ही जबाबदारी दिली होती. परंतु दोन मुलं असलेल्या भटकरांना आर्थिक चणचण भासू लागल्यानं त्यांनी मूकनायकची जबाबदारी सोडून पोर्ट ट्रस्टमध्ये नोकरी स्वीकारली. मूकनायक चालवण्याचे त्यांचे मन:स्वास्थ्यही राहिलेले नव्हते. त्यामुळे ते मूकनायकच्या जबाबदारीतून मुक्त झाले. त्यानंतर ज्ञानदेव घोलप यांनी मूकनायकचे संपादकत्व स्वत:कडे घेतले. हा सगळा प्रकार जेव्हा बाबासाहेबांना लंडनमध्ये कळला तेंव्हा ते तेथील अभ्यासात खूप व्यग्र होते. तरीही वेळ काढून ते मूकनायक कोणत्या पध्दतीने, कोणत्या विचारधारेवर चालवावा याबाबत लंडनमधून सूचना करत असतं.

घोलप यांनी मूकनायकचे कार्यालय बाबासाहेबांची परवानगी न घेता मुंबईतून साताऱ्यास हलवले. मूकनायकमुळे घोलप यांना संपादक म्हणून दलित समाजात मानसन्मान

मिळाला. सामाजिक कार्याचा लळा असल्यामुळे सामाजिक प्रश्नांवर लिहिण्याचे, भाषणं देण्याचेही त्यांना विलक्षण वेड होतं. घोलपांनी मूकनायक कसेबसे दोन वर्षे टिकविले. परंतु मूकनायकच्या व्यवस्थेसाठी जे मंडळ बाबासाहेबांनी नेमले होते, त्यांना मूकनायकचा हिशोबच न सांगण्याची भूमिका त्यांनी घेतली. त्यातच मूकनायकवर कर्जाचा बोजा वाढवून या नियतकालिकावर आपलीच मालकी असल्याचा दावाही दाखल केला. एवढेच नव्हे तर ज्ञानप्रकाशसारख्या वृत्तपत्रांतून बाबासाहेबांशी जाहीर वादही घातला. या सगळ्या प्रकारामुळे बाबासाहेबांना खूप मन:स्तापही झाला होता.

मूकनायकच्या व्यवस्थापन मंडळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सीताराम शिवतरकर, बाळाराम आंबेडकर, बाळाराम खडकर, संभाजी गायकवाड, संभाजी संतुजी वाघमारे आदींचा समावेश केला होता. बाबासाहेबांचे लंडनहून शिक्षण पूर्ण करून ३ एप्रिल, १९२३ रोजी मुंबईत आगमन झाले. त्यानंतर कार्यकर्त्यांनी त्यांना मूकनायकबाबत वस्तुस्थिती सांगितली. त्यामुळे बाबासाहेबांनी घोलप यांच्या कृत्याबाबत जाहीर स्पष्टीकरण दिले. आता आपला मूकनायकशी काही संबंध राहिला नाही. असा जणू खुलासाच त्यांनी केला. पूर्वीच्या मूकनायकचे संस्थापक आपणच आहोत, अशा आशयाचे पत्र त्या वेळच्या ज्ञानप्रकाश, गरिबाचा कैवारी आणि लोकमान्य वृत्तपत्रात प्रसिध्द झाले होते. घोलप यांनी ज्ञानप्रकाशमध्ये लेखन करून बाबासाहेबांना प्रत्युत्तर दिले. लंडनहून परतल्याबरोबर मूकनायकच्या वादाबाबत बाबासाहेबांना लगेच पत्रव्यवहार करावा लागल्याने त्यांचे मन खूप खट्टू झाले. दरम्यान, घोलपांनी साताऱ्याहून मूकनायकचे काही अंक प्रसिध्द केले अन् १६ एप्रिल, १९२४ रोज मूकनायक बंद पडले.

मूकनायक बंद पडल्यानंतर बाबासाहेबांनी ३ एप्रिल, १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' या पाक्षिकाची सुरुवात केली. बहिष्कृत भारतही बंद पडल्यानंतर २४ नोव्हेंबर, १९३० रोजी 'जनता' पाक्षिकाची सुरुवात केली. जनता २५ ते २६ वर्षे सुरू होतं. 'जनता'चे साप्ताहिकात रुपांतर ३१ ऑक्टोबर, १९३१ मध्ये करण्यात आलं. जनता ४ फेब्रुवारी, १९५६ पर्यंत सुरू होतं. जनताचं रुपांतर ४ फेब्रुवारी, १९५६ रोजी 'प्रबुध्द भारत' मध्ये करण्यात आलं. समता हे समता सैनिक दलाचे मुखपत्र होते. त्याचे संपादक देवराव विष्णू नाईक होते. ते २९ जून, १९२८ रोजी सुरू करण्यात आलं होतं. ते १९२९ पर्यंत सुरू होतं. देवराव नाईक बाबासाहेबांचे अनुयायी होते.

मूकनायक दोन तीन वर्षातच बंद पडले तरी त्यातून ज्या विविध प्रश्नांवर अग्रलेख, स्फूटलेख आणि पत्रव्यवहारातून जे विचारमंथन झाले, ते त्या काळातील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जडणघडण समजावून घेण्याच्या दृष्टीने ऐतिहासिक स्वरुपाचे आहे. मूकनायकमधील लेखनाने अस्पृश्य आणि अस्पृश्येत्तरांच्या एकूण परिस्थितीसंबंधीची कल्पना आली. प्रत्यक्षात दलितांच्या परिस्थितीचे चित्र अस्पृश्य समाजातील कार्यकर्त्यांसमोर आल्याने त्यांनाही आपल्या कार्याची दिशा आखता आली. १९२३-२४ नंतर अस्पृश्य आणि अस्पृश्येत्तर कार्यकर्त्यांनी जी वृत्तपत्रे काढली, त्यांच्यासाठी मूकनायक म्हणजे आदर्श उदाहरण झाले. मूकनायकमुळे राजकीय आणि सामाजिक कार्याची कोणती दिशा असावी हे स्पष्ट झाले. तसेच त्यातून समाजकारण आणि राजकारणाला चालना मिळाली. त्याचबरोबर मराठीतील कोणत्याही एका वृत्तपत्राला जी बाब कळाली नाही, ती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायकच्या माध्यमातून घडविली. ती म्हणजे अस्पृश्य समाजाला त्यांनी आपल्या लेखनीने विचारप्रवृत्त, कर्तव्यसन्मुख आणि अंतर्मुख बनविले. एवढेच नाही तर स्वत:च्या समाजापलीकडे पाहण्याचा परिचयही त्यांनी आपल्या लेखनीने घडविला. वैचारिक लेखन आणि वृत्तपत्रीय लेखनात व्यक्तिमत्वाचा आणि अभिव्यक्तीच्या बिंबप्रतिबिंब भावांचा संबंध असतो. म्हणून बाबासाहेबांचे लेखन ओजस्वीतेचे, जीवंत आणि ज्वलंतपणाचे रुप धारण करते. ''लोकहितवादी किंवा लोकमान्य टिळक यांची लेखनशैली मर्दानी (Masculine) आहे. तिचा पुरुषी थाट तिच्या प्रभावी अभिव्यक्तीतून अधिकच खुलून दिसतो. नवा समाज घडविण्याच्या ईर्ष्येला आणि ऊर्मिला धारदार, ओजस्वी तसेच सामर्थ्यसंपन्न भाषेचा अवलंब करावा लागतो. बाबासाहेबांच्या मर्दानी लेखनशैलीचे तर ते अंगभूत गुणविशेषच होते,'' असे डॉ. गंगाधर पानतावणे यांनी म्हटले आहे. ते सार्थ वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय लेखन महाराष्ट्रातील समाजाचे प्रबोधन तर निष्ठापूर्वक करतेच, त्याचबरोबर नवविचारांच्या सहाय्यानं समाजाच्या उत्कर्षाचा पाया मजबूत करते. हजारो वर्षांपासून ज्ञानवंचित आणि विद्यावंचित राहिलेल्या अस्पृश्यांकरिता नवविचार नक्कीच जीवनदायी ठरले. लोकशिक्षणाशिवाय अस्पृश्य समाज हा जागृत होऊ शकणार हे ओळखून बाबासाहेबांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनप्रबोधनाचे कार्य केले. या देशातील समस्त शोषित-वंचितांच्या परिवर्तनासाठी विचारांचे टॉनिक देणारे महापुरुष, युगप्रवर्तक संपादक म्हणून त्यांच्याकडे पाहावे लागते. प्रज्ञा आणि प्रतिभा यांचा अद्भूत संगम बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वात झाल्यामुळे त्यांचे लेखन विलक्षण प्रेरणादायी, विचारप्रवण आणि परिवर्तनाची नांदी ठरले. विचार जेव्हा जनसमुदायांच्या मनाची पकड घेतात, तेंव्हा ते एक खरोखरीची सामाजिक शक्ती बनतात, याची प्रचिती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रीय लेखनातून येते. त्यांनी अज्ञाताचा वेध घेत ज्ञानाचा परीघ विस्तारण्याचे काम केले. बाबासाहेबांच्या पत्रकारितेचे भावविश्व राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक पैलूंपुरतेच मर्यादित होत नाही. या गोष्टींचा त्यात समावेश आहेच; परंतु त्यापलीकडे त्यांच्या पत्रकारितेला व्यापक सांस्कृतिक मूल्य आहे. म्हणून हा सामाजिक न्यायमूल्यांची प्रखर जाणीव जागृती करणारा ठरला आहे. ●●●

***(लेखक लातूर येथील विभागीय माहिती कार्यालयात माहिती उपसंचालक आहेत.)***

पाक्षिक
स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा :
कार्यालय : ११ तळमजला, बी ब्लॉक, लक्ष्मी निवास,
जे.के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदीरा समोर,
माहीम (वेस्ट), मुंबई- ४०००१६

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ६०० | ५०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३०० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १५० | १५० | |

(वार्षिक विशेषांक - ६) / (६ महिने-३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. -------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ---------------------------------- जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ------------------------------------------------------ पत्ता : ----------------------------------

---------------------------------------------- शहर : ----------------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : ---------------- फोन नं. (घर) : --------------------------

मो. नं. : ------------------------ इ-मेल : ------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६३ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

www लॉग ऑन करा www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

# कुछ नहीं सोचने और कुछ नहीं बोलने पर आदमी मर जाता है



डॉ. सूर्यनारायण रणसुभे

**माणूस बऱ्याचदा काहीच बोलत नसतो. पण तो विचारही करीत नसतो. हे मानवी स्वभावाविरूद्ध आहे. मानसशास्त्रज्ञांच्या मते, विचारशून्यता शक्यच नसते. जीवनाची केवळ चारच क्षेत्रे आहेत जेथे विचारशून्यतेची अवस्था काही मिनिटांसाठी येत असते. ध्यान, धारणा, संभोग व शौच. एरवी सुशिक्षित असो की अशिक्षित त्याचा मेंदू विचारशीलच असतो. एका प्रसिद्ध तत्त्ववेत्त्याच्या मते, मी विचार करतो म्हणून माझे अस्तित्व आहे. अर्थात, झोपेच्या आठ तासांत माणूस विचारशून्य असतो काय? तर झोप ही अचेतन मनाची अवस्था आहे.**

उदय प्रकाश हे हिंदीतील प्रथितयश कलाकर. मुक्तिबोधांनी ज्याप्रमाणे त्यांच्या काळ्या वास्तवाचे चित्रण करण्यासाठी फँटसीचा वापर आपल्या दीर्घ कवितेत केला, त्याचप्रमाणे उदय प्रकाशांनी त्यांच्या दीर्घ रचनेतून आजचे वास्तव मांडण्यासाठी फँटसीचा वापर केला. त्यांच्या दीर्घकथेस तर साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. साहित्य अकादमीच्या इतिहासात दीर्घ लघुकथेस पुरस्कार दिला जाण्याचा हा पहिलाच प्रसंग. त्यांच्या काही उत्कृष्ट अशा दीर्घ कथांचा मराठी अनुवाद बहुतेक जयप्रकाश सावंत यांनी केल्याचे आठवते. अशा या उदय प्रकाशांची केवळ चार ओळींचीच एक ही कविता आहे –

*''आदमी मरने के बाद कुछ नहीं बोलता*
*आदमी मरने के बाद कुछ नहीं सोचता*
*कुछ नहीं सोचने और कुछ नही बोलने पर*
*आदमी मर जाता है''*

माणूस बऱ्याचदा काहीच बोलत नसतो. पण तो विचारही करीत नसतो. हे मानवी स्वभावाविरूद्ध आहे. मानसशास्त्रज्ञांच्या मते, विचारशून्यता शक्यच नसते. जीवनाची केवळ चारच क्षेत्रे आहेत जेथे विचारशून्यतेची अवस्था काही मिनिटांसाठी येत असते. ध्यान, धारणा, संभोग व शौच. एरवी सुशिक्षित असो की अशिक्षित त्याचा मेंदू विचारशीलच असतो. एका प्रसिद्ध तत्त्ववेत्त्याच्या मते, मी विचार करतो म्हणून माझे अस्तित्व आहे. अर्थात, झोपेच्या आठ तासांत माणूस विचाशून्य असतो काय? तर झोप ही अचेतन मनाची अवस्था आहे. त्यात अचेतन मनात तुंबून असलेल्या गोष्टी बाहेर येतात. एका अर्थाने हीदेखील विचारांचीच एक सूक्ष्म अवस्था.

मग उदय प्रकाशांना वरील ओळीतून काय सुचवावयाचे आहे? विचार करण्यासाठी आणि विचार व्यक्त करण्यासाठी म्हणून विशेष अशा वातावरणाची, व्यवस्थेची गरज असते. त्याशिवाय मी कोणत्या विषयावर विचार करावा व मी काय बोलावे हा माझा मूलभूत अधिकार आहे. ती एक नैसर्गिक अवस्था आहे. पण अवतीभोवतीचे वातावरण निर्भयतेचे नसेल, मी कोणत्या विषयावर विचार करू नये यासंबंधी जर विशेष अशा भयभीत करणाऱ्या वातावरणाची निर्मिती करण्यात आलेली असेल, तर मग मी माझ्या प्रिय विषयावर विचारच करू शकत नाही. उलट विवेकवादी मंडळींच्या विचार व अभिव्यक्तीवर बंधने लादण्यात येत असतील तर मग मी माझ्या विचाराची दिशा बदलेन. शेवटी मला माझे अस्तित्व तर टिकवावयाचे असते आणि ज्यावेळी माझ्या विचार करण्याच्या स्वातंत्र्यावर, निर्भीडपणे बोलण्याच्या स्वातंत्र्यावर अप्रत्यक्षपणे बंधने लादली जातात, मी काय बोलावे, काय खावे, कोणती वेशभूषा करावी हेच जर कोणी तिसरा ठरवत असेल आणि त्याप्रमाणे न केल्यास मला संपवण्याची धमकी दिली जात असेल, तर त्याचवेळी एका अर्थाने मी मेलेलाच असतो. तमिळ लेखक मुरूगन यांनी जे वास्तव लिहिले, त्यानंतर तिथे ज्या प्रतिक्रिया उमटल्या त्यातून त्यांनी हे जाहिर केले, की आता माझ्यातील लेखक मरून गेलेला आहे. उदय प्रकाशजींना इथे तर सुचवावयाचे आहे, की आम्हाला जर विवेकबुद्धीरूप जे पटलेले आहे त्यावर विचार करण्याची, न बोलण्याची सक्ती केली जात असेल तर आम्ही त्या अर्थाने मृतच असतो आणि या सक्तीला झुगारून जर तुम्ही विचार करू लागलात आणि त्यावरच बोलू-लिहू लागलात तर मग आम्ही तुमचा दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी किंवा गौरी लंकेश करून टाकणार. मागील काही वर्षांपासून अभिव्यक्तीच्या सर्वच क्षेत्रांत खरे-खरे लिहिता येत नाही, तर लिहा, बोला,



**हिंदीतील प्रथितयश कलाकार उदय प्रकाश : मी कोणत्या विषयावर विचार करावा व मी काय बोलावे हा माझा मूलभूत अधिकार आहे. ती एक नैसर्गिक अवस्था आहे.**

विचार करा पण ते 'बरे' असायला हवे, 'खरे' नको.

१८ नोव्हेंबर रोजी भारताच्या सरन्यायाधीशपदी विराजमान झालेले शरद बोबडे अलीकडे दिलेल्या एका मुलाखतीत म्हणाले, ''देशात आज अभिव्यक्ती स्वातंत्र्याची दोन टोके दिसत आहेत. अनेकजण समाजमाध्यमांतून जाहीर सभांपर्यंत काहीही आणि मनमानी पद्धतीने व्यक्त होत आहेत. तर अनेकांना आपली मते मांडण्याची किंमत चुकवावी लागत आहे आणि त्यांच्या स्वातंत्र्याचा संकोच होत आहे.'' (लोकसत्ता. दि. ५ नोव्हेंबर २०१९) तर याच अंकात प्रसाद माधव कुलकर्णी यांचा 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि खाजगीपणा' या मथळ्याखाली एक लेख प्रकाशित झालेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १९ अंतर्गत येणारे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आज संकुचित होताना दिसत आहे. याच अनुच्छेद १९ (१) मध्ये नमूद करण्यात आलेले आहे, की 'भाषण करणे, विचार व्यक्त करणे आणि कलात्मक अभिव्यक्तीचे (शिल्प, मूर्ती, चित्र साहित्याचे सर्व प्रकार, चित्रपट, नाटके, संगीत आदी)' स्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य या मूलभूत अधिकारानूसार अभिव्यक्ती स्वातंत्र्य घटनादत्त आहेच; परंतु आपले विचार, संवेदना आणि भावना व्यक्त करणारे हे स्वातंत्र्य नैसर्गिकही आहे. या नैसर्गिक व घटनात्मक स्वातंत्र्यावर तथाकथित संस्कृती रक्षकांनी पूर्वीपासूनच हल्ले चढवलेले आहेत. जगप्रसिद्ध चित्रकार मकबूल फिदा हुसैन यांना तर यामुळेच देश सोडून जावा लागला. आता तर सत्तेवर त्यांचेच नियंत्रण आहे. या देशात भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक वैविध्य आहे. वेशभूषा, केशभूषा व खाद्य पदार्थांतदेखील वैविध्य आहे. ही संपूर्ण वैविध्यता संपवून सर्वांनी एकाच पद्धतीने विचार करावा व या विचाराच्या केंद्रस्थानी विशिष्ट धर्म असावा असा आग्रह धरणे म्हणजे वैचारिक वैविध्य नाकारणेच झाले. वैचारिक विविधतेची, परस्परविरोधी तत्त्वज्ञानाची फार जुनी परंपरा या देशाची आहे. त्यामुळेच येथे नास्तिक चार्वाकापासून ते सनातनी व कट्टर विचारांची मंडळीदेखील परस्परांशी स्नेहाचे संबंध ठेऊन होती. पण अलीकडे ही परंपरा विसरून सर्व पुरोगामी विचारांना मूठमाती देण्याचा प्रकार सुरू झालेला आहे. तुम्ही विचार करा, बोला पण ते खरे आहे, जे वास्तव आहे, जे या देशाच्या भविष्यास मारक आहे, त्याबद्दल मात्र बोलायचे नाही. विचार करणाऱ्यांचा असा कोंडमारा म्हणजे एका अर्थाने त्याचे वैचारिक मरणच असते.

१०-१५ वर्षांपूर्वी या देशातील सामान्य माणसे, सुशिक्षित-अशिक्षित, विवेकवादी, बुद्धिवादी हे मोकळेपणाने बोलत. मागील कित्येक वर्षांपासून मी रिक्षेवाला, भाजी विकणारे, कामावरचे मजूर, स्त्रिया, शिक्षक, प्राध्यापक यांच्याशी सामाजिक, आर्थिक प्रश्नावर बोलायचो. विशेषतः निवडणुकीच्या काळात तर या मंडळींशी माझे सतत संवाद चालायचे. पण अलीकडे ही मंडळी कोणत्याही विषयावर मोकळेपणाने बोलत नसल्याचे माझ्या लक्षात आलेले आहे. आजूबाजूला कोणी आहे का हे ते आधी पाहत असतात. हे दडपण त्यांच्यावर कशामुळे आलेले असावे? निवडणुकीच्या काळात दूरदर्शनवर ज्या सामान्य माणसाला बोलते करण्याचा प्रयत्न केला जातो, तो क्वचितच खरे बोलतो, मनातून बोलतो असे वाटत नाही. तर खरे बोलण्याऐवजी तो त्यांना जे हवे तसे बोलतो हे अलीकडे झालेल्या तथाकथित एक्झिट पोलवरून दिसून आलेले आहे. समजा तो खरे जरी बोलला तरी एका दडपणातून, नाईलाजाने किंवा पर्याय नाही म्हणून तो मतदान करीत असतो. माणसांचे जीवंतपण हे त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीवर आहे. जे मनात आहे ते बोलण्याचे स्वातंत्र्य यावरच अवलंबून असते. 'आय थिंक सो आय एम' मी विचार करतो म्हणून मी आहे. तत्त्वज्ञानाने माणसाच्या अस्तित्वाची व जीवंतपणाची व्याख्याच या पाच शब्दांतून केलेली आहे. मी विचार करतो या सूत्राचा निश्चितार्थ एवढाच मर्यादित नाही. तर मनाजोगता विचार मी करू शकतो, माझ्या विचार करण्याच्या प्रक्रियेवर कसलेही दडपण नाही, विशिष्ट दिशेनेच विचार करण्याचे बंधन माझ्यावर नाही आणि जो मी विचार करतो तो मी मोकळेपणाने व्यक्त करू शकतो, हाही आशय त्यात आहे. 'आय कॅन एक्सप्रेस सो आय एम' मी बोलू शकतो, मी अभिव्यक्त होऊ शकतो म्हणून मी आहे. हाही आशय यामागे आहे. पण ज्यावेळी माझ्या विवेकाप्रमाणे मी विचार करू लागतो, बोलू लागतो त्यावेळी जर माझ्यावर बंधने लादली जात असतील, त्यामुळे माझे स्वातंत्र्य हिरावून घेतले जात असेल तर मी लौकिकदृष्ट्या जीवंत असलो, तरी वेगळ्या अर्थाने माझ्यातील स्वत्त्व मेलेलच असते आणि त्यामुळेच उदय प्रकाशजी हे जे म्हणतात, की 'कुछ नहीं सोचने और कुछ नहीं बोलने पर आदमी मर जाता है' हे माझ्या विवेकास पटते.

●●●

**(लेखक हिंदी साहित्यिक आहेत.)**

# दिल्लीचा नायक : अरविंद केजरीवाल



प्रकाश खंडेलोटे



अरविंद केजरीवाल सलग तिसऱ्यांदा दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले आहेत. भारतीय तंत्रज्ञान संस्थेतून शिक्षण घेतलेला राजकारणी सलग तिसऱ्यांदा मुख्यमंत्री बनण्याची देशातील ही पहिलीच घटना आहे. राजकीय ध्रुवीकरणाचे भाजपचे सर्व प्रयत्न धुळीस मिळवून केजरीवाल दिल्लीचे नायक बनले आहेत. विकासाचे राजकारण, उत्तम कारभार आणि दिल्लीकरांना उपलब्ध करून दिलेल्या सुविधा या आधारावर निवडणुकीत उतरलेल्या केजरीवाल टीमने भाजपसारख्या केंद्रात सत्तेत असलेल्या बलाढ्य शत्रूला पाणी पाजले. सुमारे २७५ खासदार, डझनभर आजी-माजी मुख्यमंत्री, जवळपास संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह ही भाजपची मोठी फळी मोडून काढून केजरीवालांनी तिसऱ्यांदा दिल्लीकरांची 'मतं' जिंकली. भाजपच्या द्वेष आणि सूडाच्या राजकारणाला लोकविकासाचे राजकारण भारी पडू शकते, हे केजरीवालांनी दाखवून दिले. वैयक्तिक आरोपप्रत्यारोप व कथित राष्ट्रवादापेक्षा विकास हाच एक घटक भाजपच्या विद्वेषी राजकारणावर मात करू शकतो हा संदेशही त्यांनी देशभरात पोहोचवला. भाजपच्या अवाढव्य यंत्रणेला अपयशी ठरवत मनिष सिसोदिया आणि आतिशी मार्लेना या सहकाऱ्यांच्या मदतीने केजरीवाल यांनी दिल्लीचा गढ तिसऱ्यांदा काबीज केला.

हरियाणाच्या भिवानी जिल्ह्यातील शिवनी गावी उच्च मध्यमवर्गीय सुशिक्षित कुटुंबात १६ ऑगस्ट १९६८ रोजी अरविंद केजरीवाल यांचा जन्म झाला. गोविंद राम केजरीवाल आणि गीता देवी यांच्या तीन मुलांपैकी अरविंद हे पहिलेच पुत्र. त्यांचे वडील विद्युत अभियंता होते. वडिलांच्या नोकरीच्या निमित्ताने अरविंद यांचे बालपण सोनिपत, गाझियाबाद आणि हिस्सार या उत्तर भारतातील शहरांमध्ये गेले. अरविंद यांचे शालेय शिक्षण हिस्सार आणि सोनिपत येथे झाले. देशात सर्वप्रथम १९५१ मध्ये स्थापन झालेल्या 'आयआयटी' खरगपूर येथून त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केली. त्यानंतर टाटा स्टीलच्या जमशेदपूर येथील प्रकल्पात ३ वर्षे नोकरी केली. मात्र सनदी अधिकारी बनण्याचा ध्यास लागलेल्या अरविंद केजरीवालांचे या नोकरीत मन रमले नाही. नागरी सेवा परीक्षेच्या तयारीसाठी म्हणून त्यांनी १९९२ मध्ये नोकरीचा राजीनामा दिला. प्रथम कलकत्त्यात (सध्याचा कोलकाता) जाऊन त्यांनी मदर तेरेसा यांची भेट घेतली आणि काही काळ रामकृष्ण मिशनमध्ये घालवला. नंतर नागरी सेवेची त्यांनी जोरदार तयारी सुरू केली. भारतीय महसूल सेवेची परीक्षा उत्तीर्ण होऊन १९९५ मध्ये ते आयकर विभागात सहाय्यक आयुक्तपदी रुजू झाले. नोव्हेंबर २००० मध्ये उच्चशिक्षणासाठी त्यांना २ वर्षांची पगारी रजा मंजूर करण्यात आली. पुन्हा कामावर रूजू झाल्यानंतर आपण किमान ३ वर्षे तरी नोकरीचा राजीनामा देणार नाही या अटीवर ही रजा मंजूर करण्यात आली होती आणि ही अट पाळण्यात आली नाही तर रजेच्या काळात घेतलेला पगार परत करणार असा करार झाला होता. ते नोव्हेंबर २००२ मध्ये पुन्हा रूजू झाले; परंतु वर्षभर त्यांना कुठलीही पोस्टिंग देण्यात आली नाही. काम नसले तरी त्यांचा पगार मात्र सुरू होता. १८ महिन्यांनी बिनपगारी रजेसाठी त्यांनी अर्ज केला. ही रजा संपवून आल्यानंतर फेब्रुवारी २००६ मध्ये त्यांनी नवी दिल्लीत आयकर विभागाच्या सहआयुक्त पदाचा राजीनामा दिला. त्यावर केजरीवालांनी ३ वर्षे काम न करून मूळ कराराचं उल्लंघन केल्याचा ठपका केंद्र सरकानं ठेवला. मात्र आपण कराराप्रमाणेच वागल्याचा दावा केजरीवालांनी केला. आपल्या भ्रष्टाचारविरोधी चळवळीतील सहभागामुळेच सरकार आपल्याला त्रास देण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप केजरीवालांनी केला होता. हा वाद काही वर्षे चालला. तथापि, मित्रांकडून कर्ज घेऊन त्यांनी ९ लाख २७ हजार ७८७ रुपये भरल्यानंतर हे प्रकरण मिटलं; परंतु आपण पैसे भरले याचा अर्थ आपल्याला गुन्हा मान्य आहे, असा होत नाही हे त्यांनी स्पष्ट केले.

निर्वाचित लोकप्रतिनिधींना अटी घालण्याचा अधिकार जनलोकपालांना असणार नाही, अशी चर्चा सुरू झाल्यानंतर, भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी जनलोकपाल कुचकामी ठरणार असल्याचे केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ताडले. त्यामुळे राजकारणात प्रवेश करून निवडणूक लढविण्याचा निर्णय केजरीवाल यांनी घेतला. नोव्हेंबर २०१२ मध्ये त्यांनी 'आम आदमी पक्ष' हा राजकीय पक्ष स्थापन केला. केजरीवाल

पक्षाचे राष्ट्रीय निमंत्रक बनले. भ्रष्टाचारविरोधी चळवळ आणि राजकारण यांचा संबंध नसल्यामुळे ही चळवळ चालवताना राजकारणात पडायचे नाही, अशी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भूमिका होती; परंतु केजरीवाल मात्र राजकारणात प्रवेश करून जनलोकपाल या संस्थेला भ्रष्टाचाराला अटकाव करण्याचे अधिकार मिळवून देण्याच्या भूमिकेत असल्यामुळे आम आदमी पक्ष स्थापनेवरून केजरीवाल आणि हजारे यांच्यात फूट पडली.

पक्ष स्थापनेनंतर दुसऱ्या वर्षी २०१३ मध्ये लागलेल्या दिल्ली विधानसभेच्या निवडणुका आपने लढल्या. तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपद भूषवत असलेल्या काँग्रेसच्या शीला दीक्षित यांना हरवून केजरीवाल निवडून आले. काँग्रेसच्या पाठिंब्याने ते मुख्यमंत्री बनले. ३४ व्या वर्षी मुख्यमंत्री बनलेल्या चौधरी ब्रह्मप्रकाश यांच्यानंतर केजरीवालांनी दुसरे तरूण मुख्यमंत्री म्हणून २८ डिसेंबर २०१३ रोजी शपथ घेतली. मात्र जनलोकपाल विधेयक दिल्ली विधानसभेत मांडण्यात अपयशी ठरल्यानंतर त्यांनी ४८ व्या दिवशी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. या निर्णयामागचं कारण स्पष्ट न करता राजीनामा दिला ही आपली चूक झाल्याची कबुली त्यांनी नंतर दिली. २०१५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाने ७० पैकी ६७ जागा जिंकून दणदणीत विजय मिळवला आणि केजरीवाल पुन्हा मुख्यमंत्री झाले. शाळा, वीज, दवाखाने या सामान्यांच्या गरजांना प्राधान्य देत केजरीवाल यांनी विकासाचं राजकारण केलं. त्यामुळे दिल्लीकरांनी तिसऱ्यांदा त्यांना आपला नायक म्हणून निवडलं.

**भ्रष्टाचारविरोधी चळवळीतून नेतृत्वाचा उदय :** अरविंद केजरीवाल आयकर विभागात नोकरीवर असतानाच मनिष सिसोदिया आणि इतरांच्या मदतीने त्यांनी परिवर्तन संस्था दिल्लीत सुंदरनगरात सुरू केली. परिवर्तनने सार्वजनिक वितरण व्यवस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग, सामाजिक कल्याणाच्या योजना, आयकर आणि विजेशी संबंधित नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचं निवारण केलं. ही नोंदणीकृत सेवाभावी संस्था नसल्यामुळे वैयक्तिक देणगीवरच चालते. २००५ मध्ये केजरीवाल आणि सिसोदिया यांनी कबीर ही नोंदणीकृत सेवाभावी संस्था स्थापन केली. परिवर्तनप्रमाणेच कबीर संस्थेनेही आरटीआयवर भर दिला.

आयकर विभागाच्या सार्वजनिक व्यवहारात पारदर्शकता आणावी यासाठी परिवर्तनने २००० साली जनहित याचिका दाखल केली होती. मुख्य आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर सत्याग्रहही केला होता. केजरीवाल आणि इतर कार्यकर्ते वीज विभागाच्या कार्यालयाबाहेर थांबून कामं करण्यासाठी कर्मचाऱ्यांना लाच देऊ नका, असं लोकांना सांगत होते. २००१ मध्ये दिल्ली सरकारने राज्य पातळीवरचा आरटीआय कायदा केला. या कायद्यान्वये नागरिकांना अत्यंत कमी शुल्कामध्ये सरकारी नोंदी पाहण्याची व्यवस्था आहे. लोकांनी सरकारी खात्यांमधील कामे कर्मचाऱ्यांना पैसे न देता करून घ्यावीत यासाठी परिवर्तन संस्थेने आरटीआयचा वापर केला. २००२ मध्ये या संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागातील ६८ प्रकल्पांविषयीचे अधिकृत अहवाल प्राप्त केले आणि ६४ प्रकल्पांमध्ये सात दशलक्ष रुपयांचा बेहिशोब उघडकीस आणण्यासाठी समुदायप्रणित ऑडीट केले. १४ डिसेंबर २००२ रोजी परिवर्तनने जनसुनवाईचे आयोजन केले होते. यामध्ये तक्रारी करणाऱ्या लोकांनी त्यांच्या भागात विकासकामे होत नसल्याबद्दल अधिकारी आणि नेत्यांना जबाबदार धरले होते. २००३ (आणि पुन्हा २००८) मध्ये परिवर्तनने सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील घोटाळा उघडकीस आणला होता. यामध्ये स्वस्त धान्य दुकानदारांनी अधिकाऱ्यांच्या मदतीने अनुदानित अन्नधान्याचा अपहार केला होता. पाणीपुरवठ्याच्या खाजगीकरणासाठीच्या प्रकल्पासंबंधात शासकीय संस्था आणि जागतिक बँक यांच्यामध्ये संवाद घडवून आणण्यासाठी परिवर्तन संस्थेने २००४ मध्ये आरटीआयचा वापर केला. या प्रकल्पावर मोठा खर्च केल्याबाबत केजरीवाल आणि अन्य कार्यकर्त्यांनी सवाल उपस्थित केला होता. या वाढीव खर्चामुळे पाणीपट्टीत दहापट वाढ होईल, असा युक्तिवादही त्यांनी केला होता. परिवर्तनच्या आंदोलनामुळे प्रकल्प रखडला. परिवर्तनने आणखी एक मोहीम राबविली, ज्यामुळे सवलतीत जागा मिळवून उभारलेल्या खाजगी शाळांमध्ये ७०० पेक्षा अधिक गरीब मुलांना विनाशुल्क प्रवेश मिळू शकला. केजरीवाल यांच्यासह समाजसेवक अण्णा हजारे, अरूणा रॉय आणि शेखर सिंग यांनी राष्ट्रीय पातळीवरील माहिती अधिकार कायदा सामाजिक हितासाठी राबविण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. केजरीवाल यांनी फेब्रुवारी २००६ मध्ये आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि त्याचवर्षी परिवर्तन संस्थेतील सहभागाबद्दल उदयोन्मुख नेतृत्त्वासाठी रेमन मॅगसेसे पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. आरटीआय चळवळ तळागाळापर्यंत पोहचवण्यात आणि भ्रष्टाचाराशी लढण्याकरिता दिल्लीतील गरीब नागरिकांना सशक्त करण्यात त्यांनी बजावलेल्या भूमिकेसाठी हा पुरस्कार होता.

२०१२ पर्यंत परिवर्तन संस्था निष्क्रियच होती. संस्थेने जिथं आपलं लक्ष केंद्रीत केलं होतं, त्या सुंदरनगरी भागात अनियमित पाणीपुरवठा, अविश्वासार्ह सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि सार्वजनिक बांधकाम विभागाची निकृष्ट कामे व्हायची. परिवर्तनचे यश मर्यादित होते आणि तिने घडवून आणलेले बदल दीर्घकाळ टिकू शकले नाहीत, असे केजरीवालांनी स्पष्ट केले.


**पब्लिक कॉज रिसर्च फाऊंडेशनची स्थापना :** केजरीवाल यांनी सिसोदिया व अभिनंदन शेखरी यांच्यासह डिसेंबर २००६ मध्ये पब्लिक कॉज रिसर्च फाऊंडेशन स्थापन केले. संस्थेला प्रारंभिक निधी म्हणून त्यांनी रेमन मॅगसेसे पुरस्काराची रक्कम देऊ केली. तीन संस्थापकांशिवाय प्रशांत भूषण आणि किरण बेदी हे फाऊंडेशनचे विश्वस्त होते. आयकर विभाग, दिल्ली महानगरपालिका, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि दिल्ली विद्युत मंडळासह अनेक शासकीय विभागातील भ्रष्टाचाराची प्रकरणे आरटीआयद्वारे केजरीवालांनी **उर्वरित पान ४४**

# नक्षलवाद्यांविरूद्ध लढणाऱ्या पोलिसाच्या संघर्षमय जीवनाची कथा : आयपीएस



किरण डोंगरदिवे

कादंबरी हा प्रकार मराठी साहित्यामध्ये फार पूर्वीपासून चालत आलेला आहे. मात्र सध्या आधुनिक गतिमान जीवनामुळे तसेच व्यासंगाचा अभाव असल्यामुळे नवीन कादंबरी थोड्या अभावानेच येत आहे. आली तरी अनेक वेळा ती कादंबरी एखाद्या जुन्या कथानकावर किंवा प्रसंगी चित्रपटावर आधारित असते. बऱ्याच वेळा तर कादंबरी वाचताना लेखकाला काय सांगायचे आहे तेच कळत नाही. त्यामुळे कादंबरी वाचकांना रुचत नाही अशा परिस्थितीमध्ये एखादी दर्जेदार आणि स्वतंत्र विषय आणि आशयाची कादंबरी मिळाली तर साहित्य समृद्धीची जाणीव नव्याने सजीव होते, असा अनुभव रमेश निनाजी सरकाटे यांच्या 'आयपीएस' कादंबरीमुळे वाचकाला आल्याशिवाय राहत नाही. कादंबरी लेखनामध्ये असलेली गती आणि प्रगती, प्रचंड आशयघनता, सुस्पष्ट आणि वास्तव कथावस्तू, आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या गर्दीमधून पात्रांची निवड तसेच डोळ्यांनी जे दिसते ते वास्तव कितीही भीषण असले तरी ते शब्दांकित करणे असे सर्व सुंदर जुळून आलेले यशस्वी समीकरण साधत स्वतः रेल्वे पोलीस दलात पोलीस अधीक्षक या उच्च पदावरून सेवानिवृत्त झालेल्या रमेश निनाजी सरकाटे यांच्या आयपीएस या कादंबरीचा जन्म झाला, असे ही कादंबरी वाचल्यावर जाणवते.




खरे म्हणजे, बुलढाणा जिल्ह्यात समृद्ध कादंबरी विश्वाची ओळख 'बारोमास' या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त सदानंद देशमुख यांच्या कादंबरीसोबतच 'निशाणी डावा अंगठा'कार रमेश इंगळे उत्रादकर यांच्यासारख्या कादंबरीकारामुळे झालेली आहे. त्यात आता 'हक्कसोड'सारख्या कादंबरीमुळे मिलिंद जाधव आणि 'आयपीएस' मुळे रमेश सरकाटे यांच्या नावाची आश्वासक भर पडली आहे. आयपीएस ही एक दीर्घ कादंबरी आहे. रमेश सरकाटे यांचा नक्षली चळवळ आणि आदिवासी जनजीवनाविषयीचा अभ्यास त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील जातवार जीवनव्यवस्था याबाबतचे निरीक्षण या कादंबरीमध्ये उमटले आहे. खरे म्हणजे, ही नक्षलवाद्यांविरुद्ध लढणाऱ्या पोलिसाच्या संघर्षमय जीवनाची कथा सांगणारी कादंबरी आहे. त्यात महाराष्ट्रातील समाजजीवनाचे चित्र ओघाने आले तरी प्रभावीपणे येते. खंडू या सामान्य गरीब कुटुंबातील तरुणाची पुढे येण्याची धडपड, त्यातून वेगवेगळ्या प्रसंगांचे चित्रण कादंबरी पुढे नेत राहते. कधी शांताबाई आणि कौती यांच्यातील संवाद आणि बेबी आणि खंडू यांच्या भेटीगाठींमधून भदाणे नावाचे शिक्षक आणि बेबी यांच्यातील संबंधांचे बिंग फुटते. तसे पाहता मानवी मनाचा, प्रेमाचा वय, जात, धर्म यांच्याशी संबंध नसतोच. मात्र तरीही शिक्षकाचे विद्यार्थिनींसोबत असलेले असे संबंध रमेश सरकाटे यांनी आपल्या कादंबरीत मांडून समाजाला, पालकांना, शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना खरे तर सावधानतेचा इशाराच दिला आहे. हेच भदाणे मास्तर खंडूला मटन आणण्यासाठी पाठवत असतात असा संदर्भही या कादंबरीत आहे. मात्र खंडूची शांतामाय आजारी पडल्यावर पाचशे रुपये झटपट काढून देणारे हेच शिक्षक असतात. एकंदरच परिस्थिती आणि वेळ माणसातील चांगला आणि वाईट माणूस दाखवत असते हेच खरे. शाळेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर भाषण देणारा खंडू मोठा झाल्यावर नाव काढणार असे सुचवणारे लेखक खरे म्हणजे परिवर्तनवादाची ओळ या ठिकाणी पेरतात यात शंका नाही. आज-काल काखेत घटनेचं पुस्तक घेऊन बोटाने इशारा करणारे बाबासाहेब दिसतात. खंडूला वाटते, की तो इशारा आपल्याले त नायी? असं जर असेल त लेका खंड्या मेहनत करावीच लागिन. मेहनतीने माणूस मरत नाही उलट मोठा होतो. खंडूचा आदर्श आणि प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत यात शंकाच नाही. मात्र डॉ. बाबासाहेब बोटाने आपल्याला इशारा करतात असे जेव्हा खंडूसारख्या प्रत्येक तरुणाला वाटेल, तेव्हा खऱ्या अर्थाने समाज प्रगतीपथावर गेला असे म्हणता येईल. स्कॉलरशिपच्या परीक्षेत जिल्ह्यातून पहिला झालेला खंडू खुर्चीवर बसू नये म्हणून समोर फक्त दोनच खुर्च्या ठेवणे, भदाणे मास्तरच्या मनात बेबीसोबत शरीर संबंध ठेवण्याची इच्छा दिसणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या मिरवणुकीवर दगडफेक होणे, त्यात पिरा आबा खतम होणे, शाळेमध्ये शांताबाईला खुर्चीवर असलेले पाहून पांडू पाटलाला अस्वस्थ वाटणे अशा अनेक प्रसंगांमधून ग्रामीण भागातील जातीय विषमतेवर रमेश सरकाटे यांनी भाष्य केलेले आहे. मात्र त्याचवेळी खंडू आणि

पांडू पाटील यांसारख्या समजदार व्यक्ती किंवा समजपूर्ण विचार करणारी विचारधारा असती तर जातीपातीचे भेद विसरून एक आपुलकीचे नाते तयार होते हे दाखवण्यात रमेश सरकाटे यशस्वी झाले आहेत. या कादंबरीतील एक विलोभनीय टप्पा खंडू आणि सुमी यांच्यातील भावनिक ऋणानुबंध हा होय. सैराट चित्रपटातील नायक-नायिकेप्रमाणे शालेय जीवनामध्ये हुशार विद्यार्थी आणि त्याची वर्गमैत्रीण यांच्यातील फुलत जाणारा प्रेमभाव यशस्वीपणे मांडण्यात कादंबरीकार यशस्वी ठरले आहेतच. मात्र खंडू आणि सुमी या पात्रांचे एकमेकांत गुंतून जाणे आणि त्याचवेळी आपल्या ध्येयाने पुढे पुढे वाटचाल करणारा नायक आपल्याला भेटतो. स्त्री-पुरुषाचे अनैतिक संबंध, शासनाने शिक्षणाची जबाबदारी घेऊन लाभार्थ्यांपर्यंत फायदा न पोहोचणे, संपूर्ण स्वच्छता अभियानाअंतर्गत हागणदारी मुक्त गाव अशा ग्रामीण जीवनामध्ये दिसून येणाऱ्या अनेक घटनांचा मागोवासुद्धा या कथानकामध्ये उपकथानकाप्रमाणे प्रभाव पाडतो. खंडूसारख्या सुशिक्षित तरुणाच्या विचारसरणीप्रमाणे मार्गक्रमण केल्यास पांडू पाटलाला मिळणारा शासकीय दलितमित्र पुरस्कार आणि त्यांच्या खेड्याला मिळणारा आदर्श गावाचा पुरस्कार यातून नवीन आणि शिक्षित वर्गाला नेतृत्वाच्या संधी उपलब्ध झाल्यास संपूर्ण गावाचाच नव्हे तर देशाचासुद्धा कायापालट होऊ शकतो, याची जाणीवच रमेश सरकाटे यांनी आपल्या कादंबरीत करून दिली आहे. विश्वास नांगरे पाटील यांचे प्रेरक भाषण ऐकल्यामुळे आपण आयएएस किंवा आयपीएस झालो असे सांगणारे अनेक जण भेटतात. तोच धागा धरून संजय गजभिये नावाच्या अधिकाऱ्याचे भाषण ऐकून आपणसुद्धा आयएएस होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, असा तरुण पिढीचा प्रतिनिधी म्हणून खंडू विचार करतो. तो प्रसंग आपल्यासोबत महाविद्यालयीन जीवनामध्ये घडला असावा इतक्या सहजतेने वाचकांच्या मनाचा ठाव घेतो. त्यातही पहिल्या परीक्षेत तहसीलदार झाल्यावर पुन्हा यूपीएससीसाठी प्रयत्न करावा, की आलेली नोकरी स्वीकारून आपली गरिबी दूर करावी, असे अनेक गरिबांना पडणारे प्रश्नसुद्धा या कादंबरीतून उपस्थित होताना आपल्याला जाणवतात. किशोरचा नक्षलवादी चळवळीच्या मोठ्या गुन्हेगारांसोबत अगदी कसलाही संबंध नसताना आलेला संबंध हा या कादंबरीला किंवा खंडूच्या जीवनाला कलाटणी देणारा प्रसंग आहे. त्यानंतर नक्षलवादी जीवन किती मानवताविरोधी आहे तसेच खंडूसारखे लोक नक्षलवाद्यांनी अपहरण करून आणलेल्या लक्ष्मीसारख्या मुलीला बहीण मानून बंधनमुक्त करू शकतात आणि आयपीएस अधिकारी झाल्यानंतर नक्षलवादी चळवळीचा बीमोड करण्यासाठी नक्षलवाद्यांशी सशस्त्र लढा करण्यासाठीसुद्धा उभे राहतात. नक्षलवाद्यांमध्येसुद्धा जातीयतेच्या आणि विषमतेच्या भिंती आहेत हे सत्य मला तरी पहिल्यांदा आयपीएस या कादंबरीमुळे कळले असे कबूल करावेसे वाटते. आयपीएस अधिकारी झाल्यावर दीपालीसारख्या तरुणीला पुढे करून अधिकारी पदावरील तरुणाला फशी पाडण्याचे कुटील कारस्थान व्यवस्थेकडून केले जाते. मात्र जागृत तरुण आपली ध्येयनिश्चिती आणि सुमीवरील निर्व्याज प्रेमापोटी कोणत्याही बंधनाला आणि आमिषाला बळी न पडता मार्गक्रमण करतो. खरे तर आंबेडकरी चळवळीत अनेक तरुणांनी या गोष्टीचा विचार केला पाहिजे, असे या ठिकाणी निक्षून सांगावेसे वाटते. जातिभेद तसेच अंधश्रद्धेविरुद्धसुद्धा या कादंबरीमध्ये जाणीव जागृती करून दिली आहे. समाजातील अनेक ज्वलंत प्रश्न, पोलीस खात्यातील अंतर्गत राजकारण इत्यादी अनेक गोष्टी या कादंबरीतून रमेश सरकाटे यांनी अधोरेखित केल्या आहेत. कादंबरीचे कथानक शेवटपर्यंत कोठेही भरकटत नाही. आशयाच्या मागणीनुसार पात्रांचे संवाद आणि परिसरानुसार त्या संवादातील बोलीभाषेचा वापर लेखकाने केलेला दिसून येतो. आयपीएस अधिकारी होण्यासाठी काय काय करावे लागते? आयपीएस अधिकारी झाल्यावर अधिकारी म्हणून कसे असले पाहिजे? कोणत्या पद्धतीने काम केले पाहिजे? याचा एक सुंदर आविष्कारच खरे तर लेखकाने सादर केला आहे. सर्वसामान्यपणे आपसातील हेवेदावे विसरून पांडू पाटील आणि परबत बुवा किंवा खंडूच्या सांगण्यावर किशोरसारख्या गुन्हेगाराचे आत्मसमर्पण, सुमी आणि खंडू यांचे जातीपातीच्या पलीकडे जाऊन एकमेकांवर प्रेम करणे आणि शेवटी त्यांचे लग्न होऊन स्वप्नपूर्ती इत्यादी अनेक बाबी खरे तर स्वप्नरंजनाप्रमाणे अतिशय वेगाने समोर येत राहतात आणि हो, हे असेच पाहिजे होते असा स्वर वाचकांच्या अंतर्मनातून येत राहतो हे या कादंबरीचे खरे यश आहे. मुंबईत एटीएसमध्ये बदली झाल्याच्या आणि सुमीसोबत लग्न होण्याच्या वळणावर नक्षली किशोर याने अपहरण केलेल्या लक्ष्मीचे किशोरसोबत लग्न अशा सर्व सुखात्मक शेवटावर जवळपास साडेचारशे पानाची ही कादंबरी संपते तेव्हा पुढे काय होईल? पुढील कथानक काय असेल? या कल्पनेतून वाचकांची उत्सुकता कायम राहते. खंडूसारखे पात्र, सुमी, लक्ष्मी, पांडू पाटील, परबत बुवा, त्याची बायको, खंडू पाटलाची मुलं, गंगू, सुभाष, गंगूचे सासू-सासरे, कौती, बेबी, भिका, भदाणे सर, मोरे सर, संजय गजभिये अशी अनेक पात्रे ग्रामीण भागामध्ये तुम्ही आम्ही सातत्याने पाहत आलो आहोत. तीच पात्रे समाविष्ट करून आपल्या कादंबरीला जिवंत करून रमेश सरकाटे यांनी कादंबरीला संजीवनी प्राप्त करून दिली आहे हे निश्चित. मात्र अथपासून तिथपर्यंत सर्व गोष्टी सहजतेने पूर्णत्वास नेणारा खंडू एखाद्या चित्रपटातील नायकाप्रमाणे रोल मॉडेल असला तरी वास्तवात मात्र असे पात्र दिसत नाही याची खंत वाटते. तो समाजव्यवस्थेचा, तरुणाच्या मानसिकतेचा दोष आहे असे म्हणावे वाटते.

अमरावतीच्या पायगुण प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या कादंबरीचे मुखपृष्ठ हेडकॉन्स्टेबल शंकर येडले या भुसावळ येथील पोलिस विभागातील कलाकाराने काढले हासुद्धा एक दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल. ●●●

**(लेखक मेहकर (जि. बुलढाणा) येथे सहशिक्षक आहेत)**

# लाल किल्ल्यावरील कारभाऱ्यांना दिल्लीचा दरवाजा झाला बंद

दिल्लीतील लाल किल्ल्यारून शंभर टक्के भाजप विरोधकांचे उच्चाटन वगैरे घोषणा करणाऱ्या भाजपला दिल्ली राज्यानेही रोखले. सत्तर पावलांपैकी आठ पावलांवरच रोखून धरले. देश भगवा करण्याचा प्रयत्न अन्य काही राज्यांबरोबरच दिल्लीत 'आप'च्या केजरीवाल यांनीही हाणून पाडला. लाल किल्ला म्हणजे दिल्लीचे नाक. या नाकावरच 'आप'ने जणू काही दणका दिला. सतत तिसऱ्यांदा दिल्ली आपल्या ताब्यात ठेवली. काँग्रेस भोपळाही फोडू शकली नाही आणि साप नागनाथ राजकारण खेळणाऱ्या बसपाच्या उमेदवारांना एक टक्काही मते पडू शकली नाहीत. 'आप' एक शक्ती म्हणून उदयास येतो आहे. कुणाच्याही मदतीशिवाय तो हे सारे कमावतो आहे. ७० पैकी ६८ जागा जिंकणारा आणि तेही राजधानीत या साऱ्या जागा जिंकून भाजपची धोबीपछाड करणारा 'आप' आता राष्ट्रीय पातळीवरही झळाळतो आहे.

लोकसभा निवडणुकीत प्रचंड यश मिळवणारा, दिल्लीतही प्रचंड यश मिळवणारा भाजप प्रचंड साधनसामग्री आणि फौजफाटा घेऊन आपविरुद्ध उभा ठाकला होता. या फौजफाट्यात तब्बल तीनशे खासदार, ११ मुख्यमंत्री, अनेक माजी मुख्यमंत्री, स्वत: नरेंद्र मोदी आणि अमित शाहही होते. दिल्लीसारख्या छोट्या राज्यात अशी व्यूहनीती भाजपनं आखली याचं कारणंही भाजपाला पराभव दिसत असावा. नागरिकत्व दुरुस्ती विधेयकावरुन शाहीनबागमध्ये आंदोलन सुरु आहे. अन्य काही विषयांवरुन धुसफूस चालू आहे. या सर्व परिस्थितीत भाजपने विकासाऐवजी पुन्हा एकदा धर्माचे, मंदिराचे आणि सीमेवरच्या चकमकीचे कार्ड वापरले. त्यासाठी भाजपचे सर्व वाचाळवीर आघाडीवर होते. उचलली जीभ लावली टाळूला याप्रमाणे ते काहीही बोलत होते. सीमेवरच्या मुस्लिम राष्ट्रांतील तरुण भारतातील घरात घुसून बलात्कार करतील अशी भाकितं करत होते. नागरिकत्व दुरुस्ती विधेयकाला विरोध करणाऱ्यांना देश के दुश्मन ठरवत होते. आपचे प्रमुख आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मुस्लिम आणि पाकिस्तानचा मित्र ठरवत होते. जेवढी काही गरळ ओकायची तेवढी ओकली जात होती. सत्तर आमदारांचे एक अतिशय चिमुकले राज्य जिंकण्यासाठी भाजपचा एवढा कसा काय आटापिटा याचे जनतेला कोडे वाटत होते. एकेका राष्ट्रीय पुढाऱ्याने चार-पाच लोकांच्या जाहीर सभा घेतल्या. घराघरात जाऊन राष्ट्रीय नेत्यांनी प्रचार केला. निवडणूक नव्हे तर जणू काही धर्मयुद्ध आहे असे समजून भाजप प्रयत्न करत होता. त्यासाठी दोन-तीन वर्षांपासून रणनीती आखण्यात आली होती. आप चिडेल, उफाळून बोलेल असे विषय मांडले जात होते. केजरीवाल यांनी भाजपच्या या सर्व विधानांबाबत डोक्यावर आणि जिभेवर बर्फाचा गोळा ठेवला. त्यांच्या प्रचाराकडे दुर्लक्ष केले आणि आपण तिसऱ्यांदा निवडून आल्यावर काय करणार याची विषयपत्रिका मांडली. दिल्लीकरांना भेडसावणाऱ्या वीज, पाणी, शिक्षण, वाहतूक, आरोग्य आणि संपर्क या विषयाला हात घातला. भाजप भगव्याच्या नावानं तर आप विकासाच्या नावानं मते मागत होता. राम मंदिराचा प्रश्न सोडवण्यात यशस्वी झालो. नागरिकत्व विधेयक दुरुस्ती करण्यात यशस्वी झालो. मंदिरासाठी ट्रस्ट स्थापन करण्यात यशस्वी झालो वगैरे गोष्टी सांगत भाजप नेहमीप्रमाणे समाज मागे मागे नेत होता. पण दिल्लीकरांना तर पुढे जायचे होते. आपने भाजपच्या सापळ्यापासून स्वत:ला दूर ठेवले. जे काँग्रेसला जमले नाही ते आपनं करुन दाखवले. आपण हिंदूच आहोत हे सिद्ध करण्यासाठी केजरीवाल जाणीवपूर्वक तीर्थयात्रा करायला निघाले नाहीत. कुठं अभिषेक घातला नाही. भाजपच्या सर्व आरोपांना इतकं दुर्लक्ष केलं, की आता कोणता बाण वापरावा आणि कोणत्या रामाच्या भात्यातून तो घ्यावा असा संभ्रम भाजपचा झाला असावा. निकाल लागला तेव्हा भाजपचे तोंड काळं झाले होते. लोकसभेत पाशवी बहुमत मिळवणारा हा पक्ष दिल्लीत फक्त आठ जागा गाठू शकला. वाचाळवीरांमुळे हा पराभव झाला, असे शाह सांगत असले तरी हे वीर कोणी तयार केले आणि ते कोणाचे अनुकरण करतात, हा प्रश्न शिल्लक राहतोच. आता मोदींऐवजी त्यांनी एखाद्या गुहेत जाऊन ध्यान करावं म्हणजे उत्तर सापडेल.

## मी अशी शपथ घेते, की प्रेम आणि प्रेमविवाह करणार नाही

"मी अशी शपथ घेते, की माझ्या आई-वडिलांवर माझा पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे समोर घडणाऱ्या घटना लक्षात घेता मी प्रेम आणि प्रेमविवाह करणार नाही. मी हुंडा घेणाऱ्या मुलाशी लग्न करणार नाही. समजा सामाजिक स्थितीमुळे आज माझे लग्न माझ्या कुटुंबाने हुंडा देऊन केले तर भावी पिढीतील एक माता म्हणून मी माझ्या होणाऱ्या सुनेकडून हुंडा घेणार नाही. मुलीसाठी हुंडा देणार नाही. एक सामाजिक कर्तव्य म्हणून ही शपथ घेते."

अमरावती जिल्ह्यातील चांदूर येथील महिला महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलींनी ही शपथ घेतली आणि तीही प्रेमदिनाच्या दिवशी म्हणजेच व्हॅलेन्टाईन दिनी १४ फेब्रुवारीला. या शपथेवरुन स्वाभाविकच उलटसुलट चर्चा सुरु झाली. ज्यांना प्रेम कळते ते आणि जे प्रेमाच्या गावात कधी पाय ठेवते झाले नाहीत ते अशी ती चर्चा होती. मुळात प्रेमासाठी एखादा दिवसच असतो की जन्माला येणारा प्रत्येक दिवस प्रेमाचाच असतो येथूनच चर्चा सुरु करायला हवी. प्रेम म्हणजे परस्परांना जोडण्याचा,

आपल्या मनातील संवेदना जाग्या ठेऊन परस्परांशी बांधून घेण्याचा नैसर्गिक प्रयत्न असतो. त्यासाठी कोणतं कॅलेंडर नसतं की कॅलेंडरमध्ये कोणता एक दिवस नसतो. आपण प्रेमाचा अर्थ अतिशय संकुचित अर्थानं घेतो. तिचं आणि त्याचं प्रेम एवढाच तो अर्थ असतो. जग प्रेमावर उभं असतं, प्रेमाचं खतपाणी घेऊन ते फुलतं, फळतं आणि विविध नात्यांमध्ये पसरतं. माणूस कोणावरही प्रेम करु शकतो. सृष्टीतील चराचरावरती प्रेम करतो हे एकदा मान्य केलं, की मग शारीरिक प्रेम हा मुख्य केंद्रबिंदू रहात नाही. महापुरुषांनी केलेली प्रेमाची व्याख्याही आपण कधी गांभीर्यानं पहात नाही. प्रेमाला वय नसतं, जात, धर्म, पंथ, प्रदेश, गाव नसतं. प्रेम निरपेक्ष असतं. परस्परांसाठी करावयाच्या त्यागावर ते उभं असतं. कबीर म्हणतो, की गरजच नसते. दोघे समोरासमोर उभे राहतात, तेव्हा अटी-शर्ती यांची सुरुवात होते. प्रेमाचा रस्ता इतका अरुंद, संकुचित असतो, की तेथे दोघांना राहताच येत नाही. मीरा म्हणते, की प्रेममय होऊन जाणे म्हणजेच प्रेम असते. प्रेममय झाल्यावर परस्परांना भेटण्याची गरज उरत नाही. मै खुदही किशन हो चुकी हुं तो किसी और किशन से क्यो मिलू हा तिचा रोकडा सवाल. प्रेम जात-पात, वर्ग, प्रदेश आणि भेदांवर मात करते. प्रेमविवाह, आंतरजातीय विवाह वाढल्यानं जाती कोलमडायला लागतात. हे ज्यांना नको असतं ते मुलांचा बालविवाह करतात. जाती टिकवून ठेवतात. प्रेम, जाती वगैरे गोष्टी कळण्यापूर्वीच बालविवाह होतो. म्हणजे जाती टिकवून ठेवण्यासाठी बालविवाह. आई-वडील जन्मदाते आणि मुलांचे हितकर्ते जरी असले तरी त्यांची मुले केवळ त्यांच्या रक्ताचा धागा नसतात तर निसर्गानं निर्माण केलेली स्वतंत्र व्यक्तिमत्वेही असतात. त्यातूनच लग्न आई-वडिलांसाठी करायचं की स्वत:ची इच्छा प्रमाण मानून करायचं हाही प्रश्न उपस्थित होतोच.

प्रेम करणं हा काही कायदा नसतो. रितीरिवाज नसतात. तो काळजाचा सहज आविष्कार असतो. प्रेम न करण्याची प्रतिज्ञा कधी घेता येत नसते. कारण काळजातील स्पंदनं कायदा, प्रतिज्ञा आणि व्यवस्थेच्या पलिकडे पोहोचलेली असतात. आता हे सातव्या वेतन आयोगाचे लाभार्थी झालेल्या मास्तरांना कसं काय कळणार? विद्यार्थिनीच्या रक्षणासाठी त्यांनी नसलेली प्रतिभा वापरुन वर्गात जुन्या नोटस् वाचून दाखवाव्यात त्याप्रमाणं प्रतिज्ञा म्हणवून घेतली. अगदी बालबोध, काळाला मागं नेणारी, माणसाचं स्वातंत्र्य नाकारणारी, परंपरा गोंजारणारी, प्रेम नाकारणारी, हुंड्याबाबत तडजोड करणारी अशी ही प्रतिज्ञा आहे. शेवटी मास्तर सांगून तडजोड करणारी अशी ही प्रतिज्ञा आहे. शेवटी मास्तर सांगून सांगून काय सांगणार? टेक्स्टबुकऐवजी गाईड वाचा असं सांगणार आणि वर्गात कळत नसेल तर ट्युशनला जा असा उपदेश करणार? विद्यार्थी पास झाले काय किंवा नापास झाले काय, जबाबदारी आली की पाठ फिरवणार. अर्थात, सगळेच मास्तर असे असतात असा कोणी गैरसमज करुन घेऊ नये. अमरावती जिल्ह्यातील या काही प्राध्यापकांना मात्र ना प्रेम कळलं, ना त्याचा अर्थ... प्रेम भिल्लावर करावं, त्याच्या भात्यातल्या बाणावरही करावं, पृथ्वीनं सूर्यावर करावं असं सांगणारे कुसुमाग्रजही त्यांना कळले नाहीत. अमरावतीच्या महिला खासदारालाही कळले नाही असंच म्हणावं लागेल. जालिम तुने प्रेम पायाही नही, देखाही नही, समझाही नही असंच म्हणावं लागेल. (अखेर कॉलेजने माफी मागितली, लाज वाटली असावी.)

## पांढऱ्या हत्तीसाठी आता पाच दिवसांचा आठवडा

कोणत्याही समाजातील संघटित वर्ग संघटनेच्या बळावर हव्या त्या मागण्या व्यवस्थेकडून मान्य करून घेत असतो. असंघटित आणि बिगर नोकरदारांच्या वाट्याला असं काही येत नाही. महागाई वाढली की आयोग नेमा, आयोगाचा निवाडा जाहीर होण्यापूर्वी वाढीव आणि संभाव्य वाढीव पगारापोटी उचल घ्या, कल्याणकारी योजनांची कवचकुंडले तयार करा हे सारं काही संघटितांच्या वाट्याला येते. जणू काही एलआयसीची घोषणाच. मरने के पहले और मरने के बाद भी... आपल्याकडच्या नोकरशाहीला पांढरा हत्ती म्हणतात. तो काम कमी करतो आणि जास्त मिळवून पांढरा हत्ती होतो. एकदा का त्याला नोकरी म्हणजे सरकारी नोकरी लागली, की तो हिसकावून घेणारी कोणतीच महाशक्ती आपल्याकडे नाहीच. या हत्तीची तृष्णा खूप मोठी. कितीही पगार वाढवा तो त्याला कमीच पडतो. स्वाभाविकच त्याच्या सगळ्या मागण्या पगाराभोवतीच लटकलेल्या. आता निवडणुकीच्या तोंडावर म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सातव्या वेतन आयोगाची टोपली उघडण्यात आली. मोठ्या गुरुजींची पेन्शनच लाखावर गेली. पण तरीही यांचे समाधान होईना. नोकरीचं वय वाढवा अशी मागणी पुढे येऊ लागली. नोकरभरती करा आमच्यावर ताण खूप येतोय अशी गाऱ्हाणीही पुढं आली. मायबाप सरकार दोन गोष्टी तातडीनं करते. एक स्वत:च्या सदस्यांची पेन्शन आणि अन्य सोयी सवलती वाढवून घेतं आणि आपल्याचसाठी आपण सारं काही करतोय असं कुणालाही वाटू नये म्हणून मग पांढऱ्या हत्तींच्या मागण्या टाळाटाळ करत का होईना मान्य करुन टाकतं. मग सरकारच खुलासा करतं, की नोकरशाहीवर म्हणजेच प्रशासनावर सर्वात अधिक पैसा खर्च करण्यामध्ये भारत आघाडीवर आहे. आता 'सारथी'चं बघा. सरकारने कल्याणकारी उपक्रम म्हणजे जे काही पैसे मंजूर केले ते सारेच प्रशासनावर खर्च झाले. कल्याणासाठी पैसाच नाही. मग कुणाचं तर कल्याण झाले ना अशी एक व्यापक भूमिका घेऊन जे घडतं त्याकडे शांतपणे बघतो. आता पाच दिवसाचा आठवडा झालाय. बाबूशाही आता पाच दिवस कामावर येईल आणि दोन दिवस गाड्या उधळत विकेन्डला जाईल.

अशी कोणती कारणं घडली, की आठवडा पाच दिवसांवर आणावा लागला. एक म्हणजे शासनाला नोकरभरती करायची नाही. जे काही काम करुन घ्यायचं ते याच लोकांकडून आणि

दोन बाबूंनाही खरंच आपल्यावर खूप ताण पडतोय असे नेहमीच वाटत होतं. ताणावर उपाय म्हणजे पाच दिवसांचा आठवडा. पूर्वीही असा प्रयोग झाला होता. कायदेशीर आठवडा पाच दिवसांचा पण पांढऱ्या हत्तींनी तो चार दिवसांवर आणला. उद्या सुट्टी म्हणून आदल्या दिवशी लवकर निघायचं आणि नवा आठवडा सुरु झाला की उशिरा जायचं. आताही तसंच होतं. रविवारी सुट्टी म्हणून शनिवारी लवकर गाशा गुंडाळायचा. जेवणाची सुट्टी येईपर्यंत घरी पोहोचायचं. आता जुनाच निर्णय नव्यानं लागू होणार असल्यानं चार दिवसांचा आठवडा सुरु झाला की काय असा भ्रम होईल. नोकरशाही जनतेची सेवक असते. त्यांचा हुद्दाच नोकर असतो. आपल्या समोर येणाऱ्या नागरिकांत नोकरशाहीनं आपला मालक पहिला असेल असा दावा कुणीही करु शकणार नाही. समाजातील वाढत्या विषमतेने तिला काही करु देणे नाही. शेतमजूर, बेकार, सुशिक्षित बेकार, कंत्राटी कसं जगतात याच्याशी तिला देणेघेणे नाही. फायली भिजत ठेवणे, लालफितीचा कारभार करणे, फायलींचा आणि वायद्याचा खोखो करणे याबाबत आपले पांढरे हत्ती जगात पुढारलेले आहेत. स्वत:च ते मालक झाल्याने जनतेपोटी असलेली उतरायीची त्यांची भावनाही क्षीण होत चालली आहे. अमूक दिवशी तुमचं काम होईलच अशी गॅरन्टी कोणी बाबू देत नसतो. उलट सरकारी काम चार महिने थांब असा सुविचार सांगून समोरच्याची तो समजूत काढत असतो. प्रशासनातला भ्रष्टाचार का वाढतोय याविषयी कोणी काही बोलत नाही. आठवडा सहा दिवसांचा केला काय किंवा पाच दिवसांचा केला काय, जोपर्यंत या आठवड्यात खेळणाऱ्यांची मूळ मनोवृत्ती बदलत नाही तोपर्यंत अशा चिकटपट्ट्यांचा काही उपयोग नाही. ●●●

पान ३९ वरून

## दिल्लीचा नायक : अरविंद केजरीवाल

उघडकीस आणली.

**जनलोकपाल चळवळ** : राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमधील भ्रष्टाचाराच्या निमित्ताने जनलोकपाल चळवळ पुन्हा सुरू झाली. या भ्रष्टाचाराविरोधात भूमिका घेत केजरीवालांनी, या प्रकरणातील गुन्हेगारांविरोधात कोणतीही कारवाई करण्यासाठी केंद्रीय दक्षता आयुक्तांना कोणतेही अधिकार नसल्याचा युक्तिवाद केला. मंत्र्यांविरूद्ध नि:पक्षपाती चौकशी सुरू करण्यास सीबीआय सक्षम नाही. त्यामुळे अशा कामासाठी केंद्रात लोकपाल तर राज्यांमध्ये लोकायुक्त नियुक्त केला जावा, असे मत केजरीवाल यांनी व्यक्त केले होते.

जनलोकपाल चळवळीला गती देण्यासाठी इंडिया अगेन्स्ट करप्शन (आयएसी) गट स्थापन करण्याकरिता २०११ मध्ये केजरीवाल यांच्यासोबत अण्णा हजारे आणि किरण बेदी पुढे आले. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी एक मजबूत लोकायुक्त म्हणून काम करणारा जनलोकपाल कायदा करण्याची मागणी त्यांनी केली. लोकपाल चळवळ गतीमान झाल्यानंतर त्याची दखल घेऊन राष्ट्रीय सल्लागार परिषदेने (एनएसी) लोकपाल विधेयकाचा मसुदा तयार केला. पंतप्रधान, इतर भ्रष्ट अधिकारी आणि न्याय व्यवस्थेविरूद्ध कारवाई करण्याचे पुरेसे अधिकार त्याला मिळणार नाहीत, या पार्श्वभूमीवर एनएसीने बनवलेल्या विधेयकावर केजरीवाल आणि अन्य कार्यकर्त्यांनी टीका केली. लोकपाल नियुक्तीची प्रक्रिया, कायद्यातल्या पोटकलमातील पारदर्शकता आणि सार्वजनिक तक्रारींची दखल घेण्यास लोकपालांना परवानगी नाकारणाऱ्या प्रस्तावावरही या कार्यकर्त्यांनी टीका केली होती. प्रस्तावित विधेयकाला विरोध सुरू असतानाच सरकारने जनलोकपाल विधेयकाचा मसुदा तयार करण्यासाठी एक समिती स्थापन केली. समितीत सिव्हील सोसायटीचे प्रतिनिधी म्हणून केजरीवाल यांचा समावेश केला होता. तथापि, आयएसी कार्यकर्त्यांना समितीत समान स्थान देण्यात आले नसल्याचा आणि शासननियुक्त सदस्य त्यांच्या (आयएसी) शिफारशी बाजूला ठेवत असल्याचा आरोप केजरीवाल यांनी केला. त्यावर सरकारने मात्र, आंदोलनाच्या माध्यमातून नियुक्त लोकप्रतिनिधींना ब्लॅकमेल करण्याची परवानगी कार्यकर्त्यांना दिली जाऊ शकत नाही असे स्पष्ट केले. त्यावर, लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना हुकूमशहासारखं काम करण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही, असा टोला केजरीवाल यांनी लगावला आणि यावर जाहीर चर्चेची मागणी केली. दरम्यान, आयएसी कार्यकर्त्यांनी आपले आंदोलन तीव्र केले. अण्णा हजारे यांनी उपोषण सुरू केले. आंदोलनासाठी जे.पी. पार्कला जाणार नाही, असे हमीपत्र लिहून देण्याच्या पोलिसांच्या आदेशाला विरोध केल्याबद्दल केजरीवाल आणि अन्य कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटक केली.

नियुक्त लोकप्रतिनिधींबाबत लोकपालाला अधिकार असल्याच्या पार्श्वभूमीवर काही लोकांनी सरकारशिवाय जनलोकपाल चळवळीवरही टीका केली. ही चळवळ लोकांची चळवळ नाही आणि भारतातील धोरणनिश्चितीवर प्रभाव टाकण्यासाठी तिला विदेशातून पैसा मिळतो, असा दावा अरूंधती रॉय यांनी केला. केजरीवालांना मिळालेल्या रेमन मॅगसेसे पुरस्कारासाठी फोर्ड फाऊंडेशनने निधी पुरवल्याचे आणि कबीर संस्थेलाही ३ लाख ९७ हजार डॉलरची देणगी दिल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. मात्र केजरीवाल आणि फोर्ड फाऊंडेशनने हे आरोप निराधार असल्याचे सांगून आरटीआय मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी देणगी दिल्याचे स्पष्ट केले. अन्य काही भारतीय संस्थांनाही फाऊंडेशनकडून देणग्या मिळाल्याचे त्यांनी सांगितले. ही चळवळ म्हणजे आरएसएसने काँग्रेसविरोधात केलेला कट किंवा दलितांविरूद्ध उच्चवर्गीय जातींचा कट असल्याचा आरोपही केजरीवाल यांनी फेटाळला. ●●●

# ग्रेट थॉट्स




प्रेम ही अशी शक्ती आहे, जी शत्रूचं मित्रात रुपांतर करीत असते.
**– मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर** (अमेरिकेतील मानवी हक्क चळवळीतील नेता)




प्रत्येकाच्या हातात तलवार असते तेव्हा ती सरकार स्थापनेसाठीची इच्छाशक्ती असते.
**– छत्रपती शिवाजी महाराज** (हिंदवी स्वराज्याचे संस्थापक)

तुम्हाला सूर्यासारखं चमकावं वाटत असेल तर अगोदर सूर्यासारखं जळा.
**– डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम** (भारताचे माजी राष्ट्रपती)



बंधुत्वाचे गूढ बंधन सर्व पुरुषांना भाऊ बनवत असते.
**– थॉमस कार्लाईल** (ब्रिटिश इतिहासकार, गणिततज्ज्ञ, शिक्षक)






आपलं सुख किंवा दुःख हे आपल्या प्रवृत्तीवर अवलंबून असतं, परिस्थितीवर नव्हे.
**– मार्था वॉशिंग्टन** (अमेरिकेचे पहिले अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या पत्नी)




निराशावादी व्यक्तीला प्रत्येक संधीत अडचण दिसते तर आशावादी प्रत्येक अडचणीत संधी पाहत असतो.
**– विन्स्टन चर्चिल** (दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील ब्रिटनचे पंतप्रधान)

ईश्वरासमान आई असलेली व्यक्ती गरीब नसते.
**– अब्राहम लिंकन** (अमेरिकेचे १६ वे अध्यक्ष)



कला हे निसर्गाचं मूल आहे, ज्यामध्ये आम्ही आईच्या चेहऱ्याची वैशिष्ट्ये शोधत असतो.
**– हेन्री वॅड्सवर्थ लाँगफेलो** (अमेरिकन कवी आणि शिक्षणतज्ज्ञ)





आपण आपल्या देशावर प्रेम करत असू, तर आपल्या देशबांधवांवरही प्रेम केले पाहिजे.
**– रोनाल्ड रिगन** (हॉलीवूड कलावंत आणि माजी अमेरिकन अध्यक्ष)



निर्विवाद मन हे दुःखाचे जग आहे.
**– बायरन केटी** (अमेरिकन लेखक)

# अस्तित्वाची लढाई!

खरं तर गेली बरीच वर्षे.......,
मी श्वास घेतोय, चालतोय, बोलतोय, हसतोय, खेळतोय.
मी सकाळी उठतो, प्रात:विधी करतो, चहा घेतो, काम करतो, जेवतो, झोपतो.
माझे सगळे नैसर्गिक विधी मी अत्यंत व्यवस्थित करतो
अचानक एक दिवस मला जीवंत असल्याचा पुरावा मागितला जातो
मी विचारतो त्यांना की, 'तुम्ही कोण?'
ते म्हणतात, छठउ
याच्या अगदी उलट........,
जे या जगातच नाहीत, जे श्वास घेत नाहीत, चालत नाहीत, बोलत नाहीत,
खात नाहीत, पित नाहीत.
अशांना मात्र हे व्हेंटिलेटरवर ठेवणार आहेत
कृत्रिम श्वासोच्छ्वासावर ते अर्धमेल्यांना जीवंत करणार आहेत
मी त्यांना विचारतो, 'तुम्ही कोण?'
ते म्हणतात, उअअ

जीवंत माणसांना मृत घोषित करणारे आणि......
मृत माणसांना जीवंत करू पाहणारे
कोण आहेत हे?
कोणी दिले ह्यांना हे अधिकार?
खरं तर.........
जीवंत माणसांना, 'मी जीवंत आहे!' हे सांगण्याची गरजच नसते
आणि मेलेल्यांनाही पुन्हा जीवंत करण्याची गरज नसते
अशा वेळी........
जीवंत माणसांना सरणावर नेणाऱ्यांना....
आणि मेलेल्यांना व्हेंटिलेटरवर आणणाऱ्यांना
जीवंत माणसांनी कडाडून विरोध केलाच पाहिजे
कारण........
हा विरोध म्हणजेच आपल्या जित्याजागत्या जिवंतपणाची एकमेव खूण असणार आहे.
हे करत असताना त्यांनी आपल्याला
देशद्रोही म्हटलं तरी बेहत्तर
पण आपण कुठल्याही परिस्थितीत
हा देश सोडायचा नाही
कारण हा देश आपला आहे
या देशासाठी आपल्या बापजाद्यांनी रक्त सांडले आहे
हा देश म्हणजे आपला जीव की प्राण आहे
हा देश म्हणजे आहे आपल्या जीवंतपणाचं प्रतीक
हा देश म्हणजे आहे आपलं संपूर्ण अस्तित्व
म्हणूनच माझ्या तमाम जीवंत मित्रांनो
आता आपल्याला आपल्या या अस्तित्वाची
घनघोर लढाई शेवटच्या श्वासापर्यंत लढावीच लागेल
आता आपल्याला आपल्या या अस्तित्वाची
घनघोर लढाई शेवटच्या श्वासापर्यंत लढावीच लागेल

**– विवेक मोरे**

पान १२ वरून

## विकास व प्रशासनाचा ढाचा आमूलाग्र बदलण्याचं आव्हान

संपत्तीवर कर (वेल्थ टॅक्स). एका अनुमानानुसार, महाराष्ट्र राज्यात अब्जाधीशांकडे असलेली संपत्ती १२५ लाख कोटी रुपये आहे. त्यावर एक टक्का दराने कर लावल्यास दरवर्षी १ लाख २५ हजार कोटी कर महसूल मिळू शकेल. तो हस्तांतराने टाळला जाऊ नये, म्हणून वारस कर (इनहेरिटन्स टॅक्स) जरुरी आहे. दरवर्षी साधारणत: अब्जाधीशांकडील पाच टक्के संपत्तीचे हस्तांतरण होते. त्यावर ३५ टक्के दराने वारस कर आकारल्यास २ लाख कोटीहून अधिक कर महसूल प्राप्त होईल. म्हणजे संपत्ती व वारस कर दोन्ही मिळून ३ लाख कोटीहून अधिक महसूल मिळवता येइल. केंद्र सरकारशी बोलून व योग्य तो कायदा संमत करून हे लागू करता येईल. परवाने नूतनीकरण व अन्य सेवाशुल्क आकारणी व वृद्धी याद्वारे कराव्यतिरिक्त (नॉन टॅक्स) महसूल वाढीस मोठा वाव आहे.


११. वर सुचविलेल्या आर्थिक तरतुदीसोबतच जनकल्याणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या काही तरतुदी अत्यावश्यक आहेत. त्यात सर्वोच्च प्राधान्य राज्याच्या सर्व ३६ जिल्ह्यांत दारूबंदी लागू करण्यास देण्यात यावे. सोबतच तंबाखू, गुटखा व अन्य व्यसनाधीन तसेच अमली पदार्थांच्या उत्पादन, वितरण व सेवनावर निर्बंध घालण्यात यावेत. प्लास्टिक तसेच घातक रसायनांचे उत्पादन, पेट्रोल, डिझेल, कोळसा उत्खनन, वापरावरदेखील निर्बंध आवश्यक आहेत. विकासाच्या नावाने चाललेला विनाश, पर्यावरणाची हानी थांबविण्यासाठी तसेच जनआरोग्य रक्षणासाठी याला विशेष महत्त्व आहे.

१२. मराठीभाषक कष्टकरी जनसमूहांच्या हितरक्षण व संस्कृती संवर्धनार्थ प्रशासन, लोकव्यवहार, शिक्षण आणि न्यायदानाची भाषा संपूर्णत: मराठी व्हावी यासाठी आपण कायदेशीर व कार्यात्मक कार्यवाही करालच; ती सत्त्वर व्हावी अशी अपेक्षा करतो. तात्काळ मंत्रालय तसेच राज्याच्या सर्व कार्यालयातील समग्र व्यवहार कटाक्षाने मराठी भाषेतच व्हावा यावर विशेष भर देणे इष्ट होईल. या सर्व बाबींवरील चर्चेसाठी भेटीची वेळ द्यावी, ही विनंती. ●●●

आपला स्नेहांकित

**– प्रा. एच. एम. देसरडा, अर्थतज्ज्ञ, माजी सदस्य, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळ**

# कोण काय बोलत




**– प्रकाश आंबेडकर** (वंचित बहुजन आघाडीचे नेते)

राज ठाकरेंनी घुसखोरांचे आकडे द्यावेत, विनाकारण ढोल वाजवू नये.



**– जितेंद्र आव्हाड** (राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे गृहनिर्माण मंत्री)

शरद पवारांची सुरक्षा काढून नरेंद्र मोदींनी कोत्या मनोवृत्तीचे दर्शन घडवले.



**– रामनाथ कोविंद** (भारताचे राष्ट्रपती)

२१ व्या शतकातील तिसरे दशक हे नवभारताच्या उदयाचे असेल.



**– अनिल देशमुख** (महाराष्ट्राचे गृहमंत्री)

खऱ्या दंगलखोरांची नावे बाहेर येण्याच्या भीतीनेच केंद्र सरकारने भीमा कोरेगाव हिंसाचाराचा तपास एनआयएकडे दिला.



**– भगतसिंह कोश्यारी** (महाराष्ट्राचे राज्यपाल)

कर्करोगासारख्या दुर्धर आजाराचे निदान वेळीच होणे गरजेचे असल्याने कर्करोगाविषयी जनजागृती होणे अतिशय आवश्यक आहे.



**– बाबू कवळेकर** (गोव्याचे उपमुख्यमंत्री)

भविष्यात गोव्याची ओळख कृषीप्रधान राज्य अशी व्हावी यासाठी गोवा सरकारचे प्रयत्न सुरू आहेत.



**– नवाब मलिक** (राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आणि राज्याचे अल्पसंख्याक मंत्री)

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा जयजयकार केला म्हणून अदनान सामीला पद्मश्री पुरस्कार देणं हा भारतीयांचा अपमान.



**– संजय राऊत** (शिवसेना खासदार आणि ज्येष्ठ पत्रकार)

दिल्लीतील सत्तापरिवर्तनाची सूत्रेदेखील शरद पवारांच्या हातात असतील.



**– आ. संजय केळकर** (वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे नेते)

वृत्तपत्र विक्रेत्यांचे प्रश्न समन्वयाने सुटले नाहीत तर संघर्ष करण्याचीही तयारी.

■ POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
■ RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

